शनिवार । ३ सप्टेंबर १९७७

७५ पैसे

# माणूस

## गुंगी गुडिया....
## नयी रोशनी....
## याह्यासुरमर्दिनी....
## इंदिरा इज इंडिया....

# माजी पंतप्रधान....भावी ?

या खळबळजनक राजकीय कारकीर्दीचा,
त्यामागील ' करिष्मा 'चा ( CHARISMA )
वेध घेत आहेत,
पुढील आठवड्यात प्रसिद्ध होत असलेल्या
' माणूस रायबरेली विशेषांका 'त

## चंद्रशेखर

ज्यांनी माणूसमधून इंदिरापर्वाची चाहूल महाराष्ट्रात सर्वप्रथम घेतली....

## इंदिरा गांधींच्या राजकीय पुनरागमनाची चर्चा करणाऱ्या या अंकाची किंमत सव्वा रुपया

पुढील आठवड्यात नेहमीच्या वेळी प्रसिद्धी.

## साप्ताहिक माणूस

वर्ष सतरावे–अंक चौदावा

३ सप्टेंबर १९७७

मूल्य पंचाहत्तर पैसे

संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे
¤
वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये
¤
प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.
¤
राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.
¤
साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव पेठ,
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०
¤
दूरध्वनी : ४३४५९
¤

दिल्लीचे वार्तापत्र

# अँटी राजनारायण, अँटी चरणसिंग लॉबी

दादूमिया

इंदिरा गांधी सत्तेवर येऊन स्थिरावल्या त्या वेळेस 'माणूस'मध्ये मी दिल्ली दूर नहीं है' नावाची एक लेखमाला लिहिली होती. त्यात इंदिरा कोणत्या मार्गाने जात आहेत, साहेबांचे भवितव्य काय वगैरे बऱ्याच मुद्द्यांची चर्चा केली होती. कम्युनिस्टांचे भविष्य, राष्ट्रवाद्यांचे भविष्य वगैरे भाकिते आज ततोतंत खरी ठरली आहेत.

जनतापक्षाचे राज्य आता स्थिरावले आहे. मोरारजी देसाई आता सत्तेविषयी निश्चित झाले आहेत. जनतापक्षात अंतर्गत तणाव बरेच दिसतात; पण ते कॉंग्रेसपक्षातही होते. गटबाजी ही पक्षात असायचीच. त्याला कोणी डरत नाही. ह्या गटबाजीस पुरून उरतील असे खंबीर पुढारी दिल्लीत मौजूद आहेत.

इंदिरा गांधींचे परतणेदेखील महत्त्वाचे नाही. कारण उघड आहे. त्यांच्या पक्षातच त्यांना विरोध आहे. मोठ्या मेहनतीने त्यांना उखडून काढले. आता त्यांना परत कोण घेईल? यशवंतराव न बोलता शहाणे आहेत. साठेंसारख्यांना राबवून आपण नामानिराळे राहण्याचा प्रयत्न करतात. यशवंतराव व जगजीवनराम व्यवस्थित भेटतात, एकत्र जेवतात. त्यांचे हल्ली भलतेच सख्य आहे. इंदिरा नको यावर त्यांचे एकमत आहे. जगजीवनराम आणि चरणसिंग देखील एकत्र भेटतात. हे अहवाल बाईंकडे पोचत नाहीत असे नाही. कदाचित हे अहवाल थोड्या अतिशयोक्तीने पोचावेतच, अशी योजनाही केली असेल या मातब्बर मंडळींनी.

साऱ्या मंत्रिमंडळात इंदिरेच्या तुषारीची 'मॅच' होईल अशी एकच व्यक्ती आहे– चरणसिंग. चौधरी ही जाटांच्यांतील प्रतिष्ठित माणसास दिलेली पदवी. चौधरीजी म्हटले नाही तर जाट भडकतो! शिखांत सरदारजी व जाटांत चौधरीजी!! चरणसिंग म्हणजे अस्सल 'इव्हिल जिनियस' आहे. भेदक डोळे व जाटांत एवढा शिकलेला! म्हणजे पाहा काय मान असेल तो!

चरणसिंगांची कारकीर्द सारी पॉलिटिव्ह ॲक्शनन्सनी भरलेली आहे. त्या मानाने बाकीचे सारे शामळू आहेत. धारियासाहेब व्यापाऱ्यांविरुद्ध मिशा वापरू, अशी बोंब मारतात. चंद्रशेखर तोच सूर काढतात; पण आहे का हिंमत तशी कृती करण्याची? आमच्या गुजरातमध्ये तेलिया राजांची सारी कृष्णकृत्ये चव्हाट्यावर आली आहेत. त्यांना कोणीही हात लावू शकत नाही, शकणारही नाही. मग तोंडची वाफ कशाला दवडायची?

दिल्लीत गेले की हे सारे राजकारण कळते. 'डमर' कोण व 'टॉकर' कोण त्याची जाणीव होते.

चरणसिंगाविषयी मग अभिमान वाटू लागतो. जस्टिस सिन्हासाहेबांचे पत्रच लोकसभेत टेबलावर चरणसिंगांनी ठेवले व कॉंग्रेसवाल्यांची तोंडेच बंद केली.

सुरुवात केली ती राज्यांच्या निवडणुकांची घोषणा करून. दणदणीत घोषणा.

चरणसिंग बोलतात व तसे करून दाखवितात! महाराष्ट्रातील पाटीलबुवांचे वर्णन 'रंगेल व रंगेल गडी' असे केले जाते. उत्तरेस चरणसिंगांचे वर्णन तसेच करतात. गडी टरकत नाही. मोरारजीभाईंना देखील. 'मोरारजी पाहिजेत' असे प्रत्यक्ष त्यांनी

कधी सांगितले नाही. आजारी असताना जे. पीना व कृपलाजीना एक चिठ्ठी पाठवून दिली. जगजीवनराम सोडून कोणीही प्रधानमंत्री चालेल! मोरारजी आले ते या जाट चौधरीजीच्या मेहेरबानीमुळे आले आहेत. ८५ पैकी ८५ जागा जिंकणाऱ्या अवध्य, अजिक्य व अतुल्य योध्याचा पाठिंबा असल्यावर मोरारजीना कोणाचे भय आहे?

यशवंतराव व जगजीवनराम यांच्याकडे १५ ऑगस्टच्या आधी एक भोजनसमारंभ झाला. कॉंग्रेसवाल्यांची जेवणे चव्हाटयावर येतात. त्याच्यावर खुसखुशीत संपादकीये लिहिली जातात. मेड् टु ऑर्डर!

चरणसिंगांनी त्याच वेळेस ठरविले, कृती करून दाखवायची. धवन काय, सिंग काय, कपूर काय–या साऱ्यांची धरपकड केल्यावर पवनार व पटना येथील दोन भेटी अगदी फुकट गेल्या. साहेबांचा राग होताच. त्यांनी बेळचीला 'ऑफिशियल व्हिजिट' देण्याचे ठरविले होते. त्याआधी बाई तेथे पोचल्यादेखील! कसे परवडणार हे? म्हणून चरणसिंगांकडून कृती–-

काय स्ट्रॅटेजी होती!

मुहूर्त १५ ऑगस्टचा!

चांगले माणसाने किती करावे? अरे; कॉंग्रेसपक्षातील ६ कोटी रुपये वाचविण्यासाठीच आम्ही जनतावाले खटपट करीत आहोत. तुमच्यासाठी, बरे, फक्त तुमच्यासाठी!

आपोआपच इंदिरा गांधीना शह बसला का?

□

इंदिरा गांधी सध्या काय करीत आहे, तुम्ही विचारणे साहजिक आहे.

इंदिरेजवळ सत्ता नाही, पण माणसे आहेत, खूप पैसा आहे व परदेशी Contacts आहेत. शह म्हणून त्यांना परदेशी जायची बंदी आहे. पैसा कोठे व किती आहे हे आता ही मंडळी हळूहळू बोलतील! व माणसे? मोरारजी जसजसे समर्थ व स्वावलंबी बनतील तसतसे हे चमचे हळूहळू बाहेर फुटू लागतील! 'ब्लिटझ'चा करंजिया पार फुटला. राघवनला दिल्लीत काम न करता बिचाऱ्या (?) करंजियांनी दीड वर्षभर फुकट पगार दिला होता, कसे विसरतील ते? खुशामतसिंग तसे रुसलेच आहेत. चांगले गोऱ्यांऐवजी लंडनमध्ये हायकमिशनर व्हायचे! आणखी एक दुसरे मराठी संपादक! पार पार निवळले आहेत–अहो, आमचे काय घेऊन बसला आहात, ब्रिटिश काळातील पोलिस व ICS नाही का कॉंग्रेससरकारशी एकनिष्ठ राहिले? तसे आम्ही. दारू व पुस्तके पुरवा, म्हणजे झाले!

इथेच नेमके नडणार आहे.

इंदिराबाईंजवळ काहीही पुरविण्याची ताकद होती, अजूनही आहे.

त्यामुळे १५ ऑगस्ट रोजी इंडियन एक्स्प्रेसच्या पहिल्या–पानावर ठळक अक्षरात 'जे. पी. ब्लेसेस् इंदिरा' व बाईंचा फोटो! गोएंकशेठच्या एक्स्प्रेसमध्ये हा घोटाळा तर इतराचे काय?

या वृत्तपत्रातील अमुक डाव्या लोकांना हाताशी धरून नवोन कट सध्या शिजत आहे. चरणसिंगांना व राजनारायण ह्या उत्तर प्रदेशातील रगेल व कृतिशील राजकीय नेत्यांना पद्धतशीर बदनाम करण्याचा हा इतका सुंदर कट आहे की सामान्यांना सांगितल्याशिवाय कळायचाच नाही.

त्यासाठी तर दिल्लीची वारी!

आतल्या गोटातल्या बातम्या का वृत्तपत्रे वाचून कळतात?

राजनारायण सरळ माणूस आहे. निष्कलंक. पैसे न खाणारा. सारे सरळ सरळ लोकांना सांगून टाकणारा; म्हणजे झाली का पंचाईत? 'मला या बाईने मारून टाकण्यासाठी माणूस धाडला होता,' असे या गृहस्थाने सांगताच बिचाऱ्या साठयांच्या शाब्दिक आतषबाजीस किंमत काय राहिली?

औषधे तयार करणाऱ्या परदेशी कंपन्यांची दिल्लीत जबरदस्त लॉबी आहे. खूप पैसे चारून भरमसाट लूटमार करते आपल्या भारतीयांची ही लॉबी. उदाहरणार्थ, बुटाझोलिडिन व टॅंडेरिल यांत विशेष फरक काही नाही. टॅंडेरिलमध्ये OXY हा घटक जास्त आहे. हे औषध पूर्वी माहीत होते; पण जाहिरातबाजी करून सर्जिकल कंडिशन्सवर हे उत्कृष्ट आहे ब्रेन वॉशिंग करून टॅंडेरिलवर लाखो रुपये या कंपनीने कमावले! अजूनही डॉक्टर्स बुद्दू बनत आहेत व बनतीलही! टिनोपॉल पावडर बाजारात विकली जाते. त्यात ९० टक्के मीठ असते हे माहीत आहे तुम्हास?

अशी प्रत्येक कंपनीची व्यापारी बंडलबाजी लिहावयाची म्हटली तर 'माणूस'चा अख्खा अंक लागेल, एवढी स्कॅंडल्स आहेत!

पण ही लाच देऊन चूप केली जातात, सेक्रेटरी, अंडरसेक्रेटरी ते थेट मंत्री–सारे यात लाखो रुपये खातात!

कुटुंबनियोजनात काय झाले?

र. धों. कर्वे खरे म्हणजे या क्षेत्रात पायोनियर. जास्तीत जास्त अनुभवी!

पण त्यांचा सल्ला घेतला तर ते कमिशन थोडेच देणार होते? म्हणून परदेशी निष्णात लोक बोलावले गेले. त्यांना आधी पढविण्यात आले त्याप्रमाणे ते बोलले. पैसे वाटले गेले. योग्य जागी त्याचे वितरण झाले.

मग लूप्स आले. अमेरिकेत तो केवळ प्रयोग होता. भारतीय स्त्रियांवर त्या प्रयोगाचे यश मापण्यात आले. येथे हा प्रयोग फसला.

फसला तर फसला; पण पैसे तर कमावून घेतले ना मधल्यामध्ये?

भारतीय नारी गेल्या जहॉंनममें!

अफाट पैसा कमावला तो अमेरिकन व्यापाऱ्यांनी व देशी राजकीय दलालांनी!

निरोधचे पुराण असेच गमतीदार आहे. पुन्हा केव्हा तरी सांगू.

या लॉबीला भीती वाटते, हा वेडा माणूस पैसा तर खायचा नाहीच नाही; पण उलट लोकसभेत सांगायचा, अमुक कंपनीचे लोक मला अमुक लाख रुपये लाच देण्यासाठी आले होते–

आली का पंचाईत?

लॉकवुडसारखे स्कॅंडल, बाहेर यायचे व जगातील निरनिराळ्या देशातले लोक जागे व्हायचे.

त्यापेक्षा प्रचार करून यास हाकलून लावला तर?

म्हणून 'संडे'सारख्या सुंदर साप्ताहिकात फोटो देऊन राजनारायण या विक्षिप्त माणसाचे खंडन–

आणि 'माणूस'नेही ते (खरी गोष्ट ठाऊक नसल्यामुळे), 'अवतीभवती'मध्ये प्रसिद्ध केले!

बऱ्याच इंग्रजी मासिकांनी हा राजनारायणविरोधी सूर उचलून 'त्यांना हाकला' अशी हाकाटी सुरू केली, एका प्रतिष्ठित मराठी दैनिकानेदेखील!

कारण मेडिकलच्या सर्व मासिकांनी 'नॅशनल सॉलिडॅरिटी डे' साजरा केला व राजनारायणांविरुद्ध प्रचार सुरू केला. त्या मेडिकलच्या मासिकाचे ठीक आहे. या मल्टीनॅशनल कंपन्यांच्या जाहिरातीवर तर ती जगतात!

पण मराठी दैनिकांनी?

ग्राहकचळवळ इकडे लक्ष देईल काय?

राजनारायण एवढेच सांगत आहेत की, खेडेगावात पॅरामेडिकल लोक तयार करावेत. ते डॉक्टर्स आहेत वा होतील, असे कोण म्हणतोय? खेडेगावातील लोकांना स्वस्तात फर्स्ट एड मिळाली तर काय बिघडले?

पण नाही, समंजसपणाने विचार करतील तर आमचे विचारवंत कसले?

राजनारायण गेले तर लक्षात ठेवा; आमच्या अकलेचा तो पंचनामा ठरेल! ती औषधी कंपन्यांची लॉबी किती जबरदस्त आहे याचा तो जिवंत व चालताबोलता पुरावा ठरेल!

कोका कोला कंपनीने भारतात १६ लाख रुपये गुतविले हे सत्य, कबूल, मानले पाहिजे; पण दहा कोटी रुपये म्हणून परत अमेरिकेत नेले त्याचे काय?

या १६ लाख रुपयांत 'बेनिफिशियरी' म्हणून जसे हितेंद्रभाई देसायांचे बंधू येतात तसेच जाहिरात छापणारे वृत्तपत्रवालेही येतात—पाठिंबा देणाऱ्यांच्या यादीत.

काय बोलायचे व काय लिहायचे?

□

जी राजनारायणाची गोष्ट तीच चरणसिंग चौधरींची!

चरणसिंग भ्रष्ट नाहीत वगैरे अतिशयोक्ती करावयास माझी लेखणी धजावणार नाही. त्यांचे पक्षांतराचे रामायण ख्यात आहे सर्वांना; पण इंदिरा गांधी ह्या दुखावलेल्या जाटास विकत घेऊ शकणार नाहीत हे शंभर टक्के सत्य!

म्हणून 'हटाव चरणसिंग' हा नारा.

हटाव कबूल, पण कारण काय दाखविणार? इंदिरेस तो फार भारी गडी पडेल म्हणून? खूप समर्थ आहे, कार्यकुशल आहे म्हणून? काँग्रेसपक्षातील सर्व पुढाऱ्यांची लफडी तोंडपाठ आहेत म्हणून? हटाव, पण कोणत्या आधारावर?

येथे इंदिरा-पक्षाचे 'रॉ'सारखे इंटेलिजन्स काम करीतच असते.

चरणसिंगांना दलितांच्या लफड्यात गुतवा! बदनाम करा! बत्ती द्या! सुरुंग उडला की दलितही साफ व चरणसिंगही चिथड्या-चिथड्या! मुंबईतील डी डी चाळ आठवते ना? काय सुंदर बत्ती दिली होती! एका स्ट्रायकरने तीन पॉकेटात तीन सोंगट्या—

चरणसिंगांची सध्या कबर खणण्याचा विचार चालू आहे—या आघाडीवर.

त्यासाठी पद्धतशीर प्रयत्न केले जात आहेत.

काँग्रेसपक्षाचे राज्य होते तेव्हा दलितांवर जे जुलूम झाले तेव्हा या बुजुर्गांना आठवण नाही आली?

फार छान आहे ही स्ट्रॅजेडी.

दलितांत राजकीय जागृती भरपूर आहे. एक दलित डॉक्टर मला म्हणाले, 'हे राजकारण मला जवळून माहीत आहे म्हणून ठीक, नाही तर मीसुद्धा खवळून गेलो असतो! आमचे लोक तसे भोळे आहेत. मी दोन-चार जणांना सांगू शकतो, पटवू शकतो; पण ह्या मास मिडियांना तोंड कसे देणार तुम्ही? भलतीच 'क्लेम्हर मुव्ह' आहे या अँटी-चरणसिंग लॉबीची!'

चरणसिंगांचा आचारीच दलित आहे. (जय जगूबाबू!) त्यांच्या घरी अस्पृश्यता कोणीच पाळीत नाही.

पण ही सत्ये सांगणार कोण?

रोज पेपरात जे दिसते, वाचावयास मिळते त्यावरच सामान्य वाचक बोट दाखवितात ना?

यांची भविष्यातील मुव्ह काय असेल?

भविष्यातील कशाला?

आजच, रोज २००–३०० हरिजन मोरारजीभाईंच्या घरासमोर मोर्चा नेऊन 'या नरभक्षकास काढा' म्हणून मागणी करीत आहेत. (या मोर्चा नेणाऱ्याचे पैसे कोण भरतो तो नाजुक प्रश्न मला विचारू नका!)

हे अत्याचार 'ऑन पेपर' कसे वाढतील या चिंतेत चूर आहे ही लॉबी. सी. पी. आय. व थोडेसे समाजवादी त्यात सामील आहेत. मार्क्सिस्ट पुढेमागे फायदा पाहून त्यात उडी घेतीलही, आज ते सांगता येत नाही. जे. पी. प्रमाणे इतर समाजवादी नेत्यानी वर्गसंग्रहाची भाषा सुरू करावी—चंद्रशेखर व मधू लिमयांनी राजिनाम्याची भाषा काढावी. दलित पुढाऱ्यांनी आगीत तेल ओतावे. त्यात गोळीबाराची भर पडावी. निष्पाप स्त्रिया व मुले हकनाक मारली जावीत. हुतात्मा स्मारके निर्माण व्हावीत.

बस्स, यातच चरणसिंगाचे मरण आहे; पण तेवढ्यावर गाडी थांबणार नाही.

तेथे जनतापक्षाचे दुभंगणे आहे व दुभंगणे म्हणजे स्फोट—

मरणाची तयारी.

मोरारजीभाईंच्या या मानसिक यातना कोणी समजावून घेईल का? □


**पुरंदऱ्यांचा सरकारवाडा**

लेखक
ब. मो. पुरंदरे

मूल्य : सात रुपये
राजहंस प्रकाशन, पुणे ३०

# महाराष्ट्र-कर्नाटकच्या मुख्य मंत्र्यांच्या हितसंबंधांत गुंतलेले गोखले कॉलेज प्रकरण

माहितगार

'एम. आर. देसाई यांच्या गळ्याभोवती मी दोर टाकला आहे. ते कोठे जातात ते मी पाहते !' असे शिक्षणमंत्री श्रीमती प्रतिभा पाटील यांनी कोल्हापूरच्या गोखले कॉलेजच्या प्राध्यापकांना जून १९७७ च्या सुरुवातीस सांगितले होते. त्याच बाईंना 'गोखले कॉलेजप्रकरणी मी काही करू शकत नाही. माझे हात टेकले आहेत.' असे सांगण्याचा प्रसंग १६ जून रोजी आला. शिक्षण प्रसारक मंडळाने चालविलेल्या गोखले कॉलेजमध्ये कला, वाणिज्य व विज्ञान या तीन्ही शाखा आहेत. त्यातील विज्ञानशाखा बंद करण्याचा निर्णय प्राचार्य एम. आर. देसाई यांनी व त्यांच्या शिक्षणसंस्थेने घेतला. विज्ञानशाखा तोट्यात चालते असे कारण देण्यात आले आहे; परंतु ते तेवढे खरे नाही. तीनही शाखांचा एकत्र विचार केल्यास विज्ञानशाखा तोट्यात चालते असे म्हणण्यास जागा नाही. तसे पाहिल्यास गोखले कॉलेजचा प्रश्न नफा—तोट्याचा नाहीच ! कॉलेजमध्ये झालेल्या गैरव्यवहाराचा, अफरातफरीचा हा मूळ प्रश्न आहे. प्राध्यापकांनी हा प्रकार उघडकीस आणला हा खरा राग आहे. हे प्रकरण मुळी १९७७ साली निर्माण झालेले नाहीच ! त्याची सुरुवात १९६३ सालापासून झाली आहे. चालू शैक्षणिक सत्रापासून विज्ञानशाखा बंद करण्याचा निर्णय एमारांच्या प्रेरणेने घेतला आणि या प्रश्नाने मोठी उसळी मारली ! कोल्हापूर जिल्हा कॉंग्रेसचे अध्यक्ष अनंतराव भिडे व कॉंग्रेसचे आठ आमदार यांनाही कॉलेजच्या गैरव्यवहाराची खात्री झाली असून त्यांनी मुख्य मंत्री वसंतराव पाटील यांना पत्र पाठविले व प्रशासक नेमण्याची मागणी केली आहे. गोखले कॉलेज-प्रकरणात सर्व पक्षीय (कॉंग्रेससह) कृति-समिती स्थापन झाली आहे. अनेक प्रकरणांत कोर्टाने एम. आर. देसाई यांच्यावर ताशेरे मारले आहेत. इतकेच नव्हे तर एम. आर. देसाई यांना अटक करण्यात आली होती व एक लाख रुपयाच्या जामिनावर त्यांना सोडले अशी माहिती करवीर तालुका मामलेदार कचेरीतील एका अधिकाऱ्याने मला सांगितली. याच कार्यालयात एम. आर. ना जामीन दिला गेला असे तो म्हणाला. 'कॉलेजचे व्यवस्थापन अन्याय करते हे आपल्याला पटले आहे' असे शिक्षण-मंत्री प्रतिभा पाटील यानीही प्राध्यापकांच्या शिष्टमंडळाला सांगितले होते. प्राध्यापकाचे पगार दिले नाहीत. त्यांचा लाख लाख रुपयांचा प्रॉव्हिडंट फंड भरला नाही हे उघड झाले असताना कारवाई होत नाही. सरकार एम. आर. देसाई यांना पाठीशी घालत आहे हे का? कोल्हापुरात या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी मी अनेकांना भेटलो. प्राध्यापक, विद्यार्थी आणि कॉंग्रेसच्याही काही आमदारांना भेटलो. मुख्य मंत्री वसंतराव पाटील गोखले कॉलेजचे प्राचार्य एम. आर. देसाई यांच्यामागे उभे असल्यामुळे कारवाई होत नाही असे या सर्वांशी केलेल्या चर्चेतून दिसून आले. त्याचे काही धागेदोरे कर्नाटक-मधील कॉंग्रेसपक्षाच्या राजकारणातही गुतले आहेत यावरही प्रकाश पडला. म्हणूनच प्रतिभा पाटील यानी टाकलेला दोर एम. आर. यांना खेचून धरण्यास समर्थ ठरण्याऐवजी हातातील दोरासहित शिक्षणमंत्री श्रीमती पाटील यांची फरफट करीत आहे.

¤

विज्ञानशाखा बंद करण्याचे ठरल्यानंतर प्राध्यापकांचे शिष्टमंडळ श्रीमती पाटील यांना भेटले. तेव्हा विज्ञानशाखा स्टाफने चालवावी. त्यासाठी विद्यार्थ्यांची प्रवेशसंख्येची अट शिथिल केली जाईल, स्टाफला पैसा कमी पडू दिला जाणार नाही; परंतु प्राध्यापकानी विज्ञानशाखा चालवावी असा प्रस्ताव श्रीमती पाटील यांनीच प्राध्यापकांना दिला होता. एम. आर. हे मान्य करणार नाहीत, मात्र आम्ही विज्ञानशाखा चालविण्यास तयार आहोत असे आश्वासन प्राध्यापकांनी दिले. प्राध्यापकांनी एम. आर. देसाई यांच्याविषयी संशय बोलून दाखविला. त्यावर श्रीमती पाटील म्हणाल्या की, 'त्यांच्या गळ्याभोवती मी दोर टाकला आहे. ते कोठे पळतात ? मी तुम्हाला शब्द दिला आहे, दिलेला शब्द मागे घेण्याचा माझा स्वभाव नाही.' शिक्षणमंत्र्यांच्या या आश्वासनानंतर प्राध्यापक कोल्हापुरात गेले आणि त्यानी हायस्कूलच्या हेडमास्तरांच्या गाठी-भेटी घेऊन विद्यार्थी पाठविण्याबाबत त्यांच्याशी चर्चा केली. शालांत परीक्षा पास होणाऱ्या विद्यार्थ्यांना तुमच्या शाखेत पाठविण्याची व्यवस्था करू असे हेडमास्तरानी सांगितले. शिक्षणमंत्री श्रीमती पाटील आपला प्रस्ताव प्राध्यापक व एम. आर. देसाई याना संयुक्त-पणे देणार होत्या; परंतु १५ जूनपर्यंत बैठकीला एम. आर. आलेच नाहीत. १६ जूनपर्यंत त्याची वाट पाहिली. १६ जून रोजी ते सकाळी ११ वाजता आले व त्यांनी स्वतंत्रपणे श्रीमती पाटील यांची भेट घेतली. त्या भेटीनंतर शिक्षणमंत्री श्रीमती पाटील यानी प्राध्यापकाना बोलाविले व आपण काही करू शकत नाही असे सांगितले. बाईंचा दोर कसला होता ? पिळलेला होता की पुढचा बांधण्यासाठी वाणी वापरतो तसला होता ? बाईंनीच सांगितल्याप्रमाणे त्या दिलेला शब्द मागे घेत नाहीत ! मग त्यांच्यावर हा प्रसंग का आला ?

¤

गोखले कॉलेजमधील व्यवहारांच्या तपशिलाला हात घालण्यापूर्वी एम. आर. देसाई यांचा सरकारवर प्रभाव कसा आहे हे पाहणे

आवश्यक आहे श्रीमती प्रतिभा पाटील यांनी प्राध्यापकांना विज्ञान-शाखा चालविण्यास देण्याचा प्रस्ताव मांडला. तो त्यांना मागे घ्यावा लागला. मुख्य मंत्री वसंतराव पाटील यांच्या दबावामुळेच श्रीमती पाटील यांना आपले शब्द गिळावे लागले. राज्यात शिक्षणसंस्था चालविणाऱ्या संस्थांचे एक संचालकमंडळ आहे. त्या मंडळाचे अध्यक्ष मुख्य मंत्री वसंतराव पाटील आहेत. सांगलीच्या शांति-निकेतन व स्वामी विवेकानंद या संस्थांचे अध्यक्षपदही अजूनपर्यंत वसंतराव पाटील यांच्याकडेच होते. गोखले कॉलेजमध्ये जे व्यवहार आहेत त्याच्यापेक्षा वेगळे व्यवहार या संस्थांमध्ये नाहीत, त्यांचे प्रमाण कमीजास्त असेल ! जर का गोखले कॉलेजची विज्ञानशाखा प्राध्यापकांना चालविण्यासाठी दिली तर अन्य ठिकाणांहून अशी मागणी पुढे येईल व अंधारातील व्यवहारांवर प्रकाशझोत पडेल ही भीती होती. शिक्षणसंस्था संचालकमंडळाचे अध्यक्ष वसंतदादा असल्यामुळे संस्थाचालकांनी विज्ञानशाखा प्राध्यापकांच्या ताब्यात देऊ नये असा आग्रह धरला. मुख्य मंत्री पाटीलही, त्यामुळे एकदा अशी प्रथा सुरू केली की अन्य संस्थाही सरकारला चालवायला द्याव्या लागतील किंवा प्राध्यापकांच्या ताब्यात द्याव्या लागतील असे म्हणू लागले !

शिक्षणसंस्थांच्या संचालकमंडळाचे अध्यक्ष व मुख्य मंत्री पाटील यांच्या या भूमिकेमुळेच शिक्षणमंत्री प्रतिभा पाटील यांचा शब्द वर्फाप्रमाणे वितळून गेला व मी काही करू शकत नाही असे त्यांना सांगावे लागले.

### दुसरे कारण : कर्नाटकात

शिक्षणसंस्थांशी दादाचे जे संबंध आहेत त्या संबंधाचा हा परिणाम आहे हे एक कारण झाले. दुसरे म्हणजे कर्नाटकचे मुख्य मंत्री देवराज अरस यांनीही महाराष्ट्राचे मुख्य मंत्री वसंतराव पाटील यांची भेट घेऊन गोखले कॉलेजप्रकरणी एम. आर. देसाई यांच्यासाठी दोनतीन वेळा मध्यस्थी केली आहे. गोखले कॉलेज ज्या शिक्षणप्रसारक मंडळाचे आहे, त्या मंडळाचे अध्यक्ष पाटील हे कर्नाटकचे समाजकल्याणमंत्री आहेत. समाजकल्याणमंत्री पाटील यांच्यामागे कर्नाटकचे सत्तर (७०) आमदार आहेत. देवराज अरस यांच्या खुर्चीखाली काँग्रेसजनांनी सुरुंग पेरले आहेत. अशा आणीबाणीच्या काळी ७० आमदारांचा पाठिंबा गमावणे अरस यांना परवडणारे नाही. प्राचार्य एम. आर. देसाई यांनी संस्थेचे अध्यक्ष व कर्नाटकचे समाजकल्याणमंत्री पाटील यांना मध्ये घातले आहे. देसाई-पाटील यांचे संबंध व व्यवहार लक्षात घेता पापाचा घडा फुटता कामा नये अशी दोघांची इच्छा आहे. कर्नाटकचे समाजकल्याण-मंत्री पाटील यांनी मुख्य मंत्री देवराज अरस यांच्यामार्फत मुख्य मंत्री वसंतराव पाटील यांच्याकडे संधान बांधले आहे, जनतालाटेमुळे काँग्रेस सत्तेवरून जात आहे. राज्यातील सत्ता गेली तर जनता-पक्षाला फावणार आहे. यासाठी कर्नाटकातील सरकार गडगडू नये म्हणून खबरदारी घेतली पाहिजे. ही खबरदारी घ्यावयाची असेल तर समाजकल्याणमंत्री पाटील यांचा पाठिंबा टिकविणे जरूर आहे असे देवराज अरस यांनी वसंतराव पाटील यांना सांगितले. अरस यांना पाटील यांच्या आमदारांचा पाठिंबा कायम ठेवायचा असल्याने त्यांनी गोखले कॉलेजप्रकरणी मुख्य मंत्री पाटील यांच्याशी बोलणी केली. एका बोलण्याच्या वेळी (ऑगस्टमधील) शिक्षणप्रसारक मंडळाचे अध्यक्ष व कर्नाटकचे समाजकल्याणमंत्री श्री. पाटील हे स्वतः हजर होते. शिक्षणसंस्थाचालकांचे अध्यक्ष म्हणून मुख्य मंत्री पाटील शिक्षणप्रसारक मंडळाच्या बाजूने उभे आहेतच; पण पक्षीय राजकारणाचा विचार करूनही मुख्य मंत्री पाटील कर्नाटकच्या मुख्य मंत्र्याच्या इच्छेनुसार गोखले कॉलेजला हात लावण्यास तयार नाहीत ! एम. आर. देसाई यांच्या पाठीशी मुख्य मंत्री वसंतराव पाटील का उभे आहेत याची ही दोन कारणे आहेत. म्हणूनच मुख्य मंत्री कोल्हापूर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष, त्याचप्रमाणे काँग्रेसच्या आठ आमदारांचा एम. आर. देसाई यांना विरोध असताही व त्यांची मागणी डावलूनही एम. आर. देसाई यांच्या मताविरुद्ध जाईल असा निर्णय घेण्यास तयार नाहीत.

### तिसरे कारण : दत्ताबाळ

माजी मुख्य मंत्री शंकरराव चव्हाण यांच्या कारकीर्दीतही हा प्रश्न निकालात निघाला नव्हता. दादांच्या कारकीर्दीमध्ये पक्षीय राजकारण व पदाधिकाऱ्यांचे हितसंबंध आडवे आले तर शंकर-रावांच्या कारकीर्दीमध्ये माजी मुख्य मंत्र्यांची भाविकता एम. आर. देसाई यांना उपयोगी पडली. शंकरराव चव्हाण व कोल्हापूरचे आमदार डी. वाय. पाटील यांचे संबंध महाराष्ट्राला परिचयाचे आहेत व डी. वाय. पाटील आणि कोल्हापूरचे एक प्रस्थ दत्ताबाळ यांचेही संबंध कोल्हापूरला माहिती आहेत. दत्ताबाळ हे एम. आर. देसाई यांचे चिरंजीव आहेत. शंकरराव चव्हाण यांना 'महाराज' किंवा 'महाराजांच्या जातीचे बुवा' यांचे किती वेड आहे हे सत्यसाई-बाबा यांच्या भक्तीवरून दिसून येते, त्यामुळे दत्ता मल्हार देसाई ऊर्फ दत्ताबाळ यांनी आपले पिता एम. आर. देसाई यांच्यासाठी शंकरराव चव्हाण यांच्याकडे शब्द टाकला म्हणून त्यांच्या कारकीर्दी-मध्येही गोखले कॉलेजच्या प्रश्न धसास लागला नव्हता. एम. आर. यांच्या पापाचा घडा भरत आला असला तरी प्राध्यापकांचे दुर्दैव संपले नसल्यामुळे त्यांची आपत्ती टळली नाही !

### जातीय चालबाजी

गोखले कॉलेजच्या प्राध्यापकांच्या प्रश्नाला एम. आर. देसाई यांनी जातीय स्वरूप देण्याचा प्रयत्न केला; पण तो यशस्वी झाला नाही असे प्रा. बी. ए. राऊत व प्रा. व्ही. ए. इंगवले आदींनी सांगितले. ही बहुजनसमाजाची संस्था आहे. तिच्याविरुद्ध कोर्टात केसेस घातल्या तर १९४८ सालाची पुनरावृत्ती होईल असे एम. आर. देसाई यांनी १३ जून १९७४ रोजी भाषण केले होते, अशी माहिती प्रा. राऊत यांनी दिली. आम्ही बहुजनसमाजाचेच आहोत, त्यामुळे एम. आर. यांच्या या अपप्रचाराचा परिणाम झाला नाही, असेही प्रा. राऊत म्हणाले

जातीचा प्रश्न कसा उपस्थित झाला याचे मासलेवाईक उदाहरण प्रा. राऊत यांनी सांगितले. आमच्या प्रश्नासंबंधी आम्ही सर्व पक्षांच्या पुढाऱ्यांना निवेदन पाठवून या प्रकरणात लक्ष घाला असे कळविले.

पृष्ठ ३१ वर

# अवती-भवती

शरद कृष्णन्

## □ दरबारी विदूषक–देवकांत बारुआ

तसा हा माणस लोकप्रिय कधीच नव्हता. याचे नेतृत्वही काही जनसामान्यांच्या पाठिंब्यावर उभे राहिले नव्हते. ज्याची खुर्ची बळकट त्याच्या पाठी हा घट्ट उभा राहिला आणि याच पुण्याईवर बघताबघता कॉंग्रेसपक्षाचा अध्यक्षही झाला. त्याला कोणी फारसे गंभीरपणे घेत नव्हते अथवा त्याच्या एकदर वर्तनाबद्दलही फारशा प्रतिक्रिया नव्हत्या. राष्ट्रीय स्तरांवरल्या नेत्याची जशी दखल घेतली जाते, तशी त्याची कधीच घेतली गेली नाही. अलाहाबाद न्यायालयाच्या निर्णयापासून इंदिराजींना वाचविण्याचे प्रयत्न चालू असतानाच त्याने 'इंदिरा इज इंडिया' सारखी खुळचट घोषणा केली आणि या गृहस्थाबद्दल विलक्षण तिरस्काराची लाट देशात सर्वत्र उमटली. आपली दखल घेतली जात नाही अशी जी त्याची तक्रार होती ती प्रथमच दूर झाली त्याच्या या ऐतिहासिक आचरट विधानाची दखल घेतली गेली आणि आसाममधून आलेला हा गृहस्थ आज बदललेल्या परिस्थितीमध्ये इंदिराजींच्या विरोधात उभा असला तरी *'इंदिरा इज इंडिया' हे त्याचे विधान त्याचा पिच्छा* सोडीत नाही. जनार्दन ठकूर यानी 'ऑल द प्राइम मिनिस्टर्स मेन' या आपल्या पुस्तकामध्ये राजकीय वर्तुळामध्ये विदूषक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या देवकांत बारुआ नामक गृहस्थाची बरीच तपशीलवार दखल घेतली आहे. 'ऑन लूकर' या पाक्षिकाने आपल्या ताज्या अंकामध्ये या बारुआ–अध्यायाला जागा दिली आहे.

जयप्रकाश नारायण यानी एकदा 'दरबारी विदूषक' अशी बारुआची संभावना केली होती या गृहस्थाला हे वर्णन इतके अचूक लागू पडले की पुढे अनेक वेळा त्यांचा याच शब्दात उल्लेख करण्यात आला. जे. पीनी 'दरबारी विदूषक' अशी पदवी बहाल केली असली तरी बारुआजी काही विदूषक नव्हते. काही विदूषकी चाळ्यांचा– आणि विधानांचा मुखवटा मात्र त्यानी जरूर चढविला होता त्या मुखवट्याआड एक धूर्त राजकारणी दडली होता. सत्ताधाऱ्याकडून होणारे प्रहार झेलत– त्यांच्यावर स्तुतिसुमने उधळीत– स्वतःचे स्थान बळकट करण्याची जी एक चिवट राजकीय वृत्ती असते ती बारुआंजवळ होतीच. १८ जून १९७५ रोजी बोटक्लबवर संजयाच्या पुढाकाराने,– बाईंच्या पुरस्कारासाठी जो एक मेळावा दिल्लीमध्ये भरविण्यात आला होता त्या मेळाव्यामध्ये बारुआंना पाहिल्यावर काहीसा चिडून संजय म्हणाला होता– हा विदूषक आता येथे काय करतो आहे ? देवकान्त बारुआबद्दलची ही भावना एवढा एकच जे. पी. आणि संजय गांधी यांच्यामधील समान दुवा असावा. स्वत.चे खरे व्यक्तिमत्त्व लपवून एक वेगळीच प्रतिमा निर्माण करण्याची हातोटी या गृहस्थाला उत्तम साधली होती मातब्बर व्यक्तीचे चुकीचे दाखले देण्याची– *आणि आपल्या विद्वत्तेचे*. प्रदर्शन करण्याचीही त्याना दांडगी हौस होती. राजकीय मंडळीबरोबर गप्पा मारताना आपल्या व्यासंगाचे प्रदर्शन करण्याची बारुआना खोड होती ज्यांचे ज्ञान त्यांना नाही असा विषयच नसल्यामुळे नाट्य धर्म, चालू राजकारण, जातिव्यवस्था, सेक्स,... कोणताही विषय असू द्या, बारुआजी तावातावाने आणि अधिकारवाणीने बोलणार. ऐकणारा अवाक् होऊन म्हणायचा गृहस्थ मोठा चतुरस्त्र आणि ज्ञानी दिसतो हो ! इंदिरा गांधीच्या मागेमागे करून अधिक पातळ शब्दामध्ये सांगायचे तर त्याची उदंड चमचेगिरी करून बारुआनी कॉंग्रेसचे अध्यक्षपद मिळविले होते आणि सत्तेवर असलेल्या व्यक्तीचे स्वस्ते स्तोम माजवून,या ऐतिहासिक पदाचे पूर्ण अवमूल्यन करून टाकले वास्तविक चांगले केंद्रीय मन्त्रिपद सोडून ते राजीखुशी कॉंग्रेस अध्यक्ष झाले तेव्हा त्यांचे काही आडाखे होते– 'प्रतिकामराज' बनण्याची महत्त्वाकाक्षा होती; पण झाले उलटेच– कोणाही अध्यक्षाला कधीही स्वीकारावी लागली नाही अशी नामुष्की त्यांना स्वीकारावी लागली. कम्युनिस्टांचा सतत पाठपुरावा करून *आपण कडवे डाव्या विचारसरणीचे आहोत अशी त्यानी स्वतःची* प्रतिमा तयार करून घेतली होती त्यामुळे कॉंग्रेसमधील डावे शोधीत बसणाऱ्या उजव्या कम्युनिस्टाचा त्यांना जोरदार पाठिंबा मिळाला. स्वतःला नेहरूंच्या विचारसरणीचा समाजवादी म्हणवून घेण्याची त्याना दांडगी हौस होती आणि आपल्या भाषणातून ते नेहमी याचा उल्लेखही करीत असत. बाईंनी गृहस्थ उपयोगी पडणारा आहे हे ओळखून स्वतःच्या स्वार्थासाठी त्याच्या महत्त्वाकांक्षेला वाट मोकळी करून दिली होती.

आज ६३ वर्षांचे असलेले बारुआ–मूळचे लेखक–कवी–पत्रकार आसामी कवितांमध्ये नवा पायंडा पाडणारे कवी असाही त्याचा उल्लेख केला जातो. १९३० मध्ये एकदा आणि पुढे १९४० मध्ये त्यानी स्वातंत्र्यचळवळीमध्ये राजकीय कारणासाठी तुरुंगाची हवा खाल्ली आणि या भांडवलावर आपल्या राजकीय वाटचालीचा पाया पक्का केला. १९३८ ते १९४५ पर्यंत ते आसाम प्रदेश कॉंग्रेस समितीचे चिटणीस होते आणि १९४९ मध्ये विधानसभेमध्ये दाखल झाले. दिल्लीमधील हालचाली सुलभ व्हाव्यात म्हणून त्यांनी नेहरूचे जामात फेरोझ गांधी यांच्याबरोबर दोस्ती जमविली. नेहरूचे चिटणीस एम. ओ. मथाई यांनी या ना त्या निमित्ताने नेहरूंच्या पुढेपुढे करणारा, त्यांच्याजवळ जाण्यासाठी धडपडणारा आसामी म्हणून बारुआंचा उल्लेख केला आहे. पतियाळा आणि अन्य काही संस्थाने यांच्या विलिनीकरणातून पेप्सू नावाचे जे राज्य निर्माण करण्यात आले होते तेथील मध्य–विध निवडणुकांमध्ये पक्षहित सांभाळण्याची

जबाबदारी नेहरूंनी त्यांच्यावर सोपविली निवडणुकीच्या राजकारणात विशेषतः जाती-जमातीचे राजकारण खेळून निवडणुका जिंकण्यात आपण अगदी तज्ज्ञ आहोत असा बरुआ यांचा दावा होता आणि आहे. त्या वेळीही जातीय दृष्टिकोनातून तयार केलेला प्रत्येक मतदारसंघाचा एक नकाशा त्यांच्याजवळ होता राजकारण खेळण्याचा त्यांचा वकूब बेताचाच त्यामुळेच या जातीपातीच्या राजकारणापलीकडे त्यांची नजर पोचू शकली नाही. त्या वेळीही पेप्सूमधील निवडणुकांच्या वेळी त्यांनी याच आडाख्याचा वापर केला जवाहरलालजी पक्षाच्या आर्थिक व्यवहाराच्या बाबतीत विशेष जागरूक असत पेप्सूमधील आपली कामगिरी संपवून ही स्वारी परत आली त्या वेळी पक्षाच्या निवडणुकखर्चाबाबत हिशेब दिले नाहीत म्हणून त्यांची नेहरूंनी चांगलीच कानउघाडणी केली आणि काही काळ त्यांना लांबही ठेवले बरुआंजी पहिल्या लोकसभेचे सदस्य होते; परंतु पुढील निवडणुकांचे वेळी त्यांना तिकिट नाकारण्यात आले. दिल्लीमध्ये सध्या तरी डाळ शिजण्यासारखी नाही हे हेरून त्यांनी आपला मोर्चा आपल्या स्वतःच्या राज्यात म्हणजे आसाममध्ये वळविला आणि चौदा वर्षे प्रांतिक राजकारणामध्येच खर्ची घातली. सर्व शक्तीनिशी धडपड करूनही आसाममध्ये त्यांना मान्यताप्राप्त नेता म्हणून कधीही स्थान मिळू शकले नाही राजकीय नेत्याला—सार्वजनिक कामाची जोड असल्याखेरीज त्याचे नेतृत्व आकारास येत नाही आणि बरुआजींचे सार्वजनिक काम तर जवळजवळ शून्यच. त्यातून त्या वेळी आसामचे मुख्य मंत्रिपद सांभाळणारे चालिहा चांगले मुरलेले नेते. बरुआंचा आचरटपणा आणि पुढेपुढे करण्याची वृत्ती त्यांना फारशी पसंत नसे. असे असले तरी आपल्या पद्धतीने बरुआ पुढे सरकत होतेच. या चालिहाजींचे मंत्रिमंडळामध्ये त्यांचा शिक्षणमंत्री म्हणून समावेश करण्यात आला आपण केलेल्या कामाची उगाळणी करीत राहण्याची बरुआंना दांडगी हौस शिक्षणमंत्री झाल्यावर त्यांनी पहिले जाहीर विधान केले ते असे की मी खोट्या सर्टिफिकिटच्या आधारे नोकऱ्या मिळविलेल्या ३८५ शिक्षकांना नोकरीवरून दूर केले; पण एकाने हू का चू केले नाही बारिकसारिक गोष्टींचा बडेजाव करण्याची वृत्ती आणि मंत्र्याला जे पथ्य पाळावे लागते ते न सांभाळता येण्याची कुवत यामुळे चालिहांनी मंत्रिमंडळातून त्यांची हकालपट्टी केली उगाच दुसऱ्याच्या मंत्रिमंडळामध्ये रहाच कशाला—आपणच नेता व्हावे आणि स्वतःचे मंत्रिमंडळ बनवावे असे त्यांच्या मनाने घेतले आणि त्यांनी चालिहांना आव्हान दिले आणि स्वारी चारही मुंड्या चीत झाली! याच पराभवापासून त्यांना उच्च जातीवरून-ब्राह्मणाबद्दल तिरस्कार वाटू लागला. गोरगरिबांचा-हरिजनांचा कैवारी अशी स्वतःची प्रतिमा तयार करण्यास त्यांनी प्रारंभ केला. उच्च जमातीच्या सदस्यांनी आपल्याला नेतेपदाच्या निवडणुकीमध्ये दगा दिला ही गोष्ट ते कधीही विसरू शकले नाहीत ब्राह्मणांचा द्वेष ही गोष्ट त्यांच्या पुढील राजकीय हालचालींचा स्थायीभाव बनली. ब्राह्मणमंडळी म्हणजे आचारी आहेत आणि त्यांच्या गळ्यामधली जानवी ही बुटांची लेस म्हणून वापरण्यास योग्य आहेत, यासारखी प्रक्षोभक विधाने करून त्यांनी इतरेजनांचे नेतृत्व मिळविण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी निवडणुकींच्या राजकारणामध्ये जातीय विचारांना त्यांनी जाणीवपूर्वक वाव दिला.

आपण मागासजातीचे नेते आहोत असे ते स्वतःच सांगत सुटले पुढे इंदिराजींच्या अमदानीमधील आणीबाणीपर्वामध्ये त्यांनी आसाममध्ये राजकीयदृष्ट्या बोजड ठरणाऱ्या मंडळींना ठिकाणी बसविण्याची कामगिरी पार पाडली.

१९७१ च्या फेब्रुवारीमध्ये दुर्दैवी बिहारच्या माथी बरुआंना राज्यपाल म्हणून बसविण्यात आले आसामबाहेर पडतानाच त्यांनी इंदिराजींची वारेमाप स्तुती हेच आपल्या राजकारणाचे मुख्य सूत्र बनविले १९७१ मध्ये तर इंदिराजींचे वादातीत नेतृत्व प्रस्थापित झाले होते. राज्य च्या राज्यपालांना, मुख्य मंत्र्यांना बोलावून कठोर शब्दांमध्ये कानपिचक्या देण्याइतकी त्यांची ताकद वाढली होती. वास्तविक राज्यामधल्या राजकारणाशी राज्यपालाचा काही संबंध नाही, तो नसावाच असा एक संकेत आहे परंतु विविध राज्यांमधील काँग्रेसपक्षाचे स्थान बळकट करण्यासाठी राज्यपालांचा सरसहा वापर करण्यास इंदिराजींनी प्रारंभ केला आणि काँग्रेसपक्ष म्हणजे इंदिरा गांधी असे सूत्र प्रस्थापित झाल्याने राज्यामध्ये स्वतःच्या गटाचा पुरस्कार करणाऱ्या मंडळींना वाव देण्याचे तंत्र बाईंनी आरंभिले. राज्यपालांनी काँग्रेसला विशेषतः इंदिरा गांधी यांना अनुकूल ठरेल अशा पद्धतीने राजकारणामध्ये भाग घेतला तर दिल्ली प्रसन्न होते असे बरुआजींच्या लक्षात आले हरियानाचे राज्यपाल चक्रवर्ती यांनी धडा घालून दिलाच होता—बरुआजीही त्याच वाटेने निघाले. त्या वेळी बिहारमध्ये विरोधीपक्षांच्या संयुक्त आघाडीचे सरकार होते आणि बरुआजी बिहारचे गव्हर्नर समाजवादी कर्पुरी ठाकूर यांच्या नेतृत्वाखालील हे संयुक्त सरकार नेस्तनाबूत करण्याचा निर्णय इंदिराजींनी केला यशपाल कपूर पाटण्यामधील एका पंचतारांकित निवासगृहामध्ये येऊन दाखल झाले आणि या गलिच्छ खेळाला प्रारंभ झाला. त्यांनी इंदिराजींच्या या योजनेचा पाठपुरावा करणाऱ्या मंडळींशी संपर्क साधला इंदिराजींना खूष करण्याची ही संधी बरुआ गमावणे शक्यच नव्हते. हवा कोणत्या दिशेने वाहते आहे हे त्यांनी जोखले आणि राज्याचा राज्यपाल म्हणून त्यांनी आपला अहवाल केंद्राला सादर केला. अर्थातच राज्यामध्ये राष्ट्रपतिराजवट आणण्याची शिफारस त्यांनी केली होती. संयुक्त विधायकदलाच्या मंत्रिमंडळाला मूठमाती दिल्यावर, येऊ घातलेल्या निवडणुकांमध्ये काँग्रेस यशस्वी होईल हे पहाण्याची जबाबदारी अर्थातच राजकारणाशी ज्याने अजिबात संबंध ठेवू नये अशी ज्याच्याबद्दल अपेक्षा होती त्या बरुआंना उचलावी लागली हे पवित्र कार्य त्यांनी तत्परतेने स्वीकारले. १९७२ मध्ये ज्या निवडणुका बिहारमध्ये झाल्या त्यापूर्वी काँग्रेसला वातावरण अनुकूल ठरावे म्हणून राज्यपालांनी आटापीटा करण्यास सुरुवात केली व्यवस्थापकीय कामाचे निमित्त करून त्यांनी राज्यामध्ये तुफानी दौरा केला. काँग्रेस यशस्वी व्हावी यासाठी सर्व प्रकारचे मार्ग अवलंबिले आणि राज्यपालांच्या जागेला काँग्रेस प्रचारकाचे स्थान आणून दिले. अर्थात त्या वेळीही जे बिहारमधील राजकारणाशी संबंधित होते त्यांना या गोष्टीची पूर्ण जाणीव होती. पुढे दिल्लीमध्ये आल्यावर त्यांनी आपल्या एका मित्राजवळ आपण बिहारमध्ये काँग्रेस निवडून यावी यासाठी किती आटापीटा केला होता याची शेखी मिरविली. त्या

पृष्ठ २५ वर

आर्थिक टिपणे :

# बोनस ! एक वचनपूर्ती !!

नारायण वैद्य । सभासद, पुणे महानगरपालिका

देशातल्या सरसकट सर्वकामगारांना कमीत कमी ८·३३ टक्के बोनस दिला जावा अशी घोषणा जनतासरकारच्या केंद्रीय मंत्रिमंडळाने नुकतीच केली. ही घोषणा आज ना उद्या होणार अशीच अपेक्षा अनेकांची होती. मार्च १९७७ मध्ये सार्वत्रिक निवडणुकीचे वेळी जनतापक्षाने निवडणूकजाहीरनाम्यात बोनसबाबतचे आश्वासन जनतेला दिले होते ते पूर्ण केल्याबद्दल जनतासरकारला खरोखरच धन्यवाद द्यावेसे वाटतात. प्रथम लोकसभेची निवडणूक आणि मग जनतापक्षाची रीतसर स्थापना, त्यात अजूनही पक्षसंघटनेच्या अनेक गोष्टी मार्गी लागण्याची प्रक्रिया चालू आहे, भाववाढीच्या संकटाने सरकारला घेरले आहे, चलनफुगवट्याचा धोका टळण्याचे दृष्टिपथात येत नाही. चालू वर्षाचे अंदाजपत्रकातला बराचसा भाग पूर्वीच्या काँग्रेसपक्षाने तयार केलेला व त्यात बदल करण्यास वाव कमी अशा परिस्थितीत जनतामंत्रिमंडळाने बोनसचा निर्णय एकमुखी घेणे ही संतोषजनक घटना होय. अनेक वेळा— काही वेळा अकारण— कोपरखळ्या मारून टीका करणारे विरोधी संसदपक्षनेते श्री. यशवंतराव चव्हाणही या निर्णयाबाबत चांगले बोलले यातच जनतापक्षाच्या कामगारविषयक पुरोगामी धोरणाचा गौरव आहे असे मानावयास हरकत नाही. केरळ सरकारने काही तास अगोदर केरळ राज्यापुरती ८·३३ टक्के बोनसची घोषणा केली म्हणून श्री. यशवंतराव या निर्णयाचे श्रेय केरळच्या (काँग्रेस ?) सरकारला देऊन टाकायला उतावीळ झाले आहेत. तसेच 'थोडासा श्रेय—वाटा' महाराष्ट्राच्या मुख्य मंत्र्यांनाही देऊ पहात आहेत; पण यातले राजकारण पचवून वर उपहासाचे ढेकर देण्यात जनता खूप शहाणी झाली आहे. आणीबाणीचा फायदा घेऊन श्रीमती इंदिराजींनी (म्हणजे काँग्रेसनेच) बोनस रद्द केल्याची घोषणा केली त्या वेळी 'देशाच्या आर्थिक परिस्थितीशी सुसंगत असा योग्य निर्णय' म्हणून हीच मंडळी वरपासून खालपर्यंत टाळ्या वाजवीत होती. त्या काळात केरळ सरकार, महाराष्ट्रातले ना. (श्री) वसंतदादा पाटील किंवा यशवंतराव चव्हाण याबाबतीत 'हे श्रीमती इंदिराजींचे कामगारविरोधी व चुकीचे धोरण आहे' असे जरी एखादे वाक्य बोलते (कृती बाजूला राहो) तरी आजच्या बोनसनिर्णयाचे श्रेय जनतेने त्यांना आपणहून दिले असते; परंतु वस्तुस्थिती सर्वांना माहीत आहे आणि काँग्रेसची श्रेय लाटण्याची तऱ्हा लोकांच्या परिचयाची आहे !

## बोनसबाबतची चूक—दुरुस्ती

यापूर्वीच्या काँग्रेससरकारने रोजगाराचे बाबतीत उद्योगधंदे-कारखाने यातील सहकार्यतत्त्व आणि शास्त्रीय पद्धती यांचा स्वीकार (Rationalization of Wage structure) केला नाही. इतक्या वर्षांच्या सत्तेच्या कालखंडात रोजगार (wage), उत्पन्न (income) व किंमती (prices) यांच्याशी सुसंगत राहील असे एक दीर्घकालीन पगार-धोरण पूर्वीच्या सरकारने आखले नाही की आखण्याचा प्रामाणिक प्रयत्नही केला नाही. तो न करता एकदम ८·३३ टक्के बोनस रद्द केला यापरता दुसरा मूर्खपणा नाही. आणीबाणीचे समर्थन करता यावे म्हणून उत्पादनवाढ व परकीय चलन गंगाजळी वाढविण्याचे सर्व भलेबुरे मार्ग वापरण्यात आले. 'भांडवलदारांनी इंदिरा-सरकारकडून उत्पादनवाढीच्या मोबदल्यात बोनस रद्द करून घेतला व काँग्रेसने लाखो रुपये कमावले' असे लोक बोलतात ते खरे वाटू लागले आहे. बोनसरद्दप्रकरणी कामगारांत विलक्षण असंतोष माजला. तो अनेक ठिकाणी संप—निदर्शनांच्या स्वरूपात आणीबाणीच्या काळातही पसरत होता; परंतु मिसाच्या भीतीमुळे व वृत्तपत्रांच्या मुस्कटदाबीमुळे जगाला फारसा कळत नव्हता. जानेवारीमध्ये 'ज्या कारखान्यांना नफा होतो त्या कारखान्यांनी प्रत्येक कामगाराला १९७६ साठी १०० रुपये बोनस द्यावा' असा फतवा सरकारने काढला व सरकारचे कामगारविषयक धोरण उदारपणाचे (Liberal) आहे अशी जाहिरात सुरू केली. यामध्ये एक मेख मारण्यात आली होती ती अशी की, 'फायद्यात असणाऱ्या उद्योगानेच' बोनस द्यावा अशी घोषणा असल्यामुळे व फायद्यात कारखाना दाखवावा की नाही याबाबतचे सर्व शास्त्र कारखानदारांना ज्ञात असल्यामुळे प्रत्यक्ष किती कामगारांच्या हातात बोनसची रक्कम पडेल याबाबत कोणालाच शाश्वती नव्हती म्हणून बोनसबाबतचा जनतासरकारचा निर्णय म्हणजे पूर्वीच्या काँग्रेससरकारची चूक दुरुस्त करून कामगारावर झालेला अन्याय निपटून काढण्याचा यशस्वी प्रयत्न होय !

## बोनस म्हणजे विलंबित वेतन

बोनसबाबतच्या घोषणेतील पहिली महत्त्वाची गोष्ट म्हणजे हा निर्णय १९७६ या वर्षापुरताच मर्यादित आहे. १९७६ मध्ये कोणत्याही तारखेचे आर्थिक वर्ष असणाऱ्या कारखान्याला किंवा उद्योगाला आपल्या कामगारांना ८·३३ टक्के बोनस दिला पाहिजे अशी सक्ती करण्यात आली आहे. १९७७–७८ या वर्षाबाबतचा आणि भावी काळासाठीचा बोनसनिर्णय अजून व्हावयाचा आहे व तो रोजगार (wage), उत्पन्न (income) व किंमत (price) यांचा समन्वय साधून घेतला जाईल अशी आशा आहे.

बोनसबाबतच्या घोषणेतील दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे तो नफ्याशी संबंधित ठेवलेला नाही ही होय. कारखान्याला नफा होवो वा न होवो, कामगारांना बोनस हा दिलाच पाहिजे. वरवर पाहता हे चमत्कारिक वाटते. त्याचे कारण 'बोनस म्हणजे बक्षिसी.' बक्षिसी म्हणजे मालकाने खूष होऊन दिलेली रक्कम, त्यासाठी मालकाला नफा हा व्हायः

लाच पाहिजे ' अशी अनेकांची कल्पना आहे; पण बोनस म्हणजे भीक नव्हे, तो हक्क आहे. कामगाराला जीवनवेतन (living wage) दिल्यानंतर कारखान्याचा 'नफा' सुरू होतो व मग त्या नफ्यातून कामगाराला 'हक्क' म्हणून बोनस मिळतो अशी मूळ कल्पना आहे; परंतु आपल्याकडे रोजगार–उत्पन्न–किमती' याबाबतचे राष्ट्रीय धोरण आखलेले नाही. त्यामुळे जीवनवेतनाची पातळी सारखी बदलत असते व सध्या कामगारांना जे प्रत्यक्ष वेतन (real wage) मिळते ते जीवनवेतनापेक्षा बरेच कमी असते म्हणून बोनस म्हणजे विलंबित वेतन (Deferred wage) ही कल्पना अनेकांसह बोनस रिव्ह्यू कमिशननेही मान्य केली आहे. त्यामुळे ज्याप्रमाणे सहा दिवस काम केल्यावर कामगाराला सात दिवसाचा पगार देण्याचे तत्त्व सर्वत्र मानले गेले आहे त्याचप्रमाणे बारा महिने काम केल्यावर तेरा महिन्याचा पगार हे बोनसचे तत्त्व मानले जाणे आवश्यक आहे हा पगार दिल्यानंतरच नफा सुरू होईल व या तत्त्वाप्रमाणे बोनसचे प्रमाण ८·३३ टक्के पडेल.

## बोनसला विरोध का?

८·३३ टक्के कमीत कमी व २० टक्के जास्तीत जास्त बोनस दिला पाहिजे या सरकारच्या घोषणेवर काहींनी आक्षेप घेतले आहेत. या आक्षेप घेणाऱ्यांनी टीकेचे अनेक मुद्दे उपस्थित केले आहेत. त्यापैकी पहिला म्हणजे 'चलनवाढीचा धोका,' दुसरा मुद्दा म्हणजे 'तोट्यात चालणारे कारखाने बोनस कसा देणार?' व तिसरा म्हणजे 'जे कारखाने आर्थिक दृष्ट्या सीमारेषेवर (at the margin) आहेत त्यांचेबाबत उत्पादनाला खीळ पडण्याचा वा मंदीचा धोका संभवतो!

बोनसच्या देशव्यापी रकमेमुळे चलनवाढ (inflation) खरोखर होईल काय? किंवा किती प्रमाणात होईल? याबाबत अनेक प्रामाणिक मतभेद आहेत. सक्तीची ठेव योजना (CDS) सरकारने काही वर्षांपूर्वी सुरू केली. पगारवाढीपोटी द्यावयाची रक्कम त्या वेळच्या सरकारने सक्तीची ठेव म्हणून सर्वांकडून घेतली. ही रक्कम (१०४३ कोटी रुपये?) रोख का दिली नाही? एक तर सरकारजवळ देण्यासाठी पैसा नसावा म्हणून बुक अॅडजस्टमेंट केली असावी किंवा नवीन नोटा छापण्याची वेळ येऊ नये कारण त्यामुळे चलनवाढ होईल असाही विचार झाला असावा. म्हणजे चलनवाढ जर का होणार होती तर ते सकट त्या वेळच्या सरकारने लांबणीवर टाकले एवढेच आता सक्तीची ठेव परत केल्यामुळे ३२६ कोटी रु. व बोनसमुळे सुमारे २०० कोटी रुपये असे एकूण ५२६ कोटी रुपये देशाच्या चलनात जादा येतील व त्यामुळे चलनवाढ होईल असे टीकाकार म्हणतात. यापूर्वी अनेक वेळा अनेक स्तरावर महागाईभत्तावाढ किंवा पगारवाढ केली जात होती, काही प्रमाणात बोनसही अनेक ठिकाणी दिला जात होता. त्या वेळी चलनवाढ होत नव्हती का? त्या वेळी होत होती तर आताही होणार व ते आपल्याला गृहीत धरूनच पुढे गेले पाहिजे तसेच कामगारांच्या हातात पैसा खेळू लागला की ते बाजाराकडे खरेदीसाठी धावत सुटतील व त्यामुळे किंमती वाढतील असेही सांगितले जाते. किंमती वाढण्याचे हेच कारण असेल तर मग कामगारांचा बोनस व पगारवाढ करायचाच नको किंमती वाढविण्यामागे अधिक नफा कमविण्याचा व्यापाऱ्यांचा हेतू असेल तर त्याचा बंदोबस्त सरकारने करावा, त्याला जनता पाठिंबाच देईल तसेच या ५२६ कोटीमुळे चलनवाढ होणार असेल तर ते आव्हान कामगारांनी स्वीकारून उत्पादनवाढीचा मार्ग अनुसरला पाहिजे. मला वाटते जी ५२६ कोटी रुपयांची रक्कम देशाच्या नाणे–बाजारात (money market) जादा येईल असे म्हटले जाते ते शंभर टक्के बरोबर नाही. ती रक्कम आजही नाणे–बाजारात आहेच; परंतु ती वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या स्वरूपात आहे, बँकांकडे ठेवीच्या रूपात आहे. कारखान्यांत मालाच्या रूपात आहे, मालकांकडे किंवा व्यवस्थापनाकडे रोखीच्या स्वरूपात आहे. ती फक्त स्थलांतरित वा रूपांतरित होत आहे एवढेच. ५२६ कोटी रुपयांपैकी १२५ ते १५० कोटींनी चलनवाढ होणे शक्य आहे ती थोपवून धरण्यासाठी सरकारने राष्ट्रीय विकास कर्जरोखे आकर्षक व्याजदराने (१३ टक्के सरळव्याज) काढले आहेतच. त्याद्वारे सदरची रक्कम सरकारकडे परत येईल त्यामुळे चलनवाढीचा धोका तात्पुरता टळेल. प्रत्येक वर्षी बोनसप्रकरण येणार व अधूनमधून महागाईभत्तावाढ व पगारवाढ येणार त्यामुळे प्रत्येक वेळी चलनवाढीचा धोका आहे! सावधान!!' असा गदारोळ उठविणाऱ्यांना सांगावेसे वाटते की काटकसर, निर्यात उत्पादनवाढ व जीवनावश्यक वस्तूंचे अधिक उत्पादन व स्वस्त वितरण हे चलनवाढ कमी करण्याचे मार्ग सर्वांनी वापरावेत, तेच अंतिम हिताचे आहे.

आता प्रश्न शिल्लक राहतो तो जे कारखाने तोट्यात चालतात किंवा जे नफा–तोट्याच्या सीमारेषेवर आहेत त्यांचा. बोनस हा नफ्याचा हिस्सा नाही. ते एक पगारापोटी देणे आहे असे एकदा गृहीत धरले म्हणजे तोटा काही प्रमाणात वाढेल. अशा कारखान्यांना बोनस अॅक्टच्या कलम ३६ प्रमाणे अपवाद करण्याची मागणी करण्याची तरतूद आहे. त्याचा आधार घेता येईल. तसे सरकारने जाहीरही केले आहे. उपलब्ध जादा रक्कम ठरविताना (Deterrmination of available surplus) गुंतवणुकीवर आकारली जाणारी रक्कम (investment–allowance) विचारात घ्यावयास सरकारने जागा ठेवली आहे तसेच बोनसवाटप करताना जे करार करण्यात येतील ते उत्पादन व उत्पादकता यांच्याशी संबंधित असेच करार होण्यावर भर दिला जाईल असेही आश्वासन सरकारतर्फे देण्यात आले आहे.

जे कारखाने आज अगदी अल्पप्रमाणात फायद्यात दिसतात किंवा जे प्रगतिपथावर आहेत परंतु अजून फायद्याच्या कक्षेत आले नाहीत त्याचेबाबतीत मोठे आर्थिक संकट यामुळे उभे राहील अशी जी तक्रार आहे ती बरीचशी रास्त आहे. अशा कारखान्यांना मंदीचा तडाखा बसेल अशी भीती व्यक्त केली जाते. त्यांना वर सांगितलेल्या उपायांचा आधार तर घेता येईलच; परंतु सरकारने जे राष्ट्रीय विकासकर्जरोखे काढण्याचे ठरविले आहे त्यांतली काही रक्कम अल्प दराने या कारखान्यांना ठराविक मुदतीकरीता वापरण्यास दिली किंवा त्या कारखान्यांमध्ये तेथील कामगारांनी स्वेच्छेने बोनसमधली रक्कम ठेव म्हणून ठेवली तर अशा कारखान्यांना निश्चितपणे मदत होईल. अशा कारखान्यांतील कामगारांनीही काट-

कसर व उत्पादनवाढ याबाबत पुढाकार घेऊन कारखान्याची घडी विसकटणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. नाही तर रोजगार (employment) व उत्पादन यावर विपरीत परिणाम होण्याचा धोका आहे. त्यातून काही कारखाने बंदही पडतील.

बोनसच्या या निर्णयामुळे मात्र भिन्नभिन्न औद्योगिक क्षेत्रातील पगारपातळीत तसेच ग्रामीण व शहरी भागांतील पगारपातळीत निश्चितपणे फरक पडेल. त्याबाबत सरकारला योग्य ते धोरण लवकरच आखावे लागेल असे वाटते. नाही तर एक प्रश्न मिटविण्यासाठी दुसरा प्रश्न सुरू केला असा याचा अर्थ होईल.

### चलनवाढ 'या'मुळे झाली ?

महाराष्ट्र राज्यात सरकारी स्तरांवर काम करणाऱ्या ४४ महामंडळांची पुनर्रचना करण्याच्या विषयाचा अभ्यास करून निवेदन देण्यासाठी सरकारने श्री. डी. डी. साठे यांची -समिती नेमली होती. श्री. साठे हे महाराष्ट्र सरकारचे पूर्वीचे मुख्य सचिव असल्यामुळे या ४४ महामंडळांपैकी अनेक महामंडळांची स्थापना कोणत्या परिस्थितीत झाली, नेमके कोणते कार्य ही महामंडळे करतात, त्यांची आवश्यकता कितपत आहे इ. प्रशासकीय ज्ञान श्री. साठे यांना चांगलेच अवगत असणार. त्यामुळे त्यांनी केलेल्या या विषयावरच्या शिफारशी वास्तववादी व सरकारने स्वीकाराव्यात अशाच असतील यात शंका नाही. या सर्व महामंडळांच्या अनुत्पादित कार्यामुळे सरकारला सुमारे १०० कोटी रुपयांचा फटका बसला आहे असा तज्ज्ञाचा कयास आहे. पराभूत आमदार, खासदार' मंत्री आणि ज्यांना निवडणुकीच्या काळात अनेक वचने व आमिषे दिली जातात त्या काँग्रेसपक्षातील वर्णीगव्हाद्दरांसाठी ही विशेष व्यवस्था आहे असा सर्वत्र समज आहे.

□

# टेक इट लाइटली

संजीव मंगरूळकर

## □ पुनरागमनाय च

तेव्हा आता एक गोष्ट तरी अगदी नक्की झाली—बाई राजकारणात पुन्हा प्रवेश करणार. अगदी नव्या जोमाने, नव्या उत्साहाने आता पुन्हा एकदा इंदिराबाईंचे नाव राजकारणाच्या गडबडगोंधळात आम्हाला ऐकू येणार. त्यांच्या तडफदार व्यक्तिमत्त्वाची झलक कुठेकुठे दिसत राहणार. त्यांच्या सडेतोड वक्तृत्वाची धार कुठेकुठे बोचत राहणार. म्हणजे एकूण त्यांचं अस्तित्वच असं सारखं तुम्हाआम्हाला कुठे ना कुठे तरी डाचत (म्हणजे जाणवत) राहणार; पण हाही अनुभव आपल्याला काही नवीन नाही. बाईंची तडफ आपण अगदी मनसोक्त अनुभविली आहे. त्यांच्या वाणीची धारही अगदी पोटभर पचविली आहे. तेव्हा आपण तसे निढावलो आहोत. चक्क कोडगे झालो आहोत. म्हणजे 'बाई आल्या' असं कुणी एकदम ओरडलं तर अजूनही भीती वाटेल, नाही असं नाही; पण त्यात वेगळं असं विशेष काहीच वाटणार नाही. सगळं सरावाचंच वाटेल, अगदी रोजच्या सरावाचंच !

का कोण जाणे, पण माझ्या काही मित्रांना उगीचच वाटून राहिलं होतं की, आता इंदिराजींचा राजकीय अस्त झाला; आता काही त्यांना भिण्याचं कारण नाही. कारण रायबरेलीतल्या निवडणुकीत त्या पडल्या याचा अर्थ त्यांचा जणू पुरताच नायनाट झाला; तेव्हा या धक्क्यातून त्या काही कधीच सावरणार नाहीत. त्यांचं नावसुद्धा आता कुठं फारसं ऐकू येणार नाही; पण बाईंच्या बाबतीत असं काहीच खात्रीनं सांगता येत नाही. त्यांचं व्यक्तिमत्त्व तसं बरंच वादळी वगैरे आहे. त्यामुळं कोत्या अनुभवावर आपण बांधलेले आडाखे त्यांच्यापुढे अगदीच मूर्खपणाचे ठरतात. अगदी भल्याभल्यांचे अंदाज बाई सहज धुळीला मिळवितात. दोन वर्षांपूर्वीच अलाहाबाद हायकोर्टाने बाईंची निवड रद्द ठरविली होती. तेव्हा देखील काही राजकीय मूर्खांनी बाईंबद्दल अंदाज व्यक्त केले होते. त्यांना वाटलं आता बाई राजीनामा देऊन आपली आणि पंतप्रधानपदाची प्रतिष्ठा एकदम उंचावून टाकतील; पण हा अंदाज मूर्खपणाचा होता. राजकीय परिस्थितीच्या अपुऱ्या आकलनावर आधारित होता. कारण देश आधीच (आणि नेहमीप्रमाणेच) संकटात सापडलेला, महागाई, असंतोष, भ्रष्टाचार वाढलेला, शेजारी राष्ट्रांपासूनही (नेहमीचाच) कोण धोका आणि हे सगळं सावरायला दुसरा राष्ट्रीय नेताच नाही ! अशा परिस्थितीत केवळ आपली आणि आपल्या पदाची प्रतिष्ठा वाढविण्यासाठी बाई आपले पंतप्रधानपद सोडतील हे कसे शक्य होते ? पण आमचे राजकीय निरीक्षक नैतिकता, सत्यप्रियता; त्याग यांसारख्या तत्त्वांचाच खेळखंडोबा घालून बसले. त्यांनी बाईंच्या प्रतिष्ठेची आणि नैतिकतेची भलतीच सांगड घातली आणि मग त्यांचे अंदाज पुरते कोसळले. राजीनामा दूर राहोच, बाईंनी सगळ्या राष्ट्राची सुधारणा एकटीच्या जोरावर एकदम करण्याचा निर्णय घेतला आणि आणीबाणी सुरू झाली. पुन्हा एकदा आमच्या राजकीय निरीक्षकांनी दिलासा दिला—देशातली परिस्थिती लवकरच सुधारेल आणि मग लगेचच आणीबाणी उठेल. पुन्हा एकदा लवकरच आपण स्वतंत्र होऊ; पण हाही अंदाज मूर्खपणाचा होता. आणीबाणी म्हणजे देशातल्या सगळ्या समस्यांवरचा रामबाण उपाय होता आणि देशापुढच्या समस्या कधी संपतात थोड्याच ? तेव्हा ही आणीबाणीही कायम राहणार अशी चिन्हे दिसू लागली. तसा अंदाजही काही मंडळी भीत भीत करू लागली. तोच बाईंनी निवडणुका जाहीर करून आम्हाला वेड्यात काढले. बाईंच्या झंझावाती नेतृत्वाचा पुन्हा एकदा आम्हाला अनुभव आला. निवडणुकीच्या निर्णयाबद्दलही कुणाला फारसा संदेह नव्हताच. नेहमीच्या

सवयीनुसार बाई जिंकणार याची खात्री पुरेपूर होतीच. तर तिथे बाई अचानक पडल्या, अगदी सपशेल पडल्या! पुन्हा एकदा राजकीय निरीक्षकांना धक्का बसला !

बाईंचं व्यक्तिमत्त्व वादळी आहे, ते असं शहाणपणानं विचार करून बाईंच्याविषयी कुठलाही अंदाज बांधणं, कुठलाही निष्कर्ष काढणं हे मूर्खपणाचं लक्षण आहे. अगदी बाईंचा निवडणुकीत पराभव झाला तरी मंडळींची फसगत होतच राहिली. त्या रात्री इंदिराबाईंचा निवडणुकीत पराभव झाल्याची बातमी रेडिओवर आली आणि घाबरून माझा एक मित्र झोपला. जणू आपण ही बातमी ऐकलीच नाही ! न जाणो, पराभव झाल्यामुळे बाई चिडायच्या आणि उद्या विचारायच्या कुणी कुणी ही बातमी ऐकली ? पकडा त्याला ! बाईंचं काही सांगता येत नाही !

पण तसंही काही झालं नाही. बाईंनी जनतेचा कौल ऐकला. अगदी शिरोधार्थ मानला आणि धीरोदात्तपणे त्यांनी आपल्या पदाचा त्याग केला. आमच्या कित्येक निरीक्षक मित्रांना या शांतपणाचही आश्चर्य वाटलं. त्यांची खात्री झाली की, आता बाई राजकीय संन्यास घेणार ! त्यांना सत्तेचा लोभ आता उरलेला नाही. हुकुमशाहीची त्यांची हौसही फिटली असावी. त्या आता बऱ्याच निवळल्या आहेत. इतकेच नव्हे तर त्यांच्यात देवभाव जागा झाला असून त्या वृत्तीने धार्मिक बनल्या आहेत; पण इथेही इंदिराजीनी या अंदाजांना अस्मान दाखविलं. बाईंचं नाव हळूहळू ठिकठिकाणी राजकारणात ऐकू येऊ लागलं. त्यांच्या मुलाखती रसाळ बनू लागल्या. एकदा त्यांनी तर चक्क संजय गांधींचंही समर्थन केलं. त्यांच्या निष्पापपणाची ग्वाही दिली. संजय गांधींना पाठिंबा देणे हे आजकाल फार मोठ्या धैर्याचे आणि धाडसाचे लक्षण समजतात. बाईंनी असे वेडे धाडस करावे याबद्दल बऱ्याच मंडळींना आश्चर्य वाटले. काहींना त्याची खंत वाटली; पण मातृप्रेम असेच विचित्र आणि बलवत्तर असते.असा खुलासा करून मंडळींनी आपले समाधान केले. अगदी पंतप्रधान असल्या तरी अखेर इंदिराजीदेखील 'आदर्श माता' आहेतच आणि संजयसारखा मुलगा झाला म्हणून मातृप्रेम उणावते थोडेच !

बाईंची राजकीय हालचाल यानंतर थोडी अधिक संशयास्पद झाली. त्यांनी एक दिवस सरळ पवनारला उड्डाण केले आणि पूज्य विनोबा भावे यांच्याशी बातचीत केली. विनोबाजी हेही आजकाल बरेच गूढ आणि अगम्य बनत चाललेले. आणीबाणीला 'अनुशासन–पर्व' असं कठीण नाव देऊन त्यांनी आमच्या मनात गोंधळ निर्माण केलाच; पण शिवाय आणीबाणी ऐन रंगात आली असतानाची गोष्ट. देशातले तमाम जागरूक नागरिक त्या वेळी व्यक्तिस्वातंत्र्य, अभिव्यक्तिस्वातंत्र्य, स्वातंत्र्य की भाकरी यांसारख्या बऱ्याच गूढ आणि विवाद्य प्रश्नांवर विचार करीत होते. त्या वेळी विनोबांनी जनतेला 'लोणी खा !' असा एक संदेश दिल्याचे ऐकले. तेव्हा त्या काळाच्या संदर्भात लोणी खाण्याच्या या संदेशाचे औचित्य काय असावे, याचा उलगडा माझ्या सामान्य मेंदूला कधीच होऊ शकला नाही. असो. तर अशा विनोबांना बाई भेटल्या. इतकेच नव्हे तर त्यांच्यात चर्चेच्या बऱ्याच फेऱ्या झाल्या आणि यात झालेल्या चर्चेचे स्वरूप मात्र गुप्त ठेवण्यात आले; पण त्यात राजकारणाचा फारसा समावेश नव्हता असे म्हणतात. त्यातून विनोबांनी सध्या कर्ममुक्ती घेतली असल्याने ते फक्त आरोग्य आणि अध्यात्म एवढ्याच विषयांवर बोलत असल्याचे ऐकतो. इंदिराजींना या दोन विषयांत काही विशेष रस किंवा गती असल्याचे, आमच्या ऐकण्यात नव्हते आणि हे विषयही काही गुप्तपणे विचार करण्याचे नव्हेत. आरोग्यावरची विनोबाजींची मते आम्हाला निश्चितच श्रवणीय आणि आदरणीय वाटतात. तेव्हा चर्चेचा हा प्रकार गूढ तर खराच; शिवाय याच सुमारास विनोबाजींनी आणीबाणीतला बाईंबरोबरचा आपला पत्रव्यवहार अग्निदेवतेला अर्पण केल्याचे ऐकले. अर्थात ही विनोबांची नेहमीचीच पद्धत असल्याचे सांगतात; पण आमच्या शंकेखोर मित्रमंडळीच्या मनात पाली चुकचुकल्याच.

आणि मग काँग्रेसच्या नेतृत्वाचा प्रश्न उकरण्यात आला. त्रिमूर्तींची स्थापना करून बाईंची प्रतिष्ठापना करण्याचा बेत आखण्यात आला; पण अचानक यशवंतराव चव्हाण, ब्रह्मानंद रेड्डीसारख्या मंडळींनी शौर्य दाखविले. 'त्रिमूर्ती' योजनेला विरोध केला. पक्षात लोकशाही आणण्याचे धाडसी विधान केले. बाईंचा एकूण 'त्रिमूर्ती' प्रकरणात पराभव झाला.

मग बाईंनी थोडा वेगळा मार्ग काढला. जनतेचा पाठिंबा आपल्यालाच आहे, याचे प्रदर्शन सुरू झाले. बाईंनी समाजकारणात, दलितवर्गीयांच्या समस्येत लक्ष घालणं सुरू केले. त्यांना दलितवर्गीयांच्या प्रेमाचे अनावर कढ येऊ लागले. बेलचीसारख्या ठिकाणी हरिजनांवर झालेल्या अत्याचाराने तर बाई चांगल्याच होरपळल्या. त्यांना वाईट वाटले. इतके की त्यांनी त्या लोकांची समक्षच भेट घेतली. हत्तीवरून बाईंनी हत्तीवर बसून त्या दिवशी दया वाटली. पोटभर करुणा वाटली. करुणा भाकणारे भारतात पंचावन्न कोटी लोक आहेत. त्यामुळे बाईंना करुणा वाटताना कधीच अडचण पडणार नाही. हत्तीच कमी पडतील !

आता बाईंना विषय मिळाला आहे. जुनाच पण नव्याने चघळण्यासारखा. 'दलितांवरचे अन्याय' भारतासाठी हा विषय बिनतोड आहे. एक तर जनतापक्षाला दलितांमध्ये फारसे स्थान नाही अशी बाईंची धारणा आणि दलितांच्या पाठिंब्यातून आलेले नेतृत्व कुणीच नाकारू शकणार नाही. 'जनतापक्ष सत्तेवर आला आणि दलितांचा प्रश्न उपटला' असा सूर तर बाईंनी सुंदरच लावला आहे; पण गेल्या तीस वर्षांत काँग्रेसने या प्रश्नाचा जर पूर्ण निकाल लावला होता असे म्हणतात, तर तो प्रश्न इतक्या लगेच कसा उपटावा असा एक प्रश्न आमच्यासमोर पडतो; पण तो अगदीच मामुली आहे.

बाईंनी आपले करुणा–गायन चालू ठेवावे. ते स्वर कानाला गोड वाटतात; पण हा गोडवा त्यांना किती दिवस मानवेल हा प्रश्नच आहे कारण बाईंना अशा गाण्याची सवय नाही. त्यांचा जन्म राजघराण्यात झाला. सत्तेच्या अंगाखांद्यांवर खेळून त्या वाढल्या. हळूच सत्तेवर चढल्या आणि हा हा म्हणता पंतप्रधानच झाल्या! त्यात जनतेच्या इच्छेचा, मर्जीचा प्रश्नच कधी आला नाही बाईंचं नेतृत्व आधी वर आकाशात बहरलं, फळलं, फुललं आणि आपसूक त्याला जनतेकडून मुळंही मिळाली. या उफराट्या क्रमाची बाईंना सवय आहे. काही मंडळींचा जन्म फक्त राज्य करण्यासाठी असतो. बाईंचा जन्म अशांमध्ये मोडतो. त्यांना असे लोकहितकारण, समाजकारण कितपत झेपेल याविषयी आपण तरी साशंकच आहोत. भारताच्या दरिद्री जनतेबरोबर फार काळ कंठणे बाईंना जड जाणार आहे आणि जनतेचे दारिद्र्य लांबून पाहायला हत्ती काही विमानाइतके उपयुक्त आणि वेगवानही नसतात.

पण हाही बाईंविषयीचा एक अंदाजच झाला. बाईंचं एकूण काही सांगवत नाही हेच खरं ! □



# नक्षलवादाच्या शोधात

लेखांक आठ

## एका तत्त्वज्ञानाची जडणघडण

शिरीष सहस्रबुद्धे । चंद्रशेखर पुरंदरे

'नक्षलवादी' हा शब्द आजकाल ज्या अर्थाने रूढ झाला आहे त्याला शास्त्रीय परिभाषेत 'भारतीय माओवादी' असे म्हणता येईल. आपले तात्त्विक पितृत्व चीनच्या कम्युनिस्ट पक्षाकडे आहे असा दावा नक्षलवाद्यांकडून केला जातो. म्हणूनच कम्युनिस्ट पार्टी ऑफ चायनाने ( CPC ) भारताच्या संदर्भात किंवा भारतीय चळवळीच्या संभाव्य स्वरूपाविषयी वेळोवेळी व्यक्त केलेल्या मतांची दखल घणे अप्रस्तुत ठरू नये.

### लिन पिआओचा सिद्धान्त

'Long Live the Victory of People's War' या लिन पिआओच्या २ सप्टेंबर १९६५ च्या लेखामध्ये माओच्याच युद्धाच्या पद्धतीचा व गनिमी काव्याने दीर्घकाळपर्यंत युद्ध लढवीत ठेवण्याच्या संकल्पनेचा पुरस्कार करण्यात आला होता. तिसऱ्या जगासाठी हीच एक शक्यता यशाप्रत नेईल असा विश्वास त्याने त्यात व्यक्त केला होता.

आपल्या युगाची गरज माओच्या युद्धपद्धतीत प्रतिबिंबित झाल्याने ती पद्धत अपरिहार्य होती.जे सच्चे क्रांतिकारक असतील, तेच हा मार्ग अवलंबितील. ग्रामीण भागात क्रांतिकेंद्रे स्थापन करणे आणि लढा चालविणे ही ती पद्धत. आशिया,आफ्रिका,लॅटिन अमेरिका ही मागास लेली. ( मागासलेली म्हणायला नको म्हणून विकसनशील म्हणवून घेणारी ) खंडे हे जगातील ग्रामीण भाग होत तर समृद्धीच्या शिखरावर असणारे उत्तर अमेरिका व पश्चिम युरोपातील भांडवलवादी देश हे जगातील शहरी भाग होत. या ग्रामीण भागात एकता करून या शहरांना वेढा घालून ती जिंकणे ही माओची उपपत्ती. वसाहत वा अर्धवसाहत स्वरूपात असणाऱ्या देशांच्यामधला, राष्ट्रीय लोकशाही क्रांती समाजवादी क्रांतीत परिवर्तित करण्याचा नाजूक प्रश्न चीनच्या क्रांतीने सोदाहरण सोडविलेला आहे. साम्राज्यवादविरोधी सरंजामशाहीविरोधी, नोकरशाहीच्या हुकुमशाहीविरोधी, प्रोलेटॅरिअटच्या नेतृत्वाखाली प्रचंड जनसंख्येने उभारलेला लढा माओच्याच मार्गाने यशस्वी होऊ शकेल. लिनच्या म्हणण्याप्रमाणे सगळे भुकेलेले, गरिबी रेषेखालचे तिसरे जग एकत्र येऊन एका प्रचंड ताकदीने त्यानें या वरील शहरांचा समाचार घेणे आवश्यक होते. त्यात प्रोलेटॅरिअटच्या बाजूचा फायद्याचा मुद्दा असा की अमेरिकन साम्राज्यवाद मुळातच विभिन्न स्वरूपात विभिन्न देशात अवतरला होता. तेव्हा

त्याचा एकत्रित समाचार घेण्यापेक्षा हळूहळू तो नष्ट करणे हे क्रांतीला मदत करणारेच होते.

## रशियाचा क्रांतिद्रोह

जेव्हा ही समृद्धी व दारिद्र्य यांच्यातील दरी अशी उत्तरोतर वाढत होती, तेव्हा प्रतिक्रियावादी रशिया क्रांतीची धार बोथट करण्यामागे लागलेला होता. जनमताच्या कौलाची या रशियन प्रतिक्रांतिवाद्यांना काहीही जाणीव नव्हती. जनमताला बुद्धिपुरस्सर कमी लेखण्यातच रशियाची ताकद खर्ची पडत होती. रशिया हे का करीत होता ? अणुशक्तीच्या आणि संपूर्ण जग दोन ताकदींच्या आधिपत्याखाली वाटून घेण्याच्या कल्पनेच्या प्रभावामुळे रशिया फक्त अमेरिकेचाच (त्यायोगे आपल्या साम्राज्यवादाची भूक भागविण्यासाठी) फायदा पाहात होता. प्रतिक्रियावादी ख्रुश्चेवला सर्वांत पुढील गोष्टीची भीती वाटत होती. रशियाने समाजवादाचा बुरखा घेतलेला असल्याने व समाजवादी राष्ट्रांचाच गराडा उद्या समृद्ध राष्ट्रांना पडणार असल्यानेच रशिया या समृद्ध राष्ट्रांचेच हितसंबंध जपण्यात गुंतणार असल्याने तो उघडा पडणार होता. एक वेळ अमेरिका हा सरळ शत्रू म्हणून मानता येईल; पण समाजवादाच्या बुरख्यातला रशिया हा अधिक घातकी ठरू शकेल.

अणुशक्ती नसणारी राष्ट्रे अणुशक्ती असणाऱ्यांच्या पुढे युद्धात टिकाव धरू शकणार नाहीत असा जो सिद्धान्त मांडण्यात आला होता, तोही उथळ असल्याचे सांगून 'सर्वदेवनमस्कारः केशवं प्रति गच्छति' अशा थाटात लोकयुद्ध आणि फक्त लोकयुद्धच सर्व प्रश्नांवर तोडगा असल्याचे रशियाकडून मांडण्यात आले होते. शांततापूर्ण सहजीवन, शांततापूर्ण स्पर्धा आणि शांततापूर्ण परिवर्तन या तीनही रशियापुरस्कृत तत्त्वांवर अविश्वास दर्शविण्यात आला. राष्ट्रीय मुक्तिआंदोलनाद्वारे अमेरिकन साम्राज्यवाद व रशियन क्रांतिद्रोह याचा पाडाव करता येईल हे लेखाचे तात्पर्य होते.

१९६५ च्या सप्टेंबरच्या सुरुवातीला आलेल्या त्या लेखातील मुद्दे ऑगस्ट १९६६ च्या CPC च्या केंद्रीय बैठकीपुढे आले. १९६७ च्या जून-जुलैमध्ये भारत, ब्रह्मदेश व इंडोनेशियातील जनतेस आदर्शवादासाठी लढा सुरू करण्याचे आवाहन करण्यात आले. राजकीय, सांस्कृतिक व आर्थिक क्षेत्रातून परकीय प्रभावाची हकालपट्टी ही सर्वप्रथम हातात घेण्याची गरज प्रतिपादन करण्यात आली.

यानंतर नक्षलबारीच्या चळवळीत चीनला आशेचा किरण दिसला. जंगलातल्या वणव्याप्रमाणे हा पहिला उद्रेक संपूर्ण देशाला ग्रासील हा त्याचा अंदाज मात्र चुकीचा ठरला.

१ सप्टेंबर १९६७ च्या 'पेकिंग रिव्ह्यू'मध्ये थकिन बा थिएन् तिन या ब्रह्मदेशच्या कम्युनिस्ट नेत्याने एक लेख लिहिला. (पेकिंग रिव्ह्यूमध्ये एकाच एका मताचे लेख असतात. त्यामुळे 'अंकात प्रसिद्ध केलेल्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही' वगैरे प्रश्न उद्भवत नाही. CPC ला मंजूर असल्याखेरीज तो मजकूर अंकात येऊच शकत नाही, तात्पर्य भारताचे या लेखातील विश्लेषण चीनला मान्य होते.) या वेळेपर्यंत लिऊ-शाओ-ची ची सद्दी संपलेली होती. त्याला चीनचा ख्रुश्चेव म्हणण्यात आले. रशियाचा ख्रुश्चेव आणि हा चीनचा ख्रुश्चेव आणि त्यांची गँग यांच्या शांततामय परिवर्तनाची हेटाळणी केली गेली. संसदीय पंथाने शांततामय परिवर्तन हा ख्रुश्चेवने रशियन कम्युनिस्ट पक्षाच्या विसाव्या काँग्रेससमोर मांडलेला सिद्धान्त होता. चीन आणि रशिया दोघेही भारताकडे प्रयोगक्षम भूमी म्हणून पाहात होते.

## शांततामय परिवर्तन म्हणजे काय ?

बदललेल्या आंतरराष्ट्रीय परिस्थितीत सामर्थ्यशाली समाजवादी राष्ट्रांचा गट हा जगभरच्या क्रांतीसाठी पायाभूत होईल. स्थानिक प्रागतिक गटांच्या सहाय्याने भांडवलशाही वा लोकशाही शक्तींची पुनर्रचना होऊन शांततामय परिवर्तन शक्य होईल. आशियामधील शांतिप्रेमी राष्ट्रांचा मोठा भूप्रदेश व या राष्ट्रांनी मदतीसाठी पश्चिमेकडे वळू नये यासाठी समृद्ध समाजवादी (रशिया) राष्ट्रांनी त्यांना द्यायची मदत ह्या दोन गोष्टी या धोरणाचा गाभा होत्या. ख्रुश्चेवच्या मते शांततामय परिवर्तन हे असे पूर्ण होणार होते.

कष्टकरीवर्ग इतर सहानुभूत वर्गांच्या मदतीने संसद काबीज करील आणि संसद हे लोकांच्या आकांक्षापूर्तीचे साधन बनेल. ज्या ठिकाणी भांडवलशाही व्यवस्था जबर आहे आणि लष्करही प्रचंड आहे, तिथे प्रतिक्रियावादी घटक अर्थातच प्रचंड विरोध करतील. त्या ठिकाणी तीव्र क्रांतिकारी लढ्याने (हिंसक नव्हे) क्रांती पूर्ण करण्यात येईल. जेव्हा अगदीच ही परिस्थिती अटळ असेल किंवा दुसऱ्या शब्दात, दडपशाही मजबूत असेल तेव्हा अपवादात्मकरीत्या हिंसेचा अवलंब करावा.

निकिता ख्रुश्चेवच्या १४ फेब्रुवारी १९५६ च्या या विधानावर १३ सप्टेंबर १९६३ च्या पेकिंग रिव्ह्यूमध्ये आक्षेप घेतलेला आढळतो.

शांततामय परिवर्तनाच्या मार्गाची प्रशस्ती हा मार्क्स-लेनिन यांच्या मार्गाचा उघड उघड द्रोह आहे. ऑक्टोबर क्रान्तीची तत्त्वे यामुळे पायदळी तुडवली गेलेली आहेत. शांततामय सहजीवन हे तर ढोंगबाजीचेच प्रतीक आहे. समाजवादी देशांना परस्पर सहकार्यापासून या मार्गामुळे वंचित केले जाईल. एवढेच नव्हे, तर यामुळे जिथे जिथे हुकूमशाहीने पीडित जनता असेल, त्या त्या ठिकाणच्या जनतेला ते राज्य उलथून पाडण्यासाठी प्रयत्न करण्याच्या असलेल्या क्रान्तिसिद्ध हक्कांवर ही गदा आहे.

हे सर्व नक्षलवादाच्या संदर्भात महत्त्वाचे अशासाठी, की संसदीय मार्गाने शांततामय परिवर्तन केवळ अशक्य ही जी धारणा भारतीय नक्षलवादाची झालेली आढळते, तिचा उगम चीनच्या वरील भूमिकेत आज सापडतो. आणि नक्षलवादाच्या जन्मातील दोन मूलभूत तत्त्वांतील हे एक होते.

त्याचमुळे जेव्हा १९५७ ला मॉस्कोमध्ये कम्युनिस्ट पार्टीचे आणि कष्टकऱ्यांच्या पार्टीचे प्रतिनिधी जमले होते, तेव्हा चीनने हाच प्रश्न उपस्थित केला आणि अखेर जे Joint Draft Declaration by the CPSR & CPC निघाले त्यात प्रमुख बदल करण्यात आले ते CPC ची या बाबतीतील भूमिका स्पष्ट करणारे होते. हीच भूमिका पुढे नक्षलवादाने चालविली.

'एका संसदीय मार्गाने शांततामय परिवर्तन होईलही; पण लेनिनच्या सांगण्याप्रमाणे आणि अनुभवाने दाखवून दिल्याप्रमाणे सत्ताधारी वर्ग सत्ता स्वयंस्फूर्तीने कधीही सोडीत नाही. [ योगायोग असा,

की हेच वाक्य अगदी याच शब्दात आणखी वीस वर्षांनी निघालेल्या Liberation च्या अंकात मांडलेले दिसते. CPIML चे तत्त्वज्ञान पुढे मांडताना. ] दोन : ससदेत निर्विवाद बहुमत मिळविण्यासाठी जरूर प्रयत्न करावेत; पण त्याच वेळी प्रतिक्रियावाद्यांना ठेवून काढण्यासाठी आणि समाजवादी क्रान्तीच्या शांततामय मार्गाचे महत्त्व पटविण्यासाठी संसदबाह्य मार्गांचा अवलंब करणे आवश्यक आहे.

CPC च्या मतातील तीव्रता संयुक्त पत्रक काढल्याने अर्थातच कमी झालेली होती. उपरिनिर्दिष्ट २३ सप्टेंबर १९६३ च्या अंकात मात्र हे मत सुस्पष्टपणे मांडण्यात आले होते.

शांततामय आणि शांतताविरहित अशा दोन्ही मार्गांचा उचित उल्लेख केलाच पाहिजे. कारण त्यामुळेच ( देशोदेशीच्या ) कम्युनिस्टांना परिस्थितीला अनुसरून कोणता मार्ग अवलंबायचा हे ठरविता येईल; पण फक्त शान्तिपूर्ण मार्गाचे महत्त्व ठसविल्यास त्यांचे ( कम्युनिस्टांचे ) हात जखडल्यासारखे होतील. केवळ डावपेच म्हणून ( जसे आजचा नक्षलवादी करताना दिसतो. ) शान्तिपूर्ण मार्गाचा उद्‌घोष करणे ठीक आहे; पण त्याला नको इतके महत्त्व देण्याने क्रान्तीची हानीच होईल. कारण 'रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळाले, असा भूतकालीन सिद्धान्त गाजा'. कधी असा वर्तमानच घडला (की रणावीण स्वातंत्र्य मिळाले) तर त्याचा पहिला फायदा घेणारे कम्युनिस्टच असतील; पण संसदीय मार्गाने जाणे हे बूर्व्वामूल्यांचे समूळ उच्चाटन करण्याएवढे सोपे नव्हे किंवा दुसऱ्या शब्दात शांततामय परिवर्तनाने समाजवाद गाठणे याचा अर्थ केवळ संसदीय मार्गानेच तो गाठणे असा नव्हे.

हा रशियाच्या मार्गावरील अविश्वास वाटला म्हणूनच की काय; लिन पिआओने तिसऱ्या जगात कोणते युद्धधोरण स्वीकारायचे याबद्दल ऑक्टोबर १९६३ मध्ये पुढील मत माडले :

'सगळ्या जगातील अन्तर्विरोधाचे तिसरे जग हे केन्द्रस्थान बनलेले आहे. साहजिकच उद्याच्या झंझावाताची ही प्रसूतिस्थाने ठरणार आहेत. राष्ट्रीय लोकशाहीवादी चळवळ आणि तिच्यायोगे निर्माण होणारी आतरराष्ट्रीय लोकशाहीवादी चळवळ हे या युगाचे इतिहासप्रवाह होते आणि ह्यांची प्रचंडता व वेग जागतिक क्रान्तीचे कारण होते. संपूर्ण जगात जेथे जेथे दुबळे, दडपलेले, दारिद्र्याने पिचलेले लोक असतील, त्या त्या भागातील त्या त्या लोकांचे भवितव्य या प्रचंड व सुप्त ज्वालामुखीच्या उद्रेकाच्या तीव्रतेवर अवलंबून राहणार हे उघड आहे. एका चिरस्थायी, चिरकालीन प्रोलेटेरिअन क्रान्तीसाठी हा वसाहतवाद आणि साम्राज्यवाद याविरुद्धचा लढा शाश्वत महत्त्वाचा आहे.'

आणि या क्रान्तीच्या केन्द्रस्थानी चीनला भारत हवा होता तर भांडवलशाहीविरहित समाज शांततामय परिवर्तनाद्वारे इथे आणण्याचे रशियाचे प्रयत्न होते.

## स्प्रिंग थंडर ओव्हर इंडिया!

आणि तदनंतर नक्षलबारीमध्ये एक स्फोट झाला. वस्तुतः या प्रकारचा स्फोट, किंबहुना स्फोट या शब्दातून जी अनपेक्षितता व व विनाशकता सूचित होते; पण त्याहून महत्त्वाची अशी अल्पकालिकता सूचित होते ती लक्षात घेता, क्रान्तीच्या संदर्भात स्फोट उचित ठरू नये. क्रान्तीला तो पोषक ठरण्याऐवजी मारक ठरू शकतो. क्रान्ती ही एक चिरंतन काल चालत रहाणारी प्रक्रिया आहे; पण तरीही ती इन्द्रियगम्य होण्यासाठी अशा तऱ्हेचे अकस्मात स्फोट आवश्यक असतात. नक्षलबारीला एक अत्यंत शुद्ध स्वरूपातील स्फोट झाला.चीनला अपेक्षित ते घडले होते. त्या निमित्ताने CPC ने परत एकदा People's Daily मध्ये ५ जुलै १९६७ च्या अंकात भारताची दखल घेतली : या लेखाचे नाव होते : Spring Thunder Over India.

भारत केवळ कागदोपत्री स्वतंत्र झालेला होता. एक अर्धवसाहत आणि अर्धसरंजामशाहीच्या आधिपत्याखालील त्याचे मूळ स्वरूप तेच होते. भारतीय क्रान्ती शेतकऱ्यावरच अवलंबित रहाणे आवश्यक होते. ग्रामीण भागात केन्द्रे स्थापन करणे आणि शहरे वेढणे हे आवश्यक होते. राष्ट्रीय लोकशाही युद्धाचा शेतकरी हाच कणा होता. प्रोलेटॅरिअटचा तो सर्वांत निश्चित, विश्वासार्ह व बहुसंख्य असा साथी होता. प्रोलेटॅरिअट आणि शेतकरी हातात हात घालून पहाता पाहता ग्रामीण दृश्य बदलून टाकतील, आणि कोणीही शत्रू म्हणून समोर ठाकला, तर त्याचा पराभव करतील.

सशस्त्र प्रतिक्रान्तिवादी शस्त्राच्या साहाय्यानेच चोख उत्तर देणे हेच चिनी क्रान्तीप्रमाणे भारतीय क्रान्तीचे प्रमुख स्वरूप राहणार. सशस्त्र लढा हा एकमेव मार्ग भारतीय संदर्भात उचित होता. असंख्य शेतकऱ्यांना क्रान्तीच्या ध्येयाने भारणे आवश्यक होते. साम्राज्यवाद आणि प्रतिक्रियावाद्यांकडे आज जरी शस्त्रदृष्ट्या प्राबल्य असले, तरी लवचिक व्यूहरचना आणि सावध डावपेच याच्या साहाय्याने त्याच्यावर मात करता येईल दीर्घकालपर्यंत चालवत ठेवलेल्या सशस्त्र मार्गानेच, चेअरमन माओने स्वतः आखून दिलेल्या धोरणान्वये क्रान्तीच्या विजयाकडे मजल–दरमजल करत आगेकूच करता येईल.

क्रान्तिकारी ग्रामीण केन्द्रे हा या क्रान्तीचा आत्मा होय. प्रतिक्रान्तिवाद्यांचे राज्य ग्रामीण भागात दुबळे असल्याने क्रान्तिकारकांना प्रचंड भूप्रदेशावर कमी शक्ती खर्च करून ताबा मिळवता येईल. एका पाठोपाठ एक अशी केन्द्रे स्थापन करून ती संलग्न करून एक खरी लोकांची सेना उभारता येईल. याच वेळी क्रान्तीची वस्तुनिष्ठ पूर्वतयारी झालेली असली तरी त्यावरून इतर सर्व घटक [subjective factors ] अनुकूल असतील किंवा नाही हे पारखून घेणे आवश्यक आहे असे म्हटले होते. परत माओने म्हटल्याप्रमाणे युद्ध माणसांमुळे जिंकले जाते, शस्त्रामुळे नव्हे.

## १९६७ च्या निवडणुका

या निवडणुकांमध्ये राज्य विधानसभा व लोकसभेतही काँग्रेसची ताकद फारच कमी झाली. केरळ आणि बंगालमध्ये CPM ने भाग घेतलेली संयुक्त आघाडीची सरकारे अस्तित्वात आली. CPC ला आधीपासून CPM च्या क्रान्तीवरच्या विश्वासाविषयी साशंकता होतीच. त्यात बूर्व्वा घटनेच्या चौकटीत राहू इच्छिणाऱ्या सरकारात भाग घेतल्यामुळेच CPM च्या प्रतिक्रियावादी स्वरूपाबद्दल चीनचा संशय दृढ झाला. आधीच ती केंद्राच्या आधिपत्याखालील, त्यात लोकशाहीवर अतोनात प्रेम करणाऱ्या नेहरूंच्या कन्येने केरळची

२८ महिने वयाची विधानसभा १९६७ मध्ये बरखास्त केल्याचा इतिहास ताजा.

४ जून १९६७ च्या पेकिंग रिव्ह्यूमध्ये परत एकदा लोकयुद्धाची अपरिहार्यता ठासून मांडण्यात आली. राजकीय सत्ता हस्तगत केल्याखेरीज आणि जुनी राज्ययंत्रणा मोडून टाकल्याखेरीज समाजाच्या मूलभूत स्वरूपात काहीच फरक पडणार नाही. इतिहासात असे उदाहरण नाही की वरवरच्या प्रयत्नांनी समाजाचा पायाच बदलला आणि भविष्यातही कधी असणार नाही असे प्रतिपादन करण्यात आले.

यानंतर १० जून १९६७, २७ जून १९६७ ला पेकिंग रेडिओवरून परत पश्चिम बंगाल सरकार, भारत सरकार याच्या नावाने खडे फोडण्यात आले. आणि मग ५ जुलैच्या Spring Thunder Over India ने कळसच चढविला.

सशस्त्र क्रान्ती ही खऱ्या मार्क्सिस्ट लेनिनिस्टांची चाचणी ठरली. त्यामुळे नक्षलबारीच्या बाजूने सच्चे क्रान्तिकारक उभे रहातील असे आवाहन करण्यात आले. नक्षलबारी स्थानिक प्रश्नापुरती मर्यादित नसून राज्यसत्ता हस्तगत करण्यासाठीच उद्भवली असे मत ठासून माडण्यात आले.

## नॅशनल चायना न्यूज एजन्सीचे भाष्य

नक्षलबारी हा तेलंगणाचा पुनर्जन्म होता. तो इतक्या कालावधीनंतरही उद्भवला ही गोष्ट भारतीय समाजरचनेच्या प्रखर अंतर्विरोधावर प्रकाश टाकते. जोपर्यंत सरंजामशाहीच्या साहाय्याने पिळवणूक चालू आहे तोपर्यंत जमीनदार आणि शेतमजूर यांच्यातील तफावत कमी होणार नाही. जमिनीच्या वाटपाच्या दृष्टीने तर काहीच हालचाल होणार नाही. अशा वेळी विरोधी लढे व कृषकक्रांती जन्म घेणारच. तात्कालिक पराभवानंतर नवीन उद्रेक होणारच. तेलंगणाच्या सशस्त्र लढ्याची फसवणूक झाली; पण आज दार्जिलिंगमध्ये लाल निशाण रोवले गेले आहे.

भारतीय क्रांती दोन मार्गांची झुंज पहात आहे. सत्ता सशस्त्र मार्गाने बळकावू पहाणारा चीनवादी मार्ग व पार्लमेंटच्या नावाखाली लोकांना फसविणारा प्रतिक्रियावादी मार्ग. १९४६-५१ मध्ये तेलंगणामध्ये भूमिहीन मजूर व गरीब शेतकरी जमीन ताकदीने बळकावू लागले; पण त्याच वेळी क्रांतिद्रोही रशियाने हस्तक्षेप केला आणि लढा संपुष्टात आला.

भारतीय परिस्थिती चिनी परिस्थितीहून गुणात्मकतेने भिन्न आहे असे काही प्रतिक्रियावाद्यांचे म्हणणे आहे. अजून क्रांतीस योग्य अशी वेळ आलेली नाही असे यांचे म्हणणे आहे. तसेच सशस्त्र लढ्याचा मार्ग भारताचा नव्हे हा भ्रमही यानीच जोपासला आहे. आपले अपयश झाकण्यासाठी आणि क्रांतीला दूर ठेवण्यासाठी या प्रकारचे तर्क लढविले जात आहेत. भारतीय परिस्थिती गुणात्मकतेने अपवादभूत आहे हा भ्रम आहे. क्रांतिरक्षक प्रोलेटॅरिअट वर्ग ग्रामीण भागात जाऊन क्रान्ती सजग करील आणि माओच्याच मार्गाने भारत मुक्त होईल. दीर्घकाळ लढ्याचे तेलंगण ते नक्षलबारी हे उत्कृष्ट उदाहरण आहेच. भारतीय क्रांतिकारी वर्ग सुप्त नाही याचेच हे द्योतक आहे.

ही दोन भाष्ये १-२ ऑगस्ट १९६७ ला करण्यात आली त्यापाठोपाठ ३ ऑगस्टच्या पीपल्स डेलीमध्ये सच्च्या क्रांतिकारकांना CPI (M) सोडून देण्याचे आवाहन करण्यात आले.

७ ऑगस्ट १९६७ च्या पीपल्स डेलीने नक्षलबारीतील लाल निशाण अधिक उंच होवो अशी इच्छा व्यक्त केली.

कृषकक्रांती ज्वलंत ठेवण्याचा प्राथमिक मार्ग म्हणजे ग्रामीण क्रांतिकेंद्रे व शेतकरी हेच क्रांतिकारक असणे. नक्षलबारी या कसोटीवर उतरली. हुनानमध्ये जसे शेतकरी गावठी शस्त्रानिशी लढले, तसेच नक्षलबारीचे शेतकरी लढले. त्यावरून ग्रामीण भागापर्यंत दडपशाहीचा अंमल पोचलेला नाही व क्रांतिकारकांना सुलभतेनें संघटना बांधता येते हेही स्पष्ट झालेले आहे. चिनी क्रांती जशी वाढली, त्याच मार्गाने ही भारतीय क्रांती जात आहे. त्यामुळे ती यशस्वी होईलच.

भारतात वस्तुनिष्ठतेने क्रान्ती होण्यासाठी आवश्यक परिस्थिती मौजूद होतीच; पण जर वस्तुनिष्ठ गरज कोणती असेल, तर ती एका माओवादी पक्षाची होती. शांततामय परिवर्तन आणि संसदीय मार्गांचा त्याग करणारा पक्षच ही क्रांती पुढे नेऊ शकणार होता.

## कनु संन्यालचा तराईवरचा अहवाल

Report on the Peasant movement in the Terai Region हा कनु संन्यालचा Liberation च्या १९६८ नोव्हेंबरच्या अंकातील लेख महत्त्वपूर्ण आहे.

तराई भागात ( नक्षलबारीच्या आसपास–हिमालयाचा पायथा उत्तर बंगाल) ७०% शेतकरी गरीब व भूमिहीन होते. २०% मध्यमवर्गीय तर १०% श्रीमंत होते. भारतीय परिस्थिती फारशी निराळी नसल्याने हे प्रतीक मानता येईल. शेतकरी हाच भारतीय क्रांतीचा पाया होय. राज्यसरकार कॉम्प्रादोर–ब्यूरोक्रॅट–बूर्ज्वा स्वरूपाचे होते. त्याच्यावर नक्षलबारीच्या उठावाने हल्ला चढविला. जमीनदार व जोतेदार हे सरंजामशाहीचे रक्षणकर्ते असल्याने त्यांच्यावरही हल्ला चढविण्यात आला.

मार्च १९६० मध्ये सिलीगुडीमध्ये कृषकसंमेलन बोलाविण्यात आले होते, त्याचे उद्देश पुढीलप्रमाणे होते.

१) कृषकसमित्यांची स्थापना खेड्यांच्या सर्व व्यवहारात लक्ष घालण्यासाठी करावी. २) संघटित होऊन जोतेदार आणि ग्रामीण प्रतिक्रियावाद्यांचा विरोध चिरडून टाकावा. ३) जोतेदाराची जमिनीच्या मालकी हक्कातील एकाधिकारशाही नष्ट करून या कृषकसमित्यांमार्फत तिचे फेरवाटप करावे.

यानुसार पहिली पायरी म्हणून मार्च–एप्रिल ६७ मध्ये किसानसभेमार्फत जागोजाग सभा घेऊन एक खेड्याच्या सरक्षणाचा गट गावोगावी स्थापन करण्यात आला. हा शस्त्रे बाळगून असणारा गट होता. किसानसभेची सभासदसंख्या ५,००० वरून ४०,००० वर लगेच गेली यावरून लोकप्रियतेची कल्पना यावी. एक दहा कलमी कार्यक्रम राबविण्यात आला. त्यामुळे खेड्याच्या राजकीय, आर्थिक आणि सामाजिक व्यवस्थेचे समूळ उच्चाटन झाले. हे कसे शक्य झाले ? तर ज्यावर शेतकरी राबत पण जी त्याच्या मालकीची नव्हती अशा साऱ्या जमिनीचे पुनर्वाटप करण्यात आले. यामळे

शतकानुशके टिकून राहिलेली सरंजामशाही नष्ट झाली.

पुढची पायरी जमीनदारांशी केलेल्या सर्व कायदेशीर व्यवहारांच्या कागदपत्रांचा नाश करणे ही होती. त्याचबरोबर जमीनदार आणि सावकार यांच्याशी झालेले अन्याय्य व्यवहार नष्ट करणे, साठेबाजांकडून धान्य बळकाविणे, गुरांचे कळप आणि शेतीची साधने जमीनदारांकडून आपल्या ताब्यात घेणे हे पुढचे उपक्रम होते.

कृषकक्रांती दडपणारे सर्व जमीनदार आणि इतर वर्गशत्रू यांना सार्वजनिक न्यायालयात खेचणे आणि त्यांची चौकशी करून त्यांना शिक्षा ठोठावणे हा याच कार्यक्रमाचा भाग होता. पोलिसाना मदत करणारे, जमीनदारांना फितूर होणारे यांचाही समाचार घेण्यात आला. धनुष्यबाण या पारंपरिक शस्त्रांचा त्याग करून भाले आणि बंदुकी या त्या मानाने आधुनिक शस्त्रांचा पुरवठा या गावोगावच्या स्क्वाडस्मार्फत करण्यात आला.

भूमिहीन मजूर याचे नेतृत्व करीत होते. मध्यमवर्गीय शेतकरी कायम अलिप्त राहिला; पण जेव्हा जोतेदार व जमीनदार हेच आपले शत्रू आहेत असे त्याच्या लक्षात आले तेव्हा तो क्रांतीला सिद्ध झाला. श्रीमंत शेतकरी अर्थातच प्रथम विरुद्ध होता; पण जेव्हा मध्यमवर्गीय शेतकरी त्यात सामील झाला तेव्हा त्याला पर्याय राहिला नाही. जोतेदार आणि समाजघातकी घटकांना शिक्षा केल्याने त्यांना क्रांतिकारकाविषयी विश्वास वाटून ते न्यायाची मागणी करू लागले. गरीब जोतेदाराच्यामध्ये फूट पडून काही सूडाची वाट पाहू लागले तर काही क्रांतीत सामील झाले.

हा लढा जमिनीसाठी नव्हता तर राज्यसत्तेसाठी होता. कॉम्प्रादोर–बूर्ज्वाझी आणि जमीनदारवर्ग शेतकऱ्यांमार्फत नष्ट करण्यासाठी होता. अस्तित्व टिकविण्यासाठी हे वर्ग साम्राज्यवादाशी हातमिळवणी करीत होते. सरंजामशाहीच्या रूपाने हे वर्ग शोषण करीत होते. या जाणिवेखेरीज लढ्याला धार चढली नसती आणि तो साधा जमीन बळकावण्याचा कार्यक्रम झाला असता.

याच चळवळीमुळे सामूहिक नेतृत्वाची गरजही भागविली जाऊ शकते हे लक्षात आले. ट्रेड युनियन्सच्या राजकारणातून बाहेर पडून चहामळ्यांचे कामगार केवळ क्रांतीचे घटकच झाले नाहीत तर ती पुढे नेणारे व विशिष्ट दिशा देणारे नेते ठरले. सरंजामशाहीच्या विरुद्धच्या या लढ्यातून एक सच्ची शेतकरी–कामगार आघाडी उभी राहिली. एक मार्क्सिस्ट याचे नेतृत्व करणे शक्य नाही तर प्रोलेटेरिअटच्या पक्षाकडेच त्याचे नेतृत्व असणे आवश्यक होते. हा पक्ष स्वतःचे सैन्य बाळगून क्रांतीला सहानुभूत अशा कामगार, शेतकरी, पेटी बूर्ज्वा वगैरेंची आघाडी उभारणार होता.

तरीही नक्षलबारी लढा एका मर्यादेपलीकडे पोचू शकला नाही. भक्कम पक्षाचा अभाव, लोकांवर विश्वास टाकण्यातली चलबिचल, जुन्याच दिशेने विचार, राजकीय सत्ता स्थापन करण्याविषयी औपचारिक दृष्टिकोन इत्यादींमुळे हे अपयश आले. म्हणून एक पक्ष असणे आवश्यक होते. कारण 'लोकसैन्याखेरीज लोकांकडे काहीच नसे.'

लष्करी डावपेचातील अज्ञान हा सगळ्यात घातक घटक ठरला. प्रथम नेतृत्वाने शत्रूची ताकद वाजवीहून कमी मानली तर नंतर ती वाजवीहून जास्त मानली. त्यामुळे 'यशस्वी माघार' घेण्याऐवजी खरीखुरीच पराभूत माघार घेतली गेली.

## या चळवळीपासून काय शिकावे ?

माओच्या राजकीय व लष्करी पद्धतीचा अधिक सखोल अभ्यास आवश्यक होता. गावकऱ्यांना जागृत केल्यानंतर त्यांना शस्त्रे पुरवून स्थानिक संरक्षणपथके उभारणे, गनिमी काव्याच्या युद्धाची माहिती देणे, वर्गशत्रूंवर वारंवार हल्ले करणे आणि गनिमी पथकांना जिथे आसरा घेता येईल असा 'मुक्त प्रदेश' निर्माण करून त्यांचे संरक्षण करणे हे प्रमुख भाग होते. गनिमी युद्ध हा चळवळीचा कणा होता. क्रांतिकारी सत्ता-प्रस्थापनातील उणीवा आणि भूपुनर्रचनेतील अपयश हे दोन प्रमुख पीछेहाटीचे मुद्दे होते तर केंद्रीय समितीची स्थापना आणि जमिनीचे वाटप हे प्रमुख फायदे पेटी बूर्ज्वांच्या दुबळ्या नेतृत्वामुळे निष्फळ ठरले.

श्रीकाकुलममधला शेतकरी लढा वस्तुतः याआधीच झालेला होता; पण त्याला राष्ट्रीय प्रसिद्धी मिळाली नाही वा चीननेही त्याची फारशी दखल घेतली नाही. कारण बंगालमधील सरकारचा CPM हा प्रमुख घटक होता आणि शांततामय परिवर्तन आणि संसदीय मार्ग एवढ्या बटबटीतपणे उघडे पाडण्याची संधी नक्षलबारीच्या दडपशाहीने आणून दिलेली होती.

अखेर माओवादी लॉबी CPM च्या अंतर्गत व्यवहारांतही दुर्लक्ष करण्याइतकी कमी नसल्याने ऑगस्ट १९६७ च्या अधिवेशनात दोन ठराव स्वीकारण्यात आले. यातील पहिला 'आततायी' मार्गाबद्दल निषेध दर्शविणारा होता तर दुसरा CPC व CPI (M) यामधील मूलभूत फरक स्पष्ट करणारा होता. प्रमुख तीन गोष्टींवर मतभेद होते. वर्तमान भारतीय संघराज्य व सरकार याचे वर्गविश्लेषण, देशान्तर्गत आर्थिक–राजकीय परिस्थितीचे मूल्यमापन व दोन प्रमुख कम्युनिस्ट पार्टीमधले तात्त्विक मतभेद.

### CPC चे मत असे होते –

वर्तमान सरकार हे नोकरशाही भांडवलवादाच्या हातातील एक बाहुले होते. ही नोकरशाहीच हे सरकार चालवीत होती. अर्थातच ते लोकांच्या अपेक्षापूर्ती करणारे असेल ही अपेक्षाच चूक होती. साम्राज्यवादाच्या भल्यासाठी हे राज्य चालविण्यात येत होते. त्यावरच परोपजीवित्वाने ही नोकरशाही परदेशी मालकांना फेकलेल्या भाकरीच्या तुकड्यावर समाधान मानून जगत होती. CPI (M) च्या मते बूर्ज्वा जमीनदारांनी परदेशी एकाधिकारी भांडवलाच्या गुंतवणुकीवर बिग बूर्ज्वांच्या मार्गदर्शनाखाली भांडवलशाहीच्या दिशेने चालविलेले हे राज्य होते.

नेहरूसरकारविषयी CPC चे मत असे होते की, १९५९ पर्यंत ते भारतीय बूर्ज्वाझीचे प्रतिनिधित्व करीत होते; परंतु नंतर त्याचा रंग बदलला. बड्या एकाधिकारशाहीचे ते खेळणे बनले आणि साम्राज्यवादविरोधी भूमिकाही त्याने सोडून दिली. यानंतर ते राष्ट्रद्रोही बिग बूर्ज्वाझीचे, बड्या जमीनदाराचे आणि साम्राज्यवादाचे लाचार कुत्रे बनले.

(इथे १९५९ नंतरच चीन–भारत-सीमावाद गंभीर स्वरूप धारण करू लागला हे नमूद करणे आवश्यक आहे. स्वतःच्या भूमिकेचे समर्थन करण्यासाठी चीनने घेतलेला हा पवित्रा उल्लेखनीय आहे.)

CPC ने काँग्रेसेतर सरकारेही भारतीय सत्ताधारी वर्गांचेच

हितसंबंध राखीत आहेत असा आरोप केला होता तो CPI(M) ला सगळ्यात बोचणारा होता.

१ मार्च १९६८ तर चीनला भारत लाल होण्याची चिन्हे स्पष्टच दिसू लागली. पेकिंग रिव्हूमध्ये विजेच्या लोळाप्रमाणे पसरणारी क्रांती वगैरे काव्यात्मक वर्णन होतेच; पण प्रस्तुत विषयाशी निगडित असे सरंजामशाहीचे विश्लेषण पुढीलप्रमाणे करण्यात आले होते: महाराजे, जातीच्या जोरावर राज्य करणारे जमीनदार आणि ब्यूरोक्रॅट–कॉम्प्रादोर बूर्झ्वाझी हे साम्राज्यवादाच्या इमारतीचे भारतातील प्रमुख आधारस्तंभ होत. अर्थातच भारतीय शेतकऱ्याला मुक्त व्हायचे असेल तर या स्तंभांचा समूळ नाश करणे आवश्यक. भारतीय क्रांतिकारक खेडोपाड्यात पोचलेले आहेत. माओच्या ' बंदुकीच्या नळीतून सत्ता येते ' या तत्त्वाचा ते प्रचार करीत आहेत.

## आंध्र नक्षलवाद

वर केलेल्या विवेचनावरून CPC चे भारतीय परिस्थितीविषयक परीक्षण लक्षात येईल. प्रत्यक्षात हे परीक्षण परिस्थितिनुरूप लागू करण्याविषयी मतभेद निर्माण झाले. मागील लेखांकात म्हटल्याप्रमाणे CPI(M) मध्ये जे माओवादी होते त्यांच्यापैकी काही जणानी CPI (M–L)ची स्थापना २२ एप्रिल १९६९ ला केली. चिनी कम्युनिस्ट पक्षाने व कनु सन्यालने त्याच्या लेखामध्ये प्रतिपादन केलेली एका Vanguard स्वरूपाच्या पक्षाची गरज पुरी करण्यासाठी याची स्थापना झाली. हाच कम्युनिस्ट पार्टी ऑफ इण्डिया (मार्क्सिस्ट–लेनिनिस्ट) CPI (M–L) हा पक्ष होय; पण या पक्षापासून आंध्र नक्षलवाद दूर राहिला होता. आज परिस्थिती बदलली आहे. आंध्र नक्षलवादाचे संस्थापक व प्रमुख वैचारिक बैठक देणारे टी. नागी रेड्डी, कोल्ला वेंकय्या व चंद्रपुला रेड्डी यांच्या संयुक्त नेतृत्वाच्या अभावामुळे, नागी रेड्डीच्या मृत्यूमुळे व एकी संपल्यामुळे आज हा आंध्र नक्षलवाद (रामदास रेड्डी या नागी रेड्डीच्या भावानेच आम्हाला दिलेल्या मुलाखतीनुसार) संपलेला आहे. आज जो आंध्र नक्षलवाद जिवंत आहे, तो CPI (M-L) याच पक्षाखालील आहे; पण अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे जो आंध्र नक्षलवाद त्याच्या जन्माच्या वेळेला होता (आणि CPI(M-L) च्या स्थापनेच्या वेळेला होता) त्याच्याच जवळ आजच्या CPI (M–L) ची विचारसरणी झुकत आहे. म्हणजेच मूळ CPI (M–L) च्या भूमिकेत आज गुणात्मक फरक पडत आहे. दुसऱ्या शब्दात, भारतीय परिस्थितीला अनुकूल व अधिक व्यावहारिक अशा स्वरूपात पूर्वीचा आंध्र नक्षलवाद व पूर्वीच्या CPI(M–L) चे तत्त्वज्ञान यांचे पुनर्जीवन आजचा नक्षलवाद या स्वरूपात सुरू होत आहे. हा आंध्र नक्षलवादाचा पुनर्जन्मच होय. अशा रीतीने 'नक्षलवाद ' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या विचारधारेमध्ये जुन्या अनुभवांपासून धडे घेऊन आणि सम्यक् परिस्थितिनुरूप परिवर्तने झाली.

चारु मुझुमदारच्या नक्षलवादाच्या उपपत्तीपासूनही वास्तवतेचा थोडाफार अंदाज घेऊन हा नक्षलवाद निराळा राहिला होता. आज मात्र चारु मुजुमदारने ज्या कम्युनिस्ट पार्टी ऑफ इण्डिया मार्क्सिस्ट–लेनिनिस्ट [ CPI ( M–L ) ] ची स्थापना केली तोच पक्ष आंध्रमध्येही 'नक्षलवादी' तत्त्वज्ञानावर अधिष्ठित असा पक्ष म्हणून नक्षलवाद्यांतर्फेच सांगण्यात येतो. या पक्षाचाच नेता सत्यनारायणसिंग हा आहे. तो आंध्रमधील बहुसंख्य नक्षलवाद्यांचा (जो गट अधिकाधिक प्रभावी आहे, त्याचा) प्रवक्ता मानला जातो. परवाच्याच विधानसभाच्या निवडणुकीत या पक्षातर्फे निवडणूक लढवून संतोष राणा हा नक्षलवादी नेता प. बंगालचा आमदार झालेला आहे. (संतोष राणाला आंध्र नक्षलवादीही 'आपला' मानतो.)

या CPI(M–L) ची सुरुवातीची ध्येयधोरणे विस्ताराने अभ्यासली असता उत्तरोत्तर त्यात कसे बदल घडत गेले हे पहाणे म्हणजे नक्षलवादाच्या आजच्या शास्त्रीय स्वरूपाविषयी माहिती मिळविणे होय.

## AICCCR ची भूमिका

AICCCR ( ऑल इण्डिया को ऑर्डिनेशन कमिटी ऑफ कम्युनिस्ट रेव्होल्यूशनरीज् ) ही नक्षलवादाच्या उगमापासून त्याचे जनकत्व सांगणारी कम्युनिस्ट पक्षान्तर्गत असलेली संघटना होती. फेब्रुवारी १९६९ मध्ये भारतामध्ये क्रान्तीला पोषक असे वातावरण परिपक्व झालेले आहे, क्रान्तिदर्शी वर्गाच्या एकतेमध्ये आनंददायक प्रगती होत आहे; परंतु या साऱ्याला पुढे नेईल असे कार्य करण्याची क्षमता AICCCR मध्ये नाही. कारण क्रान्तिकारी संघटनेशिवाय क्रान्तीला आवश्यक अशी शिस्त निर्माण होणार नाही आणि या शिस्तीच्या अभावी क्रान्ती एका विशिष्ट टप्प्यापलीकडे पोचू शकणार नाही. AICCCRच पूर्वी नवीन पार्टी स्थापण्याच्या विरुद्ध होती; परंतु आता, जे तर्कशास्त्र फक्त कम्युनिस्टांनाच जमू शकते अशा अभिनिवेशाने नवीन पक्षाची अपरिहार्यता खालील शब्दात प्रतिपादन करण्यात आली : सर्व संधिसाधू, सर्व परक्या घटकांचा नाश केल्यानंतर एखाद्या पक्षाची स्थापना करणे हा भोळा आदर्शवाद आहे. अंतर्गत मतभेदरहित असा निर्दोष पक्ष स्थापन करणे ही केवळ कल्पनेची भरारी आहे. तात्पर्य आता एक पार्टी स्थापलीच पाहिजे.

लेनिनच्या शंभराव्या जयंतीला–२२ एप्रिल १९६९ ला–या CPIML ची स्थापना झाली. घोषणा मात्र १ मेला मे-दिनी झाली.

माओ त्से–तुंग हा सर्वांत मोठा मार्गदर्शक आहे. भारतातील परिस्थितीतील बोचरा अंतर्विरोध हा सरंजामशाही आणि बहुसंख्य गरीब कृषक यांची सद्य स्थिती यामुळे निर्माण झालेली आहे. या सरंजामशाहीचा नाश करण्यासाठी कृषकक्रांतीचा अवलंब आणि लोकशाही युद्धाचा स्वीकार ( लोकशाही युद्ध म्हणजे रूढ अर्थाने लोकशाही युद्ध नव्हे तर लोकशाही हे ज्याचे ध्येय आहे असे युद्ध. लोकशाहीद्वारा घडविलेले युद्ध नव्हे. ) या सरंजामशाहीचे प्रमुख आधारस्तंभ कॉम्प्रादोर नोकरशाहीतून निर्माण झालेली भांडवलशाही आणि अमेरिकन रशियन साम्राज्यवाद हे होत म्हणून हे स्तंभ खच्ची करणे हेही प्रमुख उद्दिष्ट आहेच.

नवीन कम्युनिस्ट पक्षाचे अस्तित्वात असणाऱ्या दोन कम्युनिस्ट-पक्षांपासूनचे भिन्नत्व, त्याचा संसदीय मार्गावर विश्वास नव्हता यात होते. अस्तित्वात असलेल्या CPI आणि CPI( M ) या पार्टीज् भांडवलदारांचे कुत्रे आणि प्रतिक्रियावादी प्रतिनिधी असल्याचे मत

मांडण्यात आले. या पक्षांमुळे क्रांतीची धार बोथट होण्यास, लोकांच्या मनात खोटी स्वप्ने जागी होण्यास आणि अखेर भांडवलदारांचेच हित साधण्यास मदत होत आहे. या पक्षांनी इतरांशी हातमिळवणी करून स्थापलेली सरकारे ( केरळ-पश्चिम बंगाल ) म्हणजे राज्य करणाऱ्या वर्गाचे आपल्या क्रांतिवादी मार्गाला दिलेले उत्तरच होय.

सर्व 'क्रांतिवादी संघटनांची एक क्रांतिकारी आघाडी' हा प्रमुख उद्देश होता. क्रांतिकारी किंवा क्रांतिवादी या संकल्पनाचे याहून अधिक स्पष्टीकरणही करण्यात आले नाही. मात्र १९६९ मेच्या लिबरेशनमध्ये ( लिबरेशन हे नियतकालिक आजही कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया मार्क्सिस्ट-लेनिनिस्टतर्फे अधिकारवाणीने बोलणारे आहे ) खालील तत्त्वज्ञान मांडण्यात आले.

शेतकरीवर्गातील गरीब आणि भूमिहीन शेतकरी हे बहुसंख्य आहेत. कष्टकरीवर्गाचे ते दृढ साथी बनावेत. त्याचप्रमाणे मध्यमवर्गीय शेतकऱ्यानाही त्यांनी वगळू नये. जर अशी संयुक्त आघाडी अस्तित्वात आली, तर बराच मोठा गरीब वर्ग त्यात समाविष्ट झालेला असेल.. मग राहिले काय ? लोकशाही युद्धाचा विजय ! तेव्हा क्रांतिदूत आणि क्रांतिकारक या नात्याने कष्टकरीवर्गाचे; शेतकऱ्यांबरोबर सामील होऊन सशस्त्र लढ्याच्या साहाय्याने सत्ता बळकाविणे हे आद्य कर्तव्यच आहे. आजपर्यंत अस्तित्वात असणाऱ्या दोनही कम्युनिस्ट पक्षांनी फक्त देशद्रोह्यांचीच भूमिका घेतलेली आहे. कॉम्प्रादोर भांडवल आणि सरंजामशाही यांनी बनविलेल्या काँग्रेसचे प्रामाणिक गुलाम म्हणूनच यांनी आजवर भूमिका बजाविलेली आहे.

## चारु मुझुमदारची कामगिरी

CPI( M-L ) या पक्षाची वैचारिक बैठक चारु मुझुमदारने तयार केलेली होती. त्याच्या मताप्रमाणे ग्रामीण भागातील प्रमुख अंतर्विरोध हा शेतकरी व सरंजामदार यांच्यतील होता आणि तो कष्टकरीवर्गाच्या नेतृत्वाखाली कृषक्रांती घडवून जागोजागी मुक्त प्रदेश निर्माण करण्यानेच सुटणारा होता. हाच सगळ्यात मोठा असा यक्षप्रश्न होता. सर्व राजकीय पक्ष व संघटनांनी आजवर क्रांतिविरोधीच भूमिका घेतलेली होती. माओच्याच पावलावर पाऊल टाकून कष्टकरी वर्गाकडे नेतृत्व देण्यानेच खरा प्रश्न सुटणार होता. जून १९६८ च्या Liberation अंकातील त्याच्या लेखात पक्षात नव्या लोकांचा समावेश करून क्रांतीतील सिंहाचा वाटा ते उचलतील असा सूर होता. यामुळे CPI( M ) मधून जे बाहेर पडले होते, त्यांचे महत्त्व कमी लेखण्यात आले. तसेच क्रांतिकारी पक्ष हाच लोकसैन्य आणि राज्यसत्ता दोन्ही भूमिका बजावील हा जो निष्कर्ष काढण्यात आलेला होता, तोही घसरला होता.

यानंतर चारु मुझुमदारने नव्या पक्षाचे जे स्वरूप ठरविले ते तर माओवादाशीही नाते सांगणारे नव्हते. उघड प्रचाराऐवजी गुप्त पक्षाच्या गुप्त सभांमार्फत गुप्त प्रचार करण्यात येणार होता. बुद्धिवादी क्रांतिकारकांनी भूमिगत होऊन शेतकऱ्यांमध्ये कार्य करणे आवश्यक असल्याचे सांगण्यात आले. यायोगे हे क्रांतिकारक पूर्णतः शेतकऱ्यावर अवलंबून राहणार होते. निदर्शने, जाहीर सभा हे प्रतिक्रियावादी ठरविण्यात आले. शेतकऱ्यांच्या ज्या सभा होतील त्यांमध्ये त्यांच्यावर काहीही लादले जाऊ नये. तर प्रचारच इतक्या तीव्रतेने करावा की एक समर्थ राजकीय संघटना अस्तित्वात यावी. अशी गुप्त संघटनाच उद्याचा पक्ष म्हणून अस्तित्वात येईल. शेतीतील पीक बळकाविण्यासाठी चळवळ बांधायची होती. गनिमी कावा हा चळवळीचा सर्वांत प्रगत मार्ग होता. म्हणूनच चार टप्प्यात हे काम पूर्ण करण्यात येणार होते· वर्गविश्लेषण, नवीन पद्धतीचे संशोधन, अभ्यासपूर्ण मोर्चे बांधणे आणि शेवटी वर्गलढा. नोव्हेंबर १९६८ च्या लिबरेशनच्या अंकात ही संभाव्य पक्षाची कार्यपद्धती सांगण्यात आली.

३१ ऑक्टोबर १९६७ ला झालेल्या श्रीकाकुलममधल्या चळवळीवर ही AICCCR ने हक्क सांगितला. या चळवळीचे स्वरूप थोडक्यात सांगायचे म्हणजे ३१ ऑक्टोबर १९६७ ला जमीनदार आणि त्यांच्या गुंडांनी गिरिजनांच्या अधिवेशनावर हल्ला करून दोघांना ठार मारले. यामुळे काही काळ गिरिजन दबले; पण नंतर त्यांनी जमिनी बळकावून त्यातील पीकही कापून वाटले. या श्रीकाकुलम्च्या चळवळीचे श्रीकाकुलम् जिल्ह्याच्या कम्युनिस्ट समितीने डिसेंबर १९६८ च्या लिबरेशनच्या अंकात या चळवळीबद्दल खालील मते मांडली. १) जमीनदारी आणि सरंजामशाहीच्या विरुद्धच्या लढ्याची हाक पहिल्यांदा दिली गेली; परंतु सशस्त्र लढ्याचे तत्त्वज्ञान पद्धतशीररीत्या ठसविले गेले नाही. आर्थिक परिवर्तन हे राजकीय परिवर्तनावरच कसे अवलंबून असते हेही सांगण्यात आले नाही. त्यामुळे लोकशाही मार्ग जिथे संपला तेथेच चळवळ संपली. २ ) लोकांना जमीनदारांच्या गुंडांविरुद्ध लढण्याची आवश्यकता व लढण्याचा मार्ग सांगण्यात आले नाहीत. ३ ) सरकारी दडपशाही वाढेल या भीतीने राज्यसमितीने पोलिसांविरुद्ध शस्त्र उचलू दिले नाही. ४ ) संघटनात्मक बळ पेडकर्ना येथील नोव्हेंबर १९६७ च्या हल्ल्यानंतर कमी पडले. ५ ) नक्षलबारीच्या लढ्यापासून घ्यायचे ते धडे न घेतल्यामुळे चळवळ अयशस्वी ठरली.

हे विश्लेषण बरोबर होते व राज्यसमितीलाही (तिच्यावरील टीकेचा भाग वगळून) मान्य होते; पण यानंतर श्रीकाकुलम् जिल्ह्याची कम्युनिस्ट समिती राज्यसमितीला विचारेनाशी झाली. सरळ AICCCR या अखिल भारतीय समितीशी ती सर्व व्यवहार करू लागली. AICCCR चे तात्त्विक मतभेदही APRCC शी असल्याने APRCC ला AICCCR मधून हाकलणे व CPIM-L ची स्थापना करणे हे निर्णय केवळ एका दिवसाच्या अंतराने घेतले गेले.

दोन जुलै १९६९ ला CPC ने CPI(M-L) हीच भारताची एकमेव कम्युनिस्ट पार्टी असल्याचा निर्वाळा दिला. वस्तुतः चारु मुझुमदाराचे तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने संदिग्ध असणारे दोन-चार लेख व कनु संन्यालचे नक्षलबारीवरील भाष्य याखेरीज CPI( M-L ) ची तात्त्विक बैठक निश्चित झालेली नव्हती. एक राजकीय ठराव मे १९६९ मध्ये Liberation मध्ये प्रसिद्ध करण्यात आला होता. CPI M-L चे तत्त्वज्ञान म्हणून तो स्वीकारता येईल. (हाच ठराव २ जुलै १९६९ च्या पीपल्स डेलीने प्रसिद्ध केला.)

सरंजामशाही व शेतकरी यांच्यातील तफावत हाच प्रमुख अन्तर्विरोध होय. या सरंजामशाहीचा विनाश करणे हेच प्रमुख ध्येय होते. कॉम्प्रादोर ब्युरोक्रॅट कॅपिटॅलिझम आणि ही सरंजामशाही

हे अमेरिकन व रशियन साम्राज्यवादाचे भारतातील दोन टेकू असल्याने त्यांनाच नष्ट करणे आवश्यक होते.

याआधीच्या लेखांकात दिल्याप्रमाणे चार वर्गांची संयुक्त आघाडी उभारण्यात येणार होती. गरीब व भूमिहीन हे बहुसंख्य होते तर कामगारवर्ग व मध्यमवर्गीय शेतकरी नेतृत्व करणार होते. शेतकरी-कामगार सलोखा महत्त्वाचा होता.

१. सशस्त्र क्रान्तिवादी व संसदीय मार्गपराङ्मुख म्हणजेच तो सशस्त्र लढ्यापासून निराळा काढता येणार नव्हता. २. ग्रामीण भाग त्याचा पाया. शेतकरीवर्गाला गनिमी काव्याची माहिती देऊन त्यासाठी प्रवृत्त करणे, ग्रामीण भागात केन्द्रे उभारून शहरांना वेढा घालून ती बळकावणे हे त्याचे प्रमुख कार्य व यातच तो विकसित होत जाणार. ३. गुप्त व भूमिगत. अस्सल पक्षकार्यकर्ते भूमिगतच राहणार. उपलब्ध असे सर्व कायदेशीर मार्ग आपल्या फायद्यासाठी वापरून घेणार; पण केव्हाही कोणत्याही परिस्थितीत उघडपणे कार्य करणार नाहीत. ४. नव्याच धर्तीवर आधारित पुस्तकी ज्ञान व व्यवहार यांची सांगड घालणार. जनतेबरोबर अधिकाधिक संपर्क ठेवणार आणि बाकी पक्षांचे दांभिक स्वरूप चव्हाट्यावर मांडणार. तसेच वारंवार आत्मपरीक्षण करणार.

## प्रथम कोणत्या संघटनात्मक बाजू लक्षात घेणार ?

आदर्शवाद व राजकारण यांची नीट मांडणी करून संघटनेपुढे त्याचे सुस्पष्ट स्वरूप मांडणे. क्रान्तिकारी हालचालींची माहिती देऊन क्रान्तिकारी संघ स्थापन करणे. शहरांमध्ये काम करण्याऐवजी ग्रामीण भागातच क्रान्तिकेन्द्रे स्थापन करणे. शहरांमध्ये आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक हालचाली करण्याऐवजी कामगारवर्गाला क्रान्तीच्या नेतृत्वासाठी तयार करणे. सभासदांची नोंदणी करण्यासाठी पक्षांतर्गत गटांची स्थापना करणे,* ती अशासाठी की, सभासदांची संख्यात्मक वाढ न होता गुणात्मक वाढ व्हावी. जनसंपर्क टीकेने साधण्यात येणार होता. (स्वतःच्या व इतर पक्षांच्या.)

इथेच हे लक्षात घेतले पाहिजे की, जनसंपर्क हे पक्षाच्या स्वरूपातले व संघटनात्मक कार्यातले केवळ शेवटचेच कलम नव्हते, तर तो प्रत्यक्ष कसा वाढवायचा वा वाढवायचा किंवा नाही याकडेही दुर्लक्ष करण्यात आलेले होते.

जुलै १९६९ च्या लिबरेशनच्या अंकात चारु मुझुमदाराने याबाबतीत विवाद्य विधाने केली. प्रमुख प्रश्न असे होते :

१. गनिमी लढा हाच एकमेव मार्ग आहे का ? २. जनसंघटन वाढविण्याची आवश्यकता आहे काय ? ३. पक्ष गुप्त संघटना असावी काय ?

यावरची मुझुमदारची उत्तरे अभ्यसनीय आहेत : १. प्रचंड जनसंघटनाद्वारे कृषकक्रान्ती होऊ शकत नाही तर फक्त भूमिगत पक्षसंघटनाच हे कार्य करू शकते. २. गरीब, भूमिहीन, मध्यम व श्रीमंत असे शेतकऱ्यांमध्ये चार वर्ग असल्याने संपूर्ण शेतकऱ्यांची अशी जर संघटना बांधलीच तर तिच्यावर मध्यम व श्रीमंत शेतकऱ्यांचाच प्रभाव अधिक राहील. ३. अशी संघटना (फक्त शेतकऱ्यांची) बांधलीच तर ती उजळमाथ्याने वावरणाऱ्या संस्थांसारखी होऊन साऱ्या हालचाली उघडपणे करण्याकडे झुकेल आणि त्यातून फक्त सर्व सार्वजनिक संस्थांचे असते तसे प्रतिक्रियावादी नेतृत्व जन्माला येईल. ४. गरीब आणि भूमिहीन शेतकऱ्यांचे या संघटनेवरील नेतृत्व केवळ भूमिगत पक्षाद्वारे स्थापता येईल. ५. कृषकक्रान्ती अशा नेतृत्वाखाली चालविण्याचा गनिमी लढा हा एक आणि एकच मार्ग आहे.

हा गनिमी लढा संपूर्ण कृषकवर्ग देणार नव्हताच. जे राजकीयदृष्ट्या जागृत आहेत अशाचाच एक वर्ग हा लढा प्रथम सुरू करील. त्यामुळे सुरुवातीला हे एकांड्या शिलेदारांचेच बंड वाटण्याचा संभव आहे. इथेच मुझुमदारने घाईघाईने हेही स्पष्ट केले की, तो पुरस्कार करीत असलेला हा मार्ग चे गव्हेराच्या मार्गाहून दोन बाबतीत भिन्न होता. एक तर चे गव्हेराच्या मार्गाचे नेतृत्व पेटी बूर्ज्वा इंटेलेजेन्शियाकडे होते आणि दुसरे म्हणजे त्याच्या मार्गाला शस्त्रांची जरुरी होती. तर CPI(M–L) चा लढा लोकांचा होता ! (ही विधाने इतकी परस्परविरोधी आहेत की त्यावर भाष्य नकोच.)

नोव्हेंबर १९६९ च्या Liberation च्या अंकात याच मार्गाचे समर्थन करण्यात आले होते. हुनानविषयी माओ-त्से-तुंगने जो सुप्रसिद्ध लेख लिहिला होता, त्यात उल्लेखिलेली गुप्त संघटना अशाच स्वरूपाची होती आणि कनु संन्यालने तराईवरचा जो अहवाल सादर केला होता, त्यातही अशाच संघटनेची जरुरी प्रतिपादन केली होती असे सांगण्यात आले.

इथेच असेही सांगण्यात आले की, मुझुमदारच्या मते प्रथम वर्गशत्रूंपैकी काहींचा व्यक्तिशः नायनाट केल्यानंतरच कृषकसमित्यांची स्थापना करावी. त्याआधी इतरांना ग्रामीण भाग सोडायला भाग पाडणेही भाग आहे.

वस्तुतः हुनानमध्ये घडले ते याउलट होते. प्रथम पक्षाच्या नेतृत्वाखाली ठिकठिकाणी शेतकऱ्यांच्या, स्त्रियांच्या व लहान मुलांच्या संघटना निर्माण झाल्या व त्यानंतर निदर्शने, सभा झाल्या. इतकेच नव्हे, हुनानमधील संघटना गुप्त असल्याचाही उल्लेख नाही.

मुझुमदार जो माओच्या अनुकरणाचा दावा करीत होता, त्यात त्याने लोकांना घाबरून टाकून एकत्र आणण्याचा, गतिमान करण्याचाही मुद्दा माओच्या वचनाविरुद्ध प्रमुख मानला नव्हता, तर मूठभर लोकांचे खच्चीकरण हे प्रमुख मानून नंतर त्याने लोक स्फूर्ती घेतील अशी काहीशी लिन पियाओने व्हिएतनाममध्ये घेतलेल्या भूमिकेप्रमाणे कार्यपद्धती मांडलेली होती. मुझुमदारने ही कल्पना स्वतः श्रीकाकुलमच्या उदाहरणावरून घेतली होती. तिथे दहा जणांनी असाच एका जमीनदारावर हल्ला करून त्याला ठार मारण्याचा अयशस्वी प्रयत्न केलेला होता.

एका उदाहरणावरून केलेले हे नियम पुढे पक्षाला महागात पडले. श्रीकाकुलममध्ये चळवळ काही काळ जिवंत राहिली. याचे कारण ती लोकांनी मोठ्या प्रमाणात भाग घेतलेली चळवळ होती.

Liberation च्या जुलै १९६९ च्या अंकात पीपल्स कोर्टचा एक मासलाही वाचण्यालायक आहे. दोनशे लोकांच्या एका गनिमी गटाने एका जमीनदाराला मृत्युदंड ठोठावला. त्याला तत्काळ ठार मारण्यात आले आणि तेवढ्यावर संतुष्ट न झालेल्या लोकांनी त्याच्या रक्ताने घोषणा रंगविल्या !

बहुतांशी बंगाली सभासद असणाऱ्या CPI(M-L) ला ही

श्रीकाकुलम्शी चळवळ फारच स्फूर्तिदायक वाटली व APRCC ला त्यांनी टीकेखाली धरले. वस्तुत: चळवळीचा लोकांशी असणारा संबंध व व्यापक जनहिताचे नाते वर सांगितलेल्यासारख्या घटनांपासून सुटत आलेले होते. कारण चळवळीच्या यशाचे मोजमाप किती वर्गशत्रू ठार मारले गेले यावर ठरविण्यात येते. वैयक्तिक हल्ल्यांवर अखेर ही चळवळ गेली आणि तिचे पर्यवसान पोलिसांच्या प्रचंड व पद्धतशीर दडपशाहीत झाले.

## बंगाल व बिहारमधील समकालीन लढे

चारु मुजुमदाराच्या लढ्याच्या तंत्रातील उणीवा लक्षात घेण्यासाठी बिहारमधील मुशाहरी व पश्चिम बंगालमधील देब्रा–गोपीवल्लभपूर येथील लढ्यांचे धडे लक्षात घेणे उचित ठरेल.

मुशाहरीमध्ये जो लढा झाला तो प्रथम लोकांच्या पाठिंब्यावरच अवलंबून होता. या लढ्याचा अहवाल सत्यनारायण सिंगने, जो आज CPI(M–L) चा प्रमुख नेता आहे, त्याने Liberation च्या १९६९ च्या अंकात सादर केलेला होता. त्यामुळे त्याचे महत्त्व अधिक आहे. ‘जेव्हा पोलिसाचे गराडे वाढले व दडपशाही अधिक होत गेली, तेव्हा लोकांच्या पाठिंब्याची गरज कमी झाली. लहानलहान गटच अधिक परिणामकारक ठरू लागले’, असा या गृहस्थाने निष्कर्ष काढला आहे. वस्तुतः श्रीकाकुलम्मधील चळवळ नेमक्या याच कारणास्तव बंद पडली होती. पोलिसांचे वर्तुळ जसजसे आवळत जाईल तसतसे अवलंबिण्याचे मार्गही अधिकाधिक अभ्यासाने शोधून काढले पाहिजेत. पूर्वी असा वेढा जेव्हा जवळजवळ येई तेव्हा गनिमी युद्ध करणाऱ्यांची प्रमुख तुकडी शेजारच्या प्रदेशात पळून जाई; पण ती पळून गेल्यानंतर टक्कर देण्यास समर्थ अशी शक्ती मागे न राहिल्याने मूळचा विभाग ताबडतोब राजकीय दृष्टया थंड पडे. तेव्हा प्रचार व वर्गशत्रूचा नायनाट हे राजकीय; आणि पक्षाची बांधणी, गनिमी गटांची बांधणी व किसान संग्राम समितीची बांधणी ही संघटनात्मक अशी कार्ये करणे निकडीचे होते. मुशाहरीचा नक्षलवादांत भर टाकणारा दुसरा मुद्दा म्हणजे वर्गशत्रूचे हनन करण्याचा जो कार्यक्रम केवळ प्रथम व जनजागृतिकारक म्हणून हाती घेतला जाई, तो प्रमुख तुकडी पोलिसांच्या वेढ्यातून सुटल्यावरही चालू ठेवावा असा विचित्र निष्कर्ष यामध्ये काढण्यात आला.

गोपीवल्लभपूर : जमीनदाराकडून साठविलेला भात पळवायचा होता. दोन पर्याय खुले होते. पहिला म्हणजे सशस्त्र पथकाला चेतावणी देऊन त्याने जमीनदाराच्या घरावर हल्ला करून त्याचा समाचार घ्यायचा आणि तोपर्यंत लोकांनी भात पळवायचा. दुसरा, गनिमी पथकाने नीट शोध घेऊन (जमीनदाराकडली शस्त्रसज्जता वगैरे) योग्य वेळी त्याला उडवायचा. बंगाल–बिहार–ओरिसाची जी प्रादेशिक समिती होती, तिने २१ ऑगस्ट १९६९ ला मुजुमदारच्या पंथाने जायचे ठरविले. डिसेंबर १९६९ च्या लिबरेशनमध्ये अशी कबुली देण्यात आली आहे की, ‘भात पळविणे’ एवढ्याच घोषणेमुळे स्थानिक ग्रामीण लोक जमा झाले मुजुमदाराच्या मते ही घोषणा म्हणजे साध्या दरोड्याची घोषणा ठरली असती. तिच्यात क्रांतीचा मागमूसही नव्हता. राज्यसत्ता बळकावण्याच्या मार्गातली ती पहिली पायरी नव्हती अगर प्रोलेटॅरिअटच्या राजकीय जागृतीसाठीही ही घोषणा उपयोगी नव्हती; पण वस्तुस्थिती मात्र अशी होती. या लोकांनी इतरेजनाच्यात ही बातमी पसरवावयाची होती ज्यायोगे पोलिसांना फक्त मूठभर क्रांतिकारकांना सामना न देता संपूर्ण जनसंख्येला तोंड देणे भाग पडावे.

एक ऑक्टोबरला पहिला टप्पा पार पाडण्यात आला. दुसरा टप्पा चुकीच्या तत्त्वज्ञानावर आधारित असल्याने भलत्याच मार्गावर गेला. दोन महिन्यात शेकडयांनी शेतकरी सशस्त्र मार्गावर झुकले, जमीनदार पळून गेले; पण खरी परीक्षा पोलिसांची प्रचंड कुमक आल्यावर होती आणि दुर्दैवाने येथे चळवळीची श्रीकाकुलम्मधलीच उणीव उघडी पडली. जर एका ठिकाणी असलेले शिक्षित पथक राजकीयदृष्ट्या शेतकऱ्यांना जागृत करू शकत होते, तर पोलीस आल्यावर दुसरीकडे हेच पथक अगदी पहिल्या प्रमाणात नाही पण किमान जागृतीही करू शकेल अशी अपेक्षा होती; पण तसे झाले नाही आणि राख साचत साचत धुमसणारी चळवळ विरून गेली.

सर्वात महत्त्वाची भर नक्षलवादात कोणती पडली होती, तर एखाद्या जमीनदाराच्या हत्येने जमीनदारी संपत नव्हती हे यामुळे लक्षात आले. पीक ताब्यात घेणे हा महत्त्वाचा कार्यक्रम मानण्यात आला; पण त्याहूनही वर्गशत्रूला कायमचे हद्दपार करून अथवा निष्प्रभ करून जमीन ताब्यात घेणे हा महत्त्वाचा कार्यक्रम असता तर परिस्थिती फार निराळी झाली असती. कृषकसमितीच्या कार्यावर जोर देण्यात आला, तेवढेच लक्ष जमिनीच्या फेरवाटपाकडे पुरविण्यात आले असते तर शेतकऱ्यांचे कायमचे कल्याण झाले असते. नुसतीच पिके नेणे ही क्रान्ती कधीच म्हणता येणार नाही.

या व अशाच अनेक व्यावहारिक अडचणीतून चळवळीच्या मूलभूत भूमिकेत जमीनअस्मानाचा फरक पडू लागला. नेतृत्व जे सांगत होते किंवा पुस्तकी तर्कशास्त्राधारे जे अंदाज बांधीत होते, त्याहून वस्तुस्थिती निराळ्याच रूपात समोर ठाकत होती. प्रत्येक ठिकाणच्या विभिन्न परिस्थितीकडे जास्तीत जास्त डोळसपणे न पाहिल्याने कदाचित असे झाले असावे. श्रीकाकुलम्चाच निकष शंभर टक्के एखाद्या ठिकाणी लावला तर परिणाम निश्चितच निराळा होई. जमीनदार हा सुद्धा वर्गशत्रू मानला तरी त्याची प्रतिक्रियासुद्धा तितक्याच तीव्रतेची आढळली नाही. लोकांच्या राजकीय जागृती व कार्यक्षमता या गोष्टीचा अंदाज अचूक बांधणे ही तर केवळ एक अशक्यप्राय गोष्ट राहिली. ढापणे लावून क्रान्ती होत नसते हेच प्रत्येक नवीन अपयश सांगत होते आणि माओवादाचे कर्णे, आपल्याच कानठळ्या बसून स्वतंत्र विचारशक्ती गुंग करतील एवढ्या जोरात लावलेल्या नेतृत्वाने लोकांचा परत एकदा कसा अपेक्षाभंग केला हे पुढील लेखांकात पाहू.

[ क्रमशः ]

# अरुण कोलटकरच्या कविता

**क्षणोक्षणी ठेचकळायला लावणाऱ्या !**

कोलटकरांचा ह्या कवितासंग्रह अलीकडेच प्रसिद्ध झाला असला तरी वेगवेगळ्या अनियतकालिकामधून आणि सत्यकथेसारख्या मासिकांतून पूर्वीपासून म्हणजे दहाबारा वर्षांपासूनच त्यांच्या कविता `रसिकांना परिचित आहेत. सामान्य वाचकाच्या कल्पनाशक्तीला वारंवार धक्के देणारी कोलटकरांची कविता आधुनिक मराठी कवितेचे सगळे भलेबुरे गुणविशेष घेऊन उभी आहे.

जुन्या कवितापेक्षा नव्या कवितेतलं उपमेयच बदलल्यानं उपमानही सर्वार्थानं बदलणं अपरिहार्य आहे. हे नवं उपमेय स्थलकालाचा एक तीव्र संदर्भ बागवणारं आहे. मर्ढेकरी कवितेनं ह्या जीवनसापेक्ष उपमेयांचं सच्चं दर्शन घडवलं आणि तीच परंपरा नानाविध रूपात आधुनिक कवींनी जोपासली. अरुण कोलटकर अशा कवींपैकीच एक आहेत.

माणसाचं जीवन, त्या जीवनावरची असरुय दडपणं, वाढता जीवनकलह आणि ह्या सर्वांतून जीवनाला आलेली एक क्षुद्रतेची कळा त्याची एक सर्वंकष जाणीव कोलटकरी कवितेवर पसरून राहिली आहे.

कोलटकर जे जीवन अनुभवताहेत ते जीवन खरोखरच तसं भेदक आहे; पण ते ज्या मनोधर्मातून ते अनुभवताहेत तो मनोधर्म मात्र काहीसा बिकृत, काहीसा फिडलेला वाटतो. ह्या मनोधर्माला अनुसरून आलेल्या प्रतीतीतून त्यांच्या कवितांनी जन्म घेतला आहे.

मानवीयी जीवनाची विरूपता, माणसाच्या इच्छाआकांक्षाचं, विचारविकारांचं, वासनाभावनांचं इथेतिथे घडणारं, कधी भयाण तर कधी बेढोल, कधी किळसवाणं तर कधी केविलवाण दर्शन जेव्हा कोलटकरी कवितेतून व्यक्त होत तेव्हा प्रत्येकाच्या मनानं जपलेल्या, जोपासलेल्या भद्रतेला न मानवणारी शब्दयोजना आणि त्यातून व्यक्त होणारा विरूप अर्थ अस्वस्थ करून सोडतो.

कविता लिहिताना नेहमीच काही objects of references घ्यावी लागतात. प्रत्येक नव्या अनुभवाबरोबर त्यात भर पडत असते; ह्या संदर्भवस्तूंचे रूप अनेकदा एकच असते पण त्याचे नवनवीन प्रतीतीधर्म कवी उजेडात आणीत असतो. कोलटकरांच्या अनुभव घेण्याच्या प्रक्रियेत ह्या संदर्भवस्तूंचे प्रतीतिधर्म फार विकृत आशय व्यक्त करू पाहतात आणि मग त्याची तृप्तीही बेवारशी होऊन टचकन उमलते–पाण्यात भिजारलेल्या सिगरेटसारखी 'अन्'

> दोन केसाळ हृदयं भादरलेली,
> सातूच्या लिंगाच्या बिबट्या संगीताने
> उधळून गुलाल डागला कानांचा व्यूह
> ज्याच्या सर्वांगावरती,
>
> त्यांची थेज चालू लागली उठून तिरडीच्या पायानी थेट,

असे त्यांचे प्रत्यय आकाराला येतात.

जे कविमन अनुभवाला सामोरं जात असतं ते अलीकडच्या काळात स्वत.च स्वतःशी अधिकाधिक संवाद करताना दिसतं आहे. जीवनाच्या सर्वार्थानं सामान्यीकरणाविरुद्धची ही कदाचित जोरदार प्रतिक्रिया असेल, कदाचित् भोवताली हरघडी अनुभवाला येणाऱ्या विफलतेमुळे स्वत.च्यात तरी काय चालले आहे ह्याचा शोध घेण्याची ती प्रामाणिक प्रक्रियाही असेल; पण ह्याचमुळे ती जास्तजास्त दुर्बोध होत जाते हेच खरं.

वाचकाच्या आस्वादनाला क्षणोक्षणी ठेचकळायला लावणारी ही कविता जितकी गुतागुतीच्या प्रतिभाची भाषा बोलते. तितकच ती जो अनुभव व्यक्त करते त्या अनुभवाचं स्वरूपही गुतागुंतीचंच असतं.

भोवती वावरणारा माणूस कोलटकर जेव्हा खोलवर जाऊन उलगडण्याचा प्रयत्न करतात तेव्हा आजच्या युगानं माणसाला बहाल केलेली काही भयानक सत्य त्यांना सापडलेली दिसतात. आजचा माणूस हा त्याच्या जीवनाचा स्वामी नाही, तर जीवनानं पसरलेल्या जबड्यात मान अडकलेला दुबळा जीव आहे, निसर्गाचा तो घास बनला आहे, त्याचं व्यक्तिमत्त्व शतशः दुभंगलेलं आहे आणि त्याचं जीवन त्याच्या स्वतःसाठी उरलेलंच नाही; हे 'मलखांब', 'अन्न', 'चट्टामट्टा', 'बेडाच्या टेबलावर –' यासारख्या अनेक कवितामधून ते व्यक्त करतात. कधी

घाणा किंवा चक्कीसारख्या कवितामधून

> 'ही चक्की आता मॅड झाली
> जो हात घालील भीक,
> तोच खाऊन थमेल भूक
> आता हिची !'

असं एक भयानक जीवनयंत्र ते उभं करतात, तर कधी 'प्रज्वालितो ज्ञानमयः प्रदीपः' अशा ओळी मनात बोळत असताना 'दीवे 'सारख्या कवितेतून एक विदारक वास्तव उभं करतात.

तक्त्यातून आपण माडलेल्या बेंगरूळ सस्कृतीसारखंच झालेलं आपलं जीवन, श्रद्धास्थानांची नव्या पिढीला जाणवणारी निरर्थकता तर. कधी कुणाबद्दल वाटणारी पुसटशी ओलव 'तक्ता', 'दैवत', 'श्रीज्ञानेश्वर–समाधिवर्णन' अशा कवितामधून व्यक्त होते.

### दुसऱ्या टोकाचा क्षोभ

कोणत्याही समाजाची धारणा खरं–खोटं, श्रद्धा–अश्रद्धा ह्यांच्या तडजोडीमधून वाहते. नवे कवी ह्या तडजोडीवर चिडलेले दिसतात. त्यातूनच चीड, क्षोभ, संतापानं भरलेल्या त्याच्या कविता निर्माण होतात; परंतु पूर्वकवितेला स्वप्नाळू आदर्शवाद जसा एका टोकाचा तसाच ह्या कवीचा क्षोभही दुसऱ्या टोकाचा आहे. समाज कधीच पूर्णतः आदर्श नसतो आणि कधीच पूर्णत. विकृतही नसतो. तसं माणसाचं मनही प्रकृति–विकृतीच्या उभ्या–आडव्या धाग्यांनी बनलेलं असत; पण अखेर माणसाचं वा समाजाचं विकृती हे लक्ष्य असू शकत नाही. विकृतीला जर प्रकृतीचं स्थान मिळू लागलं तर काय

होईल ? ह्याचा विचार जरूर करायला हवा.

'चरित्र 'सारख्या कवितांमधून दिसणारा कोलटकरांचा भेदक उपरोध, 'डोळ्यावरनं पट्टी बांध आणि आणि आरामखुर्चीत बसून रहा राजासारखा' असा ठिकठिकाणचा विलक्षण विरोध कितीही समजून घेतला तरी प्रश्न एवढाच आहे की, जिच्या डोळ्यांना विरूपताच तेवढी दिसते ती अधिकाधिक दुर्बोध होत जाणारी • कविता वाचकांशी कितपत संवाद साधील ? 'सर्वत्र पसरलेली घाण हेच जर वास्तव आहे अन् आमची पावलं जर स्वच्छ राहणारच नाहीत तर ती धुवा कशाला ? ती तशीच असू देत, तशीच असणार !'—ही दृष्टी कितपत योग्य आहे ?

—अरुणा ढेरे

अरुण कोलटकरच्या कविता
प्रकाशक : अशोक शहाणे
३९ नाथमाधव, कांदिवली (पूर्व)
मुंबई ४०००६७
पृष्ठे १३१, किंमत २० रुपये

## एका गुलाम निग्रो घराण्याचा वेधक इतिहास

# ॲलेक्स हॅलेचे 'रूटस्'

नदीचे मूळ आणि ऋषीचे कूळ शोधणे अत्यंत अवघड आहे असे म्हणतात; पण आपल्या आफ्रिकन पूर्वजांचा शोध घेण्याचा चिवटपणा एका अमेरिकन निग्रो माणसानें दाखविला. त्यासाठी तब्बल १२ वर्षे त्याने संशोधन केले, ५७ वाचनालयें पालथी घातली, हजारो कागदपत्रे चाळली आणि जवळजवळ ४ ते ५ लाख मैल प्रवास केला. या अथक परिश्रमाचे फलित म्हणजे सध्या अमेरिकत गाजत असलेली ॲलेक्स हॅलेची 'रूटस्' ही चरित्रात्मक कादंबरी.

'रूटस्' हा किंटेघराण्याचा इतिहास असला तरी त्याचा मुख्य नायक आहे कुंटा किंटे. त्याची छाप साऱ्या कादंबरीवर पडली आहे. हा कुंटा किंटे म्हणजे पश्चिम आफ्रिकेतील गांबिया देशात ज्युफूर खेड्यात राहणारा तरुण. एक दिवस ढोलाकरिता चांगले लाकूड मिळविण्यासाठी जंगलात गेला असता गोरे लोक झडप घालून त्याला पळवून नेतात. हे गोरे असतात अमेरिकेत गुलामांचा व्यापार करणारे दलाल ! कुंटाच्या पायात गुलामीच्या बेड्या पडतात आणि येथूनच किंटेघराण्याच्या चित्तथरारक इतिहासाला सुरुवात होते.

कुंटाला अमेरिकेच्या ॲनापोलिस बंदरात विक्रीसाठी उभे केले जाते. ८५० डॉलर्सच्या मोबदल्यात मास्टर वॉलर त्याला ताब्यात घेतो व व्हर्जिनिया राज्यातील आपल्या शेतीवाडीवर वेठीस धरतो. उत्तर अटलांटिक महासागरातून बोटीच्या तळघरात बसून केलेला भयानक प्रवास, अमानुष मारपीट व असह्य शारीरिक व मानसिक ताण या दिव्यातून गेल्यावरही कुंटाची स्वातंत्र्येच्छा विझत नाही. मोजून चार वेळा हा पठ्ठ्या पळून जाण्याचा प्रयत्न करतो; पण हा काळा गुलाम पळून जाणार तरी कोठे ? निग्रोंविरुद्ध केलेले कडक व क्रूर कायदे, पळणाऱ्या गुलामांना पकडून देणारे धंदेवाईक पारधी यांच्या तावडीतून कुंटा सुटू शकत नाही; पण प्रत्येक वेळी तो पकडला जातो व चामडी सोलून निघेपर्यंत मार खातो तो पुन्हा पळण्यासाठीच ! शेवटच्या पलायनात मात्र हे धंदेवाईक पारधी त्याला पकडतात व शिक्षा म्हणून कुंटाचे अर्धे पाऊल कुऱ्हाडीने छाटले जाते.

आपल्या परमप्रिय मातृभूमीचे दर्शन आता होणे शक्य नाही हे कुंटाला कळून चुकते. पुढे कुंटा लग्न वगैरे करून स्थिरस्थावर होण्याचा प्रयत्न करतो. तरी इतर निग्रो गुलामांपेक्षा तो आपल्याला वेगळा समजतो. सभोवतालच्या आफ्रिकन गुलामांचे मख्ख चेहरे, गोऱ्या मालकांपुढील लाचारी व त्यांचे गोऱ्या संस्कृतीचे अंधानुकरण यामुळे तो अस्वस्थ होतो. गुलामीच्या अंधःकारातही कुंटा मनोमन निश्चय करतो की, या परकीय भूमीतदेखील आपली आफ्रिकन संस्कृती आपण जतन करायची. इंग्लिश भाषेतील शब्द शिकत असतानाच आपल्या मॅंडिनिका भाषेचीही तो उजळणी करतो. त्यातील शब्द आपल्या मुलीला — किझीला — शिकवितो. आपला गाबिया, ज्युफूर गाव, आपले आई-वडील, किंटे-घराणे याची तिला तपशीलवार माहिती सांगतो. अमेरिकेत आल्याबरोबर त्याला नवीन नाव ठेवले जाते-टोबी; पण कुंटा मात्र अट्टाहासाने सांगतो, 'माझे नाव आहे कुंटा किंटे !'

कुंटाला पुन्हा एकदा दुर्दैवाचा फटका बसतो तो किझीला विक्रीसाठी काढले जाते तेव्हा. किझीची विक्री होते आणि तिचा नवीन मालक मास्टर ली तिला घेऊन जातो. त्याच्यापासून तिला मुलगा होतो, जॉर्ज. या जॉर्जलाही मुले होतात—नातवंडे होतात. जॉर्जची व त्याच्या कुटुंबियांचीही पुढे काही काळ ताटातूट होते. अशा प्रकारे किंटेघराण्यातील ही मंडळी आपल्या आफ्रिकन पूर्वजांचे स्मरण करीत गुलामीत दिवस कंठतात ते १८६५ साली अब्राहम लिंकनच्या पक्षाचा यादवी युद्धात विजय होईपर्यंत. लिंकनच्या 'इमॅन्सिपेशन प्रोक्लमेशन'ने हे किंटेघराण्यातील गुलाम जवळजवळ १०० वर्षांनंतर पुन्हा स्वतंत्र होतात.

कुंटा किंटेचे चरित्र म्हणजे एक वेगवान प्रवाहच आहे. त्याच्या आयुष्यात एकामागोमाग एक चित्तथरारक घटना घडत जातात व वाचक त्यात गुंगून जातो. हॅलेने मोठ्या कौशल्याने या घटनांचे जाळे विणले आहे. हॅलेची भाषा फारशी सुंदर नसली तरी ओघवती आहे व त्याचे निरीक्षण व वर्णनशक्ती जबरदस्त आहेत. आफ्रिकन लोकांच्या जीवनपद्धती, आफ्रिकेतील जंगले, कुंटाला दिले जाणारे शिक्षण याची वर्णने बहारदार आहेत. पायात साखळ्या अडकविलेल्या अवस्थेतील कुंटाचा बोटीतून अमेरिकेपर्यंतचा प्रवास तर अंगावर शहारे आणतो. आपल्या व इतरांच्या मलमूत्रात लडबडलेले, अर्धपोटी, रोगराईने लडबडलेले व मृत्यूच्या दारात सदैव उभे असलेले कुंटा व त्याच्यासारखे इतर गुलाम यांच्या वर्णनाने मन सुन्न होते.

किझीच्या विक्रीनंतर कथानक जेव्हा कुंटाला सोडून किझीचा मागोवा घेते तेव्हा आपोआपच ते काहीसे संथ बनते. खाली मुंडी घालून मालकाच्या जमिनीवर राबणाऱ्या गुलामांच्या जीवनात चित्तथरारक

घटना किती घडणार? पण ही उणीव हॅलेने आपल्या मनोज्ञ व्यक्तिचित्रणाने भरून काढली आहे. झुंजीसाठी कोंबडे तयार करणारा 'चिकन जॉर्ज', कोंबडयाच्या झुंजीवर श्रीमंत झालेला व एका मोठ्या झुंजीत कफल्लक होणारा त्याचा मालक 'मास्टर ली' आणि किझी यांची व्यक्तिमत्त्वे वेधक उतरली आहेत. कुंटाच्या वंशावळीतील लोकांच्या जीवनातील बारिकसारिक क्षुल्लक घटनात जर लेखकाने काटछाट केली असती तर 'रूटस्' सुटसुटीत व अधिक वाचनीय बनलें असते; पण शेवटच्या प्रकरणातील लेखकाच्या मनोगतावरून दिसते की केवळ पुस्तक वाचनीय व्हावे म्हणून लेखक लिहीत नाही, तर मोठ्या तळमळीने, एक पवित्र कर्तव्य केल्याच्या भावनेतून लेखक आपल्या किंटे घराण्याचा इतिहास सांगत आहे. म्हणून पुस्तकाच्या उत्तरार्धातील काहीशा जादा लांबणीकडे दुर्लक्ष करता येईल.

'रूटस्' ही कादंबरी म्हणजे अमेरिकेचे 'दलित साहित्य' म्हणता येईल; परंतु हॅलेने कोठेही आक्रस्ताळेपणा न करता, गोऱ्या लोकांना ऊठसूठ शिवीगाळ न करता मोठ्या संयमाने परंतु तितक्याच परिणामकारकरीत्या हा विषय हाताळला आहे. आपल्या दलित लेखकांनी यापासून बोध घ्यावा.

काळ्या लोकांच्या काळजाला भिडणारी ही ऐतिहासिक कादंबरी अमेरिकन निग्रोंमध्ये अमाप लोकप्रियता कमावील यात शंका नाही; परंतु इतरांनासुद्धा 'रूटस' अंतर्मुख बनवील व गेल्या काही वर्षातील एक उत्कृष्ट कलाकृती वाचल्याचे नक्कीच समाधान देईल.

—किरण गोखले

रूटस्

लेखक : ॲलेक्स हॅले

प्रकाशक : पॅन बुक्स लि.

पृष्ठे : ३८८.

किंमत : £ १.५०.

# आमचे ग्रंथालय

## The Russians

By Hedrick Smith
( Sphere Books Limited, Pages 639, Rs. 20.00 ).

हेड्रिक स्मिथ याने हळूच 'आयर्न कर्टन'वर करून रशियाच्या सामाजिक, राजकीय व आर्थिक जीवनाला गवसणी घालण्याचा प्रयत्न केला आहे. हेड्रिक स्मिथ हा ३ वर्षेपर्यंत मॉस्कोमध्ये 'न्यूयॉर्क टाइम्स'चा प्रतिनिधी होता. सध्या स्मिथ हा त्याच वर्तमानपत्राचा वॉशिंग्टन येथील प्रमुख आहे. या तीन वर्षांच्या कालखंडात त्याला जेवढा वेळ मिळाला व रशियन सरकारने त्याला जेवढी हिंडायला मुभा दिली तेवढा तो हिंडला. स्मिथला तिथल्या पुष्कळ लोकांनी माहिती दिली. या लोकांची काही नावे स्मिथने या पुस्तकात दिली आहेत; परंतु कधीकधी स्मिथला असे वाटेल की ही नावे दिल्याने माहिती देणाऱ्याच्या जिवाला धोका आहे त्या वेळी त्याने खरे नाव बदलून काल्पनिक नाव पुस्तकात दिले आहे.

या पुस्तकात रशियाच्या ( class-struggle) वर्णभेद, भ्रष्टाचार, खाजगी जीवन, स्त्रीजीवन, लहान मुले, तरुणांचे जीवन, खेडयाचे जीवन, औद्योगिक जीवन, नेते, कम्युनिस्ट पार्टीच्या परंपरा, सायबेरिया, रशियन संस्कृती, बौद्धिक जीवन, धर्म व इतर अनेक विषयांवर माहिती आहे.

जॉन गंथरने पुष्कळ वर्षांपूर्वी Inside Russia लिहिले. परंतु ते अजूनही आवडीने वाचले जाते. जॉन गंथरच्या संवेदना कमालीच्या तरल होत्या. अर्थात त्याच्यापुढे स्मिथचे हे पुस्तक फिके पडते; परंतु हे सांगणे म्हणजे स्मिथच्या पुस्तकाचे मोल कमी करणे नव्हे. कारण स्मिथचे पुस्तक अद्ययावत् आहे म्हणून त्यात पुष्कळ नवीन नवीन माहिती आहे.

रशिया म्हणजे 'क्लासलेस सोसायटी' असा थोडाफार समज अजून सुद्धा प्रचलित आहे; परंतु तिकडे सुद्धा क्लास स्ट्रगल किती प्रमाणात आहे याची जाणीव हे पुस्तक वाचून होते.

अलेक्झांडर सोल्झेनित्सिन, मॅडवेडेव बंधू, साखारोव्ह व इतर मंडळी म्हणजे रशियाच्या प्रस्थापित व्यवस्थेविरुद्ध आवाज उठविणारी. या मंडळीचे अनुभव व मते ही सुद्धा या पुस्तकात दिली आहेत. एका मॅडवेडेव बंधूला तर सरळ वेडा म्हणून मनोरुग्णालयातच ठेवला गेला होता. रॉय व झॉर्स मॅडवेडेव्ह हे दोघे बंधु शास्त्रज्ञ व इतिहासकार आहेत. झॉर्स मॅडवेडेव्ह हा शरीरातल्या पेशी 'म्हाताऱ्या' का होतात याच्यावर संशोधन करतो. त्या कामासाठी त्याला मृत्यूची आकडेवारी पुष्कळ वेळा लागत असे; पण रशियात मृत्यूची आकडेवारी म्हणजे जणू राष्ट्राचे गुपित! त्याला खरी आकडेवारी कधीच मिळाली नाही. रॉय मॅडव्हेडेव्ह हा प्रख्यात इतिहासकार व biologist आहे. त्याचे म्हणणे असे आहे की रशियन शास्त्रज्ञांना बौद्धिक स्वातंत्र्य अजिबात नाही व त्यांच्यावर सत्तेचा वरचष्माच जास्त असतो. या सत्तेच्या वरचष्म्यामुळे कधीकधी रशियन विज्ञानाला मोठी किंमत मोजावी लागली आहे. याचे एकच उदाहरण म्हणजे ट्रॉफीम लिसेंको या गृहस्थाने biology वर २५ वर्षेपर्यंत आपला वरचष्मा ठेवला होता! त्याने अशी एक theory काढली की, 'The characteristics acquired from the environment could be transmitted in the evolutionary process". मेंडेलनी प्रचलित केलेले आनुवंशिकतेचे नियम त्या वेळेला रशियात मान्य नव्हते. ग्रीगर योहन मेंडल हा ऑस्ट्रियामध्ये रोमन कॅथॉलिक पाद्री होता व त्याने वनस्पतीवर बरेच प्रयोग करून अनुवंशिकतेचे बरेच सिद्धान्त पुढे आणले. आनुवंशिकतेच्या संशोधनाच्या विषयात त्याने फार मोठी भर घातली. पण या रशियाच्या ट्रॉफीम लीसेंकोने त्याची स्वतःचीच चुकीची तत्त्वे स्टॅलिनला व क्रुश्चेव्हला पटवून दिली! आता बघा गमत! ट्रॉफीम लीसेंको हा एक चुकीच्या मार्गाने गेलेला शास्त्रज्ञ होता. त्याने स्टॅलिन व क्रुश्चेव्ह या दोन Politicians ना विज्ञान शिकविले!

रॉय मॅडव्हेडेव्ह एकदा उरल्समध्ये यावो-

गावी शिक्षणाचा प्रचार करीत फिरत होता. एका मुलाच्या आईवडिलांना तो सांगत होता की त्या मुलाला त्यांनी शाळेत पाठवावे. यावर त्या पालकांनी सांगितले, ' एवढा ग्लासभर व्होडका पिऊन टाक ! त्याशिवाय आम्ही तुझ्याशी बोलणारही नाही ! ' जगात सर्वात जास्त मद्य पिणारा देश म्हणजे रशिया ! पण हे पिणे म्हणजे दोस्तीच्या पायी नव्हते. हे पिणे गारठा दूर ठेवण्यासाठी किंवा कंटाळवाणे जीवन क्षणभर विसरण्यासाठी किंवा वास्तवतेपासून पलायन करण्यासाठी असते असे स्मिथ म्हणतात; पण स्मिथना इथे असा एक प्रश्न विचारावासा वाटतो .की अमेरिकेत पिणे हे कशासाठी असते ? मानवी स्वभाव हा अमेरिकेत काय किंवा रशियात काय सर्व ठिकाणी तो सारखाच असतो.

'रशियाच्या प्रस्थापित व्यवस्थेविरुद्ध आवाज उठविणाऱ्या नावात सॉलझेनेत्सिनचे नाव सर्वांत अधिक परिचित आहे. साखारॉव्ह व मॅडव्हेडेव्ह बंधुद्वयांना तेवढी प्रसिद्धी मिळाली नाही; पण या तिघांनीही फार तोलामोलाची कामगिरी केली आहे. सॉलझेनेत्सिनचा स्वभाव मुळातच आक्रमक आहे. दिसायलाही तो एखाद्या धिप्पाड दाढीवाल्या संतासारखा दिसतो. त्याला नोबेल पारितोषिकही मिळाले आहे. या व इतर अनेक कारणांमुळे तो प्रकाशझोतात आला. साखारॉव्हही तसा बराच परिचित आहे; पण मॅडव्हेडेव्ह बंधुद्वयांविषयी फार कमी लोकांना माहिती आहे.

रॉय मॅडव्हेडेव्हनी पाश्चात्य देशात ' Let History Judge ' या नावाचा एक ठोकळाच छापला आहे. या पुस्तकात स्टॅलिनच्या पोलिस स्टेटची लक्तरे काढली आहेत. खरे म्हणजे हे पुस्तक सॉलझेनित्सिनच्या 'गुलाग आर्किपेलॅगो 'च्या दोन वर्षे आधी बाजारात आले होते. रॉय मॅडव्हेडेव्हचा जुळा भाऊ झॉर्स मॅडव्हेडेव्ह याने तर रशियामध्ये आनुवंशिकतेच्या शास्त्राची ट्रॉफीम लीसेंको याच्या कारकीर्दीत कशी गळचेपी झाली यावर दोन पुस्तकेच लिहिली आहेत. झॉर्स हा त्याचा जुळा भाऊ रॉय त्याच्यापेक्षा २० मिनिटांनी मोठा होता. हेड्रिक स्मिथ म्हणतात; की या कारणामुळे झॉर्स हा इतका अधिक धीट व पराक्रमी आहे ! या मॅडव्हेडेव्ह बंधुद्वयांनी मिळून एक Question of Madness ' या नावाचे पुस्तक लिहिले आहे. झॉर्स मॅडव्हेडेव्ह याला १९७० च्या दरम्यान मनोरुग्णालयात फसवून नेण्यात आले व त्याला तिथेच डांबून ठेवले. नंतर रॉय मॅडव्हेडेव्ह याने बराच आंतरराष्ट्रीय बोलबाला करून त्याची सुटका करण्याचा प्रयत्न केला. सॉलझेनित्सिननी लिहिलेल्या ' गुलाग 'बद्दल रॉय मॅडव्हेडेव्हने आपला संपूर्ण पाठिंबा दिला व ते पुस्तक तंतोतंत किती खरे आहे त्याबद्दल लेख लिहिले.

सॉलझेनित्सिन व साखारॉव्ह या दोघात तर. भलताच फरक आहे. साखारॉव्हला पाहिल्यानंतर हा किरकोळ मनुष्य एवढे आंतरराष्ट्रीय वादळ उठवील असे वाटत नाही. कुठे चर्चा चालली असेल तर हा साखारॉव्ह कुठे तरी कोपऱ्यात जाऊन बसेल. त्याच्याकडे कुणी बोलायला आलाच तर लाजाळू पक्ष्यासारखी आपली मान एकीकडे वाकवून तो त्याचे म्हणणे ऐकून घेत असे; पण एकदा का बोलणाऱ्याने त्याच्याशी ( rapport ) रिपोर्ट प्रस्थापित केला की मग तो त्याला सर्व काही सांगून टाकीत असे. साखारॉव्ह सदा अंतर्मुख झालेला, इनर स्पेसमध्ये गेलेला असे.

पण हा लाजाळू व अंतर्मुख झालेला साखारॉव्ह रशियन हायड्रोजन बॉबचा जनक आहे. अणुशक्तीच्या संशोधनक्षेत्रात, त्याची तुलना ओपनहेमर व टेलर यांच्याशी सहज होऊ शकेल. साखारॉव्हला २० वर्षे अणुसंशोधनाच्या प्रोग्रॅमसाठी अगदी एकटे

---


## नवीन दाखल झालेली काही पुस्तके

| | | |
|---|---|---|
| १. " मागे परतोनी पाहे " : (६१ व्यक्तींची चरित्रे व आत्मचरित्रे)– संपादित | रु. | ३०/– |
| २. बातचीत...भाऊसाहेब माडखोलकरांशी : (श्री. भाऊसाहेब माडखोलकरांच्या जीवनाचा व विविधांगी कर्तृत्वाचा परिचय)– प्रा. भास्कर नंदनवार | रु. | १०/– |
| ३. चार्जशीट : (कथासंग्रह–श्रीकांत सिनकर | रु. | १८/– |
| ४. प्रलय : (कादंबरी)–सौ. शैलजा राजे | रु. | १३/– |
| ५. प्रतिशोध : (कादंबरी)–कुसुम अभ्यंकर | रु. | |
| ६. निक्सनचा अध:पात : र. धो. घाणेकर | रु. | १६/– |

**ENGLISH**

| | | |
|---|---|---|
| 1. *A Matter of Conviction* : Evan Hunter | Rs. | 16 45 |
| 2. Raise The Titanic ! : (Bestseller–Adventure thriller)– Clive Cussler | Rs. | 18·90 |
| 3. Acapulco : (Bestseller–Novel)–Burt Hirshfeld | Rs. | 10/– |
| 4. Washington D. C. : ( Bestseller–The explosive novel of American power politics )–Vidal Gore | Rs. | 19/– |
| 5. An Eye To India : ( The first book written by a foreigner about emergency of India )–David Selbourne | Rs. | 14·55 |

**दि फिनिक्स लायब्ररी**

७२७ सदाशिव पोस्टासमोर, पुणे ३०


---

ठेवण्यात आले होते. बाहेरच्या जगाशी त्याचा संपर्क जवळजवळ तोडलाच गेला होता. त्याच्यासोबत नेहमी एक शरीररक्षक असे. तो पोहायला वगैरे गेला तरी सुद्धा तो शरीररक्षक त्याच्याबरोबर असे. रशियन सरकारने साखारॉव्हचा बराच सत्कार वगैरे केला; पण या सत्कारामुळे त्याला प्रसिद्धी लाभली नाही. कारण रशियात कधीकधी सत्कारसुद्धा गुप्तपणे होतात! प्रस्तुत पुस्तकाचा लेखक हेड्रिक स्मिथ याच्या मित्राने एकदा जुनाट झगा घातलेला साखारॉव्ह किराणा मालाच्या दुकानात पाहिला. तिथे आपल्या पणत्करिता साखारॉव्ह काही तरी विकत घेत होता. तिथे त्याला स्मिथच्या मित्रांखेरीज दुसऱ्या कुणी ओळखलेसुद्धा नाही!

वयाच्या २६ व्या वर्षी साखारॉव्हला डॉक्टर ऑफ सायन्सची पदवी मिळाली. त्याच्या ३२ व्या वर्षी तो 'ॲकॅडेमी ऑफ सायन्सेस'चा सभासद झाला. एवढ्या तरुण वयात या ॲकॅडेमीचे सभासद होणे हे फक्त ॲंड्रो साखारॉव्हनेच करून दाखविले. रशियात तो अगदी यशाच्या उत्तुंग शिखरावर पोहोचला होता. एकदा क्रेम्लिनमध्ये अण्वस्त्राची मीटिंग चालू असताना साखारॉव्हने ख्रुश्चेव्हला (चिठ्ठी लिहून!) स्पष्ट सांगून टाकले की, '१०० मीगॅटनच्या बांबची तांत्रिक दृष्टचा आवश्यकता नाही. राजकीय दृष्टचा ते एक risk होऊन बसेल व रेडियो ॲक्टिव्ह फॉल आउटमुळे मानवजातीला तो हानिकारक ठरेल.'




या साखारॉव्हला प्रसिद्धीची खुजली अजिबात नाही. हेड्रिक स्मिथला त्याची मुलाखत हवी होती ती साखारॉव्हने किती तरी महिने टाळली! रशियातील प्रेसनं त्याच्यावर भलतीच टीका करण्यास सुरुवात केली तेव्हा त्याने १९७३ मध्ये जगातील वर्तमानपत्रांना त्याची बाजू सांगितली.

साखारॉव्हने आपले सर्व पैसे कॅन्सरवर संशोधन करण्यासाठी देणगी म्हणून देऊन टाकले. त्याला अपराधी गंडाने पछाडले होते. कारण सबंध मानवजातीला काळिमा लावणाऱ्या अण्वस्त्राच्या संशोधनापासून त्याला तो पैसा मिळाला होता. त्याच्या घराभोवती साखारॉव्ह आइनस्टाइन सारखा मोठमोठे कपडे घालून फिरत असे. कुणी अभ्यागत आले तरी तो याच कपड्यांत त्यांचे स्वागत करीत असे.

ऑंड्री साखारॉव्हचे घरही त्याच्या कपड्यांसारखेच साधे व गबाळे असे. कधी-कधी पाश्चात्य देशांतील लोकांना रशियाला भेट दिल्यानंतर एक प्रश्न पडे, 'एवढी बलवान रशिया आणि साखारॉव्हसारखा गरीब, अंतर्मुख झालेला किरकोळ माणूस या रशियाला उपद्रवक्षम वाटतो कसा?

एकंदरीत हेड्रिक स्मिथने रशियन जीवनातील बारकावे फारच सूक्ष्म रीतीने व संवेदनाशीलतेने टिपले आहेत. पुस्तक पुष्कळच वाचनीय आहे; पण ते थोडे संक्षिप्त केले असते तर आणखीच वाचनीय झाले असते.

—जे. एन. पोंडा,
—फिनिक्स लायब्ररी

# अवती-भवती : पृष्ठ ६ वरून


वेळी छोटा नागपूर भागामध्ये झारखंड पार्टीचे वर्चस्व होते ते मोडून काढण्यासाठी आपण मागासलेल्या जाती-जमातींमध्ये कसे कार्य केले याचा तपशीलही त्यांनी पुरविला. बिहारमधील आपली दोन वर्षांची राज्यपालपदाची कारकीर्द त्यांनी अशा पद्धतीने साजरी केली की, इंदिराजींना बारुआ हा आपला माणूस आहे असा विश्वास वाटावा यासाठी दिल्लीहून येणारी केवळ इंदिराजींचीच नव्हे, तर त्यांच्या जवळच्या वर्तुळामध्ये वावरणाऱ्या प्रत्येकाची आज्ञा त्यांनी शिरसावंद्य मानली. दिल्लीमध्ये असले तरी ललितनारायण मिश्रा यांना बिहारच्या राजकारणामध्ये विशेष स्थान आहे या गोष्टीचा त्यांनी कधी विसर पडू दिला नाही. ललितनारायणजींचे बंधू जगन्नाथ मिश्रा यांचा केदार पांडे मंत्रिमंडळामध्ये कसा समावेश झाला याचा किस्सा नोंदण्यासारखा आहे. केदार पांडे-मंत्रिमंडळाचा शपथविधी चालू असतानाची ही गोष्ट आहे. मंत्रिमंडळामध्ये ज्यांची निवड करण्यात आली होती त्यामध्ये हरिनाथ मिश्रा नावाच्या प्रामाणिक काँग्रेसनेत्याचा समावेश होता. शपथविधिसमारंभाला सुरुवात होण्यापूर्वी राज्यपाल बारुआ यांना दिल्लीहून फोन आला. फोनवर यशपाल कपूर होते. त्यांनी सांगितले की, मंजूर करून तयार करण्यात आलेल्या यादीमध्ये एक छोटीशी चूक राहून गेली आहे. प्रत्यक्षामध्ये ती चूक नव्हती, तर मागून जाणीवपूर्वक करण्यात आलेली ती दुरुस्ती होती. यादी पाटण्याला गेल्यानंतर दिल्लीमध्ये ज्या घटना घडल्या त्यामुळे ही दुरुस्ती सुचविण्यात आली होती आणि फोनवर यशपाल कपूर असे भासवीत होते की, ही केवळ नजरचुकीची दुरुस्ती आहे. त्याचे असे झाले की, ही यादी ललितनारायणजी आणि यशपाल कपूर यांनीच केली होती. त्या वेळी त्या दोघांची चांगलीच गट्टी होती आणि परस्परांच्या फायद्याचे राजकारण दोघेही खेळत होते. काँग्रेसला पैसे मिळवून देणारा जबरदस्त मनुष्य म्हणून ललितनारायणजींचा त्या वेळी लौकिक होता आणि कपूर आणि संजय मिश्राजींना चांगलेच मानीत असत. मिश्राजींना खूष करता आले तर पुढेमागे त्याचा फायदा होईल हे ओळखण्याइतका धूर्तपणा कपूर यांच्याजवळ नक्कीच होता. आपले धाकटे बंधू डॉक्टर जगन्नाथ मिश्रा यांचा बिहारच्या मंत्रिमंडळामध्ये समावेश व्हावा ही ललितनारायणजींची इच्छा होती; पण स्वतःच्या भावाचे नाव स्वत:च कसे सुचवावे म्हणून मिश्राजी गप्प होते. यादीबाबत ज्या वेळी चर्चा झाली त्या वेळी हरिनाथ मिश्रा यांच्याबाबत ललितबाबूंनी प्रतिकूल मत नोंदविले होते; परंतु स्थानिक राजकारण लक्षात घेऊन त्यांच्या नावाचा समावेश करण्यात आला होता ही गोष्ट पण कपूर विसरले नव्हते. ज्या दिवशी पाटण्याला नवीन मंत्रिमंडळाचा शपथविधी होता, त्याच दिवशी ललितबाबू परदेश-दौऱ्यावर जाणार होते. कपूर त्यांना पालमविमानतळावर भेटण्यास गेले आणि सहज म्हणाले, 'आज पाटण्यात शपथविधी होत आहे. आपण जी यादी मंजूर करून पाठविली तीमध्ये हरिनाथ मिश्रा यांच्याऐवजी जगन्नाथ मिश्रा यांचे नाव घातले तर?' वास्तविक ललितबाबू मनातून सुखावले होते. कारण त्यांना हवी ती गोष्ट घडत होती; परंतु आता या शेवटच्या घटकेला आपल्याला या गोष्टीमध्ये फारसा रस नाही असा आव आणून ते म्हणाले, 'बरं.. तुम्हाला काय योग्य वाटेल ते करा!' कपूर काय समजायचे ते समजले आणि पाटण्याला फोन लावण्यात आला. ललितनारायण मिश्रामार्गे यशपाल कपूरना आपल्या या आदेशाचे मोल बारुआंना ओळखते तरच नवल! फोन आल्याबरोबर त्यांनी आपल्या चिटणिसाला बोलावून घेतले आणि मंत्रिपदाची सुखद स्वप्ने पाहत असणाऱ्या हरिनाथ मिश्रा यांना हा कडवट निरोप पोचविण्याची कामगिरी सांगितली. अनेक राज्यपालांबरोबर काम केलेला तो सद्गृहस्थही हादरला; पण तो पडला हुकमाचा ताबेदार! त्याने ते कडवट काम चोख बजावले आणि पुढे बिहारचे मुख्यमंत्री झालेले डॉ. जगन्नाथ मिश्रा यांच्या अंगावर मंत्रिपदाची झूल चढली! बारुआजींनी स्पष्टपणे दाखवून दिले की, ज्यांचे १ सफदरजंग रोड या वास्तूशी विशेष संबंध आहेत अशा मंडळींचे हुकूम आपण शिरसावंद्य मानतो. मग हुकूम देणारा बाईंच्या निवासस्थानाचा चपराशी का असेना.

सतत सिगारेटचा धूर सोडणारे बारुआजी तसे चांगलेच शौकीन होते. रंगेल वरिष्ठ अधिकारी, त्यांच पार्टीमध्ये वावरणारे डॉक्टर्स, इंजिनिअर्स यांच्याशी त्यांचे विशेष सूत असे. पाटण्याचे राजभवन पक्षीय राजकारणाबरोबरच नृत्यांगनांच्या अवखळ नृत्यासाठी आणि सस्त्या संगीतासाठीही ख्याती पावले. राज्यपालांच्या रंगेलपणाच्या अनेक सुरस आणि चमत्कारिक कथांचे चांगलेच पेव फुटले; पण आपल्याबद्दल कोण काय बोलतो याची बारुआजींना फारशी फिकीर नव्हती. कोणी तोंडावर काही बोलले तर ते म्हणायचे, 'मी लोककलांचा उदार आश्रयदाता आहे' अहो, राज्यकर्त्यांचे ते एक कामच आहे' सोनपूर येथे जनावरांच्या खरेदीविक्रीच्या निमित्ताने एक मोठा मेळावा भरतो. राज्यपालांची शाही स्वारी या मेळाव्यामध्ये तंबू ठोकून मुक्कामाला होती आणि तंबूमध्ये तवायफ नाचत होत्या. अत्तरगुलाबाच्या सुगंधी वातावरणामध्ये हा लोकशाही देशामधील राज्याचा राज्यपाल एखाद्या नवाबाला शोभतील असले चाळे करीत होता; परंतु जोपर्यंत दिल्लीहून काही तक्रार येत नाही तोपर्यंत बारुआजींना काळजी करण्यासारखे काही नव्हतेच आणि राज्यपालांनी बाईंच्या भलाईसाठी बिहारमध्ये जे राजकारण केले होते त्यावर तर बाई बेहद्द खूष होत्या. या माणसाला जवळ केला पाहिजे आणि बिहारमधील कामगिरीचे बक्षीसही दिले पाहिजे असे बाईंनी ठरविले असावे. हा गौरव करण्याची संधी १९७३ च्या फेब्रुवारीमध्ये बाईंनी आपल्या मंत्रिमंडळामध्ये जे महत्त्वपूर्ण बदल केले त्या वेळी चालून आली.

## केन्द्रीय मंत्रिमंडळामध्ये स्थान

आपल्या मंत्रिमंडळामधील या बदलाच्या वेळी बाईंनी बारुआंना मंत्रिमंडळामध्ये-पेट्रोलियम आणि केमिकल्स या खात्याचे मंत्री म्हणून जागा करून दिली. राज्यमंत्री असलेल्या ललितनारायण मिश्रा यांना कॅबिनेटमंत्र्याचा दर्जा देण्यात आला आणि बिहारमधील कामगिरीचे बक्षीसवाटप पूर्ण झाले. नेहरू घराण्याचे मुनीम उमाशंकर दीक्षित यांना गृहमंत्री करण्यात आले. आपल्या माणसांना मोक्याच्या जागी बसविण्याच्या राजकारणाला येथूनच प्रारंभ झाला. बाईंच्या मनमानी वागण्याची आणि ज्येष्ठ मंडळींचा विचार न घेता स्वत:ला सोयिस्कर निर्णयाची अंमलबजावणी करण्याची वृत्ती या वेळेपासून स्पष्ट झाली. बाईंच्या पुढील वाटचालीचे धागेदोरे या मंत्रिमंडळबदलामध्ये सापडतात. डी. पी. चट्टोपाध्याय, प्रणवकुमार मुखर्जी यांनाही बाईंनी याच वेळी विशेष आपुलकीच्या भावनेने जवळ केले आणि ही दोन्ही मंडळी बाईंना पुढे त्रासदायकच ठरली.

राजकारणाच्या मुख्य प्रवाहामध्ये आल्याबरोबर बारुआ यांनी आपला गट निर्माण करण्यास प्रारंभ केला. सोशालिस्ट फोरम ग्रुपशी त्यांचे संबंध वाढले. एका राज्यसभासदस्याने सांगितले की बाईंवर उघड स्तुतिसुमने उधळण्यात बारुआंनी याच काळापासून प्रारंभ केला. सोशालिस्ट फोरमच्या लोकांबरोबर त्यांनी दुधारी राजकारण केले. ते त्यांच्याजवळ एक आणि बाहेर दुसरे बोलत असत. बाईंना तर ते नेहमीच त्या सर्व शक्तिमान असून संपूर्ण पक्ष पूर्णपणे त्यांच्या पाठीशी आहे अशी ग्वाही देत असत. हा होयबा कोणत्याही जागी नेऊन बसविला तरी आपले राजकारण आपल्या पद्धतीने करण्यास कोणतीही आडकाठी येणार नाही हे बाईंनी ओळखले. आपल्याला काँग्रेसअध्यक्षपद हवे असल्याचा निरोप त्यांनी बाईंपर्यंत पोचविला होता. अध्यक्षपदाच्या खुर्चीवरून आपण काही ऐतिहासिक स्वरूपाची कामगिरी करू अशी त्यांची धारणा होती. बारुआ या नावाची किंमत बाईंना चांगलीच ज्ञात होती. खेरीज अध्यक्षपदाची खुर्ची स्वीकारण्यास अन्य कोणी फारसे उत्सुक नव्हते. के. कामराज यांच्या कारकीर्दीमध्ये जे महत्त्व अध्यक्षपदाला होते तसे आता ते मुळीच राहिले नव्हते. सरकारी निर्णयाचा आणि पंतप्रधानांच्या मताचा पाठपुरावा करणे एवढे एकच प्रमुख काम काँग्रेस अध्यक्षाला उरले होते. डॉ. शंकर दयाळ शर्मा यांची अध्यक्षपदाची कारकीर्द अतिशय हास्यास्पद झाली होती आणि अध्यक्षपदाचे इतके अवमूल्यन झाले होते की बारुआ त्यात आल्याने फारसा फरक पडण्यासारखा नव्हता. काही वेळ दीक्षितांचे नाव बाईंच्या डोळ्यांसमोर होते; पण त्यांना कम्युनिस्टांचा विरोध होता. उजव्या प्रतिगाम्यांवर पोटतिडकीने तुटून पडणारे बारुआ त्यांना पसंत होते. स्वत:ला जराही त्रासदायक न ठरणारी ही निवड कम्युनिस्टांनाही मानवणारी आहे आणि बारुआही अध्यक्षीय खुर्चीमध्ये उडी मारण्यास उत्सुक आहेत हे लक्षात आल्यावर बाईंनी बारुआंचे नाव निश्चित केले. बारुआंच्या राजकीय कारकीर्दीमधील हा एक मोठाच बहुमान होता. बारुआ अध्यक्षपदी आल्याने पक्ष आणि सरकार यांमधील फरक आणखी पातळ झाला. १९ ऑक्टोबर १९७४ रोजी काँग्रेस अध्यक्षपदाची सूत्रे घेताना काँग्रेसला मजबूत करण्याची आणि पक्षाची शान वाढविण्याची घोषणा करणाऱ्या या अध्यक्षांच्या कारकीर्दीमध्ये काँग्रेसला पूर्ण अवकळा आली आणि अध्यक्ष म्हणून बारुआ यांचा ही या लाजिरवाण्या पराभवामध्ये मोठा वाटा होता. रजनी पटेल, सिद्धार्थशंकर रे यांच्याबरोबर दोस्ती करून त्यांनी गटबाजीने राजकारण केले आणि 'इंदिरा इज इंडिया' सारखी अजब घोषणा करून स्वत:च्या पदरात भरपूर नामुष्की घेतली. संजय आणि युवक काँग्रेस यांच्या कारवायांची त्यांना पूर्ण कल्पना होती; परंतु सर्वोच्च सत्तास्थानी असलेल्या इंदिरेचा त्याला पाठिंबा आहे ही गोष्ट ते विसरू शकत नव्हते आणि इंदिरा हे तर त्यांचे त्या वेळी परम दैवत होते; पण दिवस फिरल्यावर 'इंदिरा इज इंडिया' म्हणणाऱ्या या गृहस्थाने बाईंची टर उडविण्यास कमी केले नाही! ज्या दिवशी ब्रह्मानंद रेड्डी यांची काँग्रेस-अध्यक्षपदी निवड झाली त्या दिवशी बाईंकडे पाहून बारुआजी म्हणाले, 'देशाच्या नेतृत्वपदावर असलेल्या या बाई आज काँग्रेसमधील केवळ एका गटाच्या नेत्या उरल्या आहेत.' आणीबाणीच्या आगेमागे ज्या मंडळींचा वेगाने उत्कर्ष झाला, त्यांपैकी बहुतेक माणसांजवळ इंदिराजींबद्दल निष्ठा एवढाच गुण होता. बाईंच्या जागच्या हल्ल्यामुळे त्या सगळ्याचाच पार पालापाचोळा झाला! त्या उडणाऱ्या पाल्यापाचोळ्यामध्ये काँग्रेसचे अध्यक्षपद भूषविणारे बारुआजीही उडून गेले! □

लाल किल्ल्यातील अभियोगाची कहाणी १९४८-४९

लेखक : पु. ल. इनामदार । राजहंस प्रकाशन, पुणे । मूल्य : वीस रुपये

## दत्ता केशव यांचा धंदेवाईक चौकार

# ▫ धंदेवाईक ▫ बायका त्या बायकाच ▫ बदला ▫ भिंगरी

'दत्ता केशव' (कुलकर्णी) असं एक छाप पाडणारं नाव असणाऱ्या या सद्गृहस्थानी लेखक–दिग्दर्शक म्हणून मराठी सिनेनाट्यप्रांत नुसते दुमदुमून सोडले आहेत एका ऑगस्ट महिन्यात त्याची दोन नाटके आणि दोन सिनेमे पेश झाले धंदेवाईक आणि बायका त्या बायकाच (या पुढच्या लेखात वापरलेले लघुरूप : बात्याबा). ही दोन नाटके ऑगस्टच्या मध्याला पाठोपाठच्या दिवशी सादर झाली तर बदला व भिंगरी हे दोन मराठी सिनेमेही ऑगस्टच्या अखेरीस पाठोपाठच्या दिवशी प्रदर्शित झाले यातली दोन्ही नाटकं ही दत्ताजीनी फक्त लिहिलेली आहेत, तर दोन्ही सिनेमात मात्र पटकथा-लेखनाबरोबरच दिग्दर्शनाचेही श्रेय त्यांच्या नावे आहे प्रथमच सांगून टाकायला हरकत नाही की या चौकडीपैकी फक्त बात्याबा हा एक फार्सच मला आवडला आणि स्वतंत्रपणे दखलपात्र वाटला. अर्थात तरीही या चार कलाकृतींची दखल मी स्वतंत्रपणे न घेता चारींची एकत्रच मोट बांधतो आहे कारण, एक : दत्ता केशव हे चारीचे सूत्रधार आहेत, आणि संख्यात्मकतेने तरी त्यांनी ऑगस्ट महिना स्वतःच्या नावावर नोंदविला आहे. दोन : या चौघांमध्ये काही समान सूत्र, एक धागा शोधता येण्यासारखा आहे आणि तीन : स्वतंत्रपणे प्रत्येकाबद्दल काही लिहावे इतके कलागुण कशातच नाहीत

दुसऱ्या कारणाचा खुलासा प्रथम करतो. या नाटक–सिनेमामध्ये जे प्रमुख समान सूत्र आहे असे मला वाटते, ते अर्थातच धंद्याचे आहे. दत्ताजीरावांनी फक्त एकाच नाटकाला धंदेवाईक असे नाव दिले आहे; तरीसुद्धा इतर तीन कलाकृतीनाही तेच नाव फिट्ट बसले असते याबद्दल मला यत्किंचितही संशय वाटत नाही कोणत्याही असेल त्या मार्गाने भरपूर धंदा करणे हा एकच उद्देश ठेवून या चौघांचे लेखन (व त्यातल्या दोन सिनेमांचे दिग्दर्शन) झालेले दिसते एक तर खास टेलरमेड कथा बेतून देणाऱ्या सलीम–जावेद जोडीशी स्पर्धा करायला निघाल्यासारख्या या चौघांच्याही कथा अशा हिकमतीनं विणल्या आहेत की बऱ्याच पात्रांना साधारण सारखा वाव मिळावा. यामुळेच या चारीही कलाकृती–विशेषत: त्यातले दोन सिनेमे हे एकदम मल्टिस्टारकास्ट वगैरे झाले आहेत. बदलाची कास्ट रमेश देव सीमा सुषमा, अरुण सरनाईक, मधुकर तोरडमल वगैरे मंडळीची आहे तर भिंगरी या सप्तरंगी चित्रपटात डॉ. श्रीराम लागू, निळू फुले, विक्रम गोखले, रमेश देव, सुषमा, भगवान आणि अरुणा इराणी अशी मातब्बर मंडळी आहेत यालाही हरकत नाही; पण एक तर मराठीतल्या अभिनेत्यांची एकंदर चणचण लक्षात घेता ही ट्रिक इथे हिंदीसारखी फार दिवस चालणार नाही आणि दुसरं, या नामवंत कलाकारांच्या छत्रछायेखाली लेखन दिग्दर्शनातील अपयश किंवा कच्चेपण प्रेक्षकांच्या नजरेत येत नाही. साहजिक ते चांगले असल्याचा गैरसमज पसरतो. क्वचित त्या कलाकाराचाही तसा गैरसमज व्हायची शक्यता असते.

धंद्यासाठी जरूर वाटणाऱ्या सर्व गोष्टी आपल्या लेखन–दिग्दर्शनात मनोभावे घुसडतांना Probability चा सर्वसामान्य विचार-सुद्धा दत्ता केशव करीत नाहीत हा माझा त्यांच्यावरील मोठा आक्षेप आहे हिंदी धंदे-वाईक सिनेमावाले आपल्या प्रेक्षकाचे सरासरी मानसिक वय चौदा ते सोळा धरतात असे ऐकिवात आहे. दत्ताजी आपल्या प्रेक्षकांची बौद्धिक उमर काय गृहीत धरीत असतील याबद्दल मला कमालीचे कुतूहल आहे एक तिकीट काढून आल्याचं पाप फेडण्यासाठी प्रेक्षकांना कशाकशावर म्हणून विश्वास ठेवायला लागावा ? बात्याबा हा बोलून चालून फार्स म्हटल्यावर त्यातल्या असंभाव्यतांवर टीका करायला फार जागा उरतच नाही; पण 'एक तरुण एका धंदेवाईक वेश्येला भाड्याने घेऊन मजा मारण्यासाठी एका हनीमून पॉइंटवर येतो' असं भडक कथासूत्र असलेल्या 'धंदेवाईक' या नाटकातसुद्धा, नाटककार-दिग्दर्शकाच्या सोयीसाठी एका पॉश हॉटेलच्या रूमचा सार्वजनिक हमामखाना झालेला आपण पाहतो. कुणीही केव्हाही खोलीत घुसावं ! ही धंदेवाईक वेश्या जी कराराबाहेर बोट उचलण्यासाठी सुद्धा वेगळे पैसे मागते, ती चोवीस तासांच्या आत कुलवत खानदानी घराण्याच्या असूर्यंपश्या लेकीसुनांवर (किंवा कोल्हटकर–कालेलकरी नाटकातल्या आधुनिक सातामावित्रीवर) कडी ठरावी अशी साध्वी बनून जाते हे हाडामासाच्या जिवंत मनाच्या माणसाचं हृदय-परिवर्तन–किंबहुना आमूलाग्र परिवर्तन–हे रबरी बाहुलीचा पोषाख बदलण्याइतकं सोपी आहे काय ? भिंगरी सिनेमात तर दत्ताजीरावानी अगदी 'बचेंगे तो और भी लढेंगे' अशा जिद्दीनं थापागप्पांची उतरंड रचली आहे दोन वर्षे तुरुंगात पडलेल्या भावासारख्या जिवलग दोस्ताला यातला दौलतराव पाटील एकदासुद्धा स्वत: भेटायला जात नाही की दोस्ताच्या बायकोलाही पाठवीत नाही आणि रामलक्ष्मणांचे काय असेल असं प्रेम असणारे हे दोघे दोस्त–त्यांतला एकजण दुसऱ्याविषयी अत्यंत फालतू व न पटणाऱ्या कारणामुळे दुसऱ्याचा विध्वंस करायला उठतो यातली भिंगरी दुधातून गुंगीचे औषध पाजलं गेल्यानंतर बेशुद्ध होऊन पडत वगैरे नाही तर एक खणखणीत नृत्यगीत, उगीचच झोक जात असल्याचा आव आणीत पण ताल-सूर चुकू न देता झोकदारपणे म्हणते. यातल्या व्हिलनच्या पेट चमच्याला सिनेमाच्या शेवटी शेवटी, अटकेत असलेली भिंगरी 'तू माझा भाऊ' म्हणून सांगते की झालं. गडी अर्ध्या सेकंदात तिच्या बाजूला फिरतो. 'बदला' सिनेमाची एक नायिका वृंदा जग्गूदादाशी लग्न करते आणि संसार थाटते; पण

तिच्याचसाठी तुरुंगात गेलेल्या आपल्या भावाला कळवतही नाही. कारण त्याचा सुटून आल्यावर गैरसमज झाल्याशिवाय पुढच्या सूडकथेला गती कशी येणार ? अशी किती उदाहरणे सांगावीत ? हिंदी चित्रपटाशी तोंडीला तोंड इतक्या धंदेवाईक तडजोडी improbabilities च्या रूपानं दत्ताजींनी पत्करल्या आहेत, एवढच म्हणतो.

कदाचित धंदा हा एकमेव motive ठरल्यामुळे असेल, पण दत्ता केशव आपली कोणतीच कलात्मक जबाबदारी स्वतःला झटकून देऊन, निष्ठेने पार पाडत नाहीत हा माझा पुढचा आक्षेप आहे भिंगरीचा नायक दीपक ( विक्रम गोखले ) हा एरवीचे संवाद, नुकताच ज्ञानप्रबोधिनीतून बाहेर पडला असावा इतक्या शुद्ध आणि सानुनासिक ब्राह्मणी मराठीमध्ये बोलतो; पण त्याची गाण्यामधली भाषा मात्र 'सजणी ग', 'बघुन तुला, , ' अंग चोरतीया कशी लाजाळूची येली ' अशी असते. हा चमत्कार बेपर्वाईचा नाही तर दुसऱ्या कशाचा आहे ?' 'बदला'मधल्या एका गाण्यावर झोपडपट्टीतल्या लोकांचा नाच चित्रित केला आहे. या नाचात एरवी 'इरसाल बेरकी खडूस बेइमान,' 'ही खालीपिली नाय पायजेल,' 'दादागिरी, बनवेगिरी नाय पायजेल' असे ( माझ्यासारख्या अज्ञाणी पांढरपेशाची टोपी उडविणारे ) खास पारिभाषिक शब्दधन असले तरी मधेमधे मात्र,

> 'भोळ्या खुळ्या आम्ही बायका
> याच्या खोट्या प्रेमाने झुरतो फुका
> करतो चुका, मूर्खांसारख्या'

अशा किंवा 'शूर धाडसी गुणी रूपवान ही जात पुरुषाची', अशा एकदम ॲगमार्कछाप शुद्ध ओळीही येऊन जातात. दत्ता केशव 'बदला'चे लेखक दिग्दर्शकच नव्हेत तर गीतकारही आहेत, तेव्हा ही चूक सुधारणे त्यांच्या हातात नव्हते असा त्यांचा बचाव करणे कठीण आहे. लेखक या नात्याने त्यांच्या संवादात originality कमी आढळते तसे reality चे भानही कमी असते. 'सदा, तू किती चांगला आहेस ! 'कुठं रं एवढा त्याग करायला शिकलास ?' अशी गुळगुळीत, निरर्थक आणि कृत्रिम वाक्ये वापरून त्यांच्या 'बदला'मधले मित्र आपलं प्रेम प्रकट करतात. आपलं पाकीट मारणाऱ्या उनाड धाकट्या तरुणीला त्याचा नायक दीपक 'तू या समाजाची सुद्धा कुणी तरी आहेस' असा जालीम डोस एकाएकीच पाजतो. ( आणि लगेच 'सजणी ग...लाज मला आली' वगैरे द्वंद्वगीत सुरू होत. त्यातली लाज फक्त शब्दांतच असते; पण तो मुद्दा अलाहिदा.) या सगळ्याचा परिणाम असा की लेखक किंवा दिग्दर्शक म्हणून त्याची स्वतंत्र छाप शेवटी काहीच राहात नाही. आपल्या कामाबद्दल असा casual attitude असणे त्यांच्याच करियरला हितावह नाही हे काही त्यांना इतरांनी सांगायला नको. धंदा हे अंतिम उद्दिष्ट ठरविले याचा अर्थ लेखक–दिग्दर्शकाने आपल्या स्वतंत्र प्रतिभेला टाळे लावलेच पाहिजे असा होत नाही. उदाहरणादाखल हृषिकेश मुकर्जींचा 'कोतवालसाब' हा अलीकडचा चित्रपट त्यांनी पहावा

कामात स्वतंत्र प्रतिभेचा अभाव (originality न दिसणे) हा दत्ता केशवावरचा माझा आणखी एक मोठा आक्षेप आहे. त्यांच्या बाल्याबा या फार्सचे कथानक विश्राम बेडेकरांच्या वाजे पाऊल आपुले या फार्सशी अगदी मिळतेजुळते आहे. 'आनंद'चा 'मिली' किंवा राम और श्यामचा 'सीता और गीता' व्हावा (खरं तर 'व्हावी'), तसा हा प्रकार आहे. त्यांचे धंदेवाईक हे नाटक तर दूर्वांजुडीछाप नाटकातला एक प्रवेश आणि बाइडरकबुतरी नाटकातला दुसरा प्रवेश असेच एकापुढे एक तुकडे जोडून बनविले आहे. त्यांच्या बदला आणि भिंगरीच्या लेखन–दिग्दर्शनात तर निरनिराळ्या जुन्या सिनेमा–नाटकाचे प्रतिध्वनी ओळीने आढळतात. भिंगरीमधले दहीहंडीचे गाणे हिंदी सिनेमातल्या 'होली है' वरून डिट्टो उचलल्यासारखे वाटते. आपल्याकडे दहीहंडीत बायका 'अशा' नाचतात काय ? भिंगरीची सुरुवातही प्रथम 'सामना' व नंतर 'आंधी'ची आठवण करून देणारी आहे. 'बदला' मधली झोपडपट्टीतली गाणीही हिंदी सिनेमावरून उचललेली दिसतात. कल्पनेपासून चित्रीकरणापर्यंत. त्या वेळचा नाच तर अगदी 'तिकडचाच'. अशी उदाहरणे तर आणखीही वाढविता येतील. मराठी व हिंदी नाटकासिनेमात खंडोगणती आढळणारेच प्रसंग, त्याच पद्धतीने त्यांनी बदला–भिंगरीमध्ये घुसविले आहेत. भिंगरीमधला मुलगी पाहण्याचा प्रसंग आठवावा. हे सगळे स्वतंत्र विचारशक्तीच्या, प्रतिभेच्या अभावामुळे होते की जे खपते ते देण्याच्या प्रभावामुळे घडते ? प्रत्यक्ष दत्ता केशवांनाच हा प्रश्न मी विचारला असता, 'असे अनुकरण घडत असलेच तर नकळत. ह्या काही मुद्दाम केलेल्या चोऱ्या नव्हेत. अनेक चांगल्या कलाकृती पाहिल्यानंतर आत्मसात होतात व त्यातल्या काही दृश्याचे नकळत reproduction होत असावे,' असे स्पष्टीकरण त्यांनी दिले. त्यांच्या प्रामाणिकपणावर अविश्वास दाखवायला काही कारण नसल्यामुळे हे समर्थन मान्य केले तरी तो दोषच आहे व तो जायला हवा त्याचे काय ?

बाय द वे, या चार कलाकृतीमध्ये काहीही चांगलं नाही, असं मला बिलकल सूचित व सिद्ध करायचं नाही उदाहरणार्थ, यातल्या बहुतेकांमध्ये कलाकाराचे फार मोठे अभिनयसाहाय्य लाभलेले आहे. बाल्याबामधल्या आत्माराम भेंड्यापासून भिंगरीमधल्या डॉ लागूपर्यंत आणि धंदेवाईकमधल्या अविनाश मसुरेकरपासून बदलामधल्या अरुण सरनाईकपर्यंत बहुसंख्य नामवंत कलाकारांनी आपापला वाटा चोख उचलल्याने चारही कलाकृती सुसह्य होतात

इतरही चांगल्या बाजू आहेत. उदा. भिंगरीची निर्मितिमूल्ये उत्कृष्ट आहेत; पण माझ्या या लेखाला मी विषयाची चौकट घालून घेतलेली असल्यामुळे त्यांच्याबद्दल सविस्तर व वेगवेगळे काही लिहिणे शक्य होणार नाही. इतरत्र त्यावर पुष्कळच लिहिले गेल्याने तशी गरजही वाटत नाही. अर्थात अशा तुरळक जमेच्या बाजूंमुळे दत्ता केशवांचे व इतरांचे वजेच्या बाजूकडले अपयश झाकले जाईल अशीही परिस्थिती नाही आणि या अपयशाशी कलाकाराच्या कलानिष्ठेचा प्रश्न निगडित असल्याने कुणीही एका व्यक्तीचा मुलाहिजा न राखता परखडपणे लिहिलेच पाहिजे.

प्रत्यक्ष मुलाखतीच्या वेळी दत्ता केशवांनी जी उत्तरे दिली त्यावरून तर धंदेवाईक सिनेनाट्यात लेखक–दिग्दर्शकाला काही Voice असतोच की नाही याबद्दलच शंका येऊ लागावी. उत्तरांचे 'पेट' सूत्र अर्थातच

व्यावसायिक तडजोड हे होते. धंदेवाईकचे दिग्दर्शक श्री. कमलाकर सारंग यांनीही आपल्या हायवेड नाटकाच्या लिखाणाचे समर्थन करताना धंद्याचेच सूर आळविले. टीकाकाराची तोंडं गप्प करून टाकायला हल्ली हे समर्थन खूप वापरण्यात येऊ लागल्याचं दिसतं. तेव्हा त्या फसव्या सबबीचाही विचार करायला हवा. नाटक–सिनेमानं धंदा करावा याबाबत कुणाचे दुमत नाही; पण फक्त धंदाच करू नये एवढी अपेक्षा मात्र अयोग्य ठरणार नाही असे वाटते. धंद्यासाठी मनुष्य काय काय करील यावर काही मर्यादा म्हणून असली पाहिजे की नाही? इतर कोणताही धंदा आणि सिनेमा-नाटकाचा धंदा यात काही गुणात्मक व मूलभूत फरक आहे हे मान्य नसलेले कुणी नाटयचित्रव्यावसायिक असतील तर त्यांनी मग सिनेमा–नाटके काढण्याऐवजी अधिक किफायतशीर असलेला कोळशाच्या वखारी-सारखा धंदा काढावा. नाही तर धंदा करताना कलेचा मान राखावा. भान ठेवावे.

सर्वंच कलाकारांनी ऑफ–बीट कलाकृतीच निर्माण केल्या पाहिजेत असा माझा हट्ट नाही. एक तर बिनडोक पक्क्या धंदेवाईक कलाकृती किंवा एकदम ऑफ–बीट कलाकृती असे दोनच पर्याय कलाक्षेत्रात अस्तित्वात आहेत की काय? भिंगरीची निर्माती सुषमा व दिग्दर्शक दत्ता केशव यांनीही हा ऑफ–बीटचा मुद्दा मांडला आणि गंमत म्हणजे उद्‌घाटनाचे पाहुणे असलेल्या श्री. भाई वैद्य यांनीही अकारणच तो उचलून धरला. जनतापक्षातल्या बेशिस्त कारभारावर टीका केल्यावर माझे काही मित्र चिडून 'मग काय तुला आणीबाणीतले अत्याचार गोड वाटत होते काय?' असा प्रश्न विचारतात. तशातला प्रकार आहे हा. वस्तुत: बेशिस्त व अत्याचार ही दोन्ही दोन टोके ( extremes ) असून ती एकमेकाला पर्यायी होऊ शकत नाहीत. त्यातून मध्यममार्ग काढूनच वाटचाल करणे अधिक योग्य असते, नाटयचित्रव्यावसायिकानी हा गुणात्मक फरक उपेक्षू नये अशी सूचना आहे. सोदाहरण सांगायचं तर सैनिक आणि वेश्या हे दोघेही आपल्या शरीराची किंमत दुसऱ्याच्या सुखासाठीच मोजत असले तरी त्यांच्या कामगिरीचे मूल्यमापन सब घोडे बारा टक्के पद्धतीनं एकाच गुणात्मक पातळीवर करता येईल काय? नाटयचित्रकलेच्या धंद्याचा प्रश्न हा असा आहे!

एकंदरीत दत्ता केशवांचा हा चोकार काही सीमारेषेपलीकडे जाण्याजोगता वाटत नाही! *

---

पुणे-मुंबई येथे गेल्या महिन्यात फ्रँक काप्रा चित्रपटमहोत्सव साजरा झाला. त्यानिमित्त...

# फ्रँक काप्रा

## कुठला, क़ोण आणि कसा

चालू शतकाच्या तिसऱ्या दशकात अमेरिकेत निर्माण केलेल्या चित्रपटांनी ज्याला खूपशी कीर्ती व पैका मिळवून दिला तो फ्रॅंक काप्रा आज वयाच्या ऐंशीव्या वर्षी चित्रपट-विद्यालयात व्याख्यानें देत असतो. ह्याच फ्रॅंक शाळेत जातो म्हणून लहानपणी त्याच्या कुटुंबियांनी त्याची खूप टर उडविली होती; प्रसंगी त्याबद्दल त्याने त्यांचा मारही खाल्ला होता. 'शेतकरी म्हणून जन्माला आलो तरी शेतकरी म्हणून खड्डयात गाडला जाणार नाही' असे जिद्दीने म्हणणाऱ्याचे नाव पुढे त्याने काढलेल्या त्याच्या चित्रपट-शीर्षकांच्याही शीरोभागी जाऊन बसलेले रूपेरी पडद्यावर आपल्याला अजूनही आढळते. 'मी-फ्रॅंक काप्रा, हॉलीवुडकर' म्हणून स्वत:चा करून दिलेला परिचय पुढे किती विलक्षण खरा ठरला! आपल्या गरीब कुटुंबासमवेत अमेरिकेत जाऊन वसाहतदार बनलेला हा सहा वर्षांचा मूळ सिसिलियन बेटा लॉस एन्जलिसमध्येच लहानाचा मोठा झाला होता. रसायनशास्त्रातल्या या इंजिनियरावर नंतर ऐन बेकारीच्या काळात दारू गाळणाऱ्या गाववाल्यांसाठी घाण न पसरविणाऱ्या दारूभट्टीचा नमुना उभा करून देण्याचे प्रचंड रकमेचे प्रलोभन उभे ठाकले होते; पण स्टुडिओच्या अनुभवाविना या हॉलीवुडकराने रडयार्ड किपलिंगच्या कवितेचे नाटयीकरण करून त्यावर एक रिळाचा चित्रपट करण्याचे पसंत केले. त्यात 'सौंदर्य, सामर्थ्य व प्रतिष्ठा' असल्याचे शिक्कामोर्तब चित्रपटसमीक्षकानी केलेले पाहून खुद्द काप्रा थक्कच झाला. पुढे 'कोलंबिया पिक्चर्स' या चित्रसंस्थेसाठी त्याची निवड व्हावी ती सुद्धा कशी? तर बेकार दिग्दर्शकांच्या मूळाक्षरानुसार लावलेल्या यादीत याच्या नावाचे आद्याक्षर वरच होते म्हणून!

चित्रपटाचा संपूर्ण मामला एकाच माणसाच्या हाती असावा या विचारप्रणालीचा आद्य प्रवक्ता फ्रॅंक काप्राच. म्हणजे चित्रपटकृती ही एका व्यक्तीची नवनिर्मिती, असे मानणारा व सांगणारा. मूळ कल्पना, पैशांचे पाठबळ आणि मग चित्रपटनिर्मिती—असा त्याचा व्यवहारी आडाखा, चित्रपटव्यवहाराचे सम्यक भान ठेवणारा. 'मिस्टर डीड्‌स् गोज् टू टाउन'मध्ये प्रथमत:च फ्रॅंक काप्राचे नाव चित्रपटाच्या शीर्षकावर झळकले. 'काप्रा-स्पर्श' सुरू होतो तो तेथूनच. भरभराटलेल्या अमेरिकेत व्यक्तीच्या लोप पावत चाललेल्या प्रतिष्ठेचा प्रश्न काप्राला दखलयोग्य वाटला, इतकेच नाही तर सभोवतालच्या परिस्थितीवर काबू ठेवण्यासाठी आवश्यक तो आत्मविश्वास त्याने आपल्या डीड्‌स्‌च्याद्वारे दिला. एक संपर्कक्रिया म्हणून त्याचा चित्रपट एखादा संदेश जरूर देत असतो. मानवजातीवरची नितांत श्रद्धा दृढ करण्याचे त्याचे ईप्सित तो चित्रपटामधून साधीत असतो. त्यामुळे काहीशी प्रेक्षकानुनयी भूमिका स्वीकारणे त्याला भाग पडत असते. प्रभावदृष्टया तो प्रेक्षकांच्या प्रतिक्रिया व सहभागसुद्धा मह-

त्वाचा मानतो. जॉन डो या एका सामान्य व भल्या अमेरिकन माणसाच्या चित्रणात त्याने 'मीट जॉन डो' या आपल्या चित्रपटाची अखेर कुणा एका तसल्याच डोच्या पत्रानुसार त्या अज्ञात माणसाला हुबी तशीच घडवली. 'लॉस्ट होरायझन ऑफ शांग्रिला.' मध्ये गंभीर भाग पाहूनसुद्धा हसणाऱ्या प्रेक्षकांखातर काप्राने त्या चित्रपटाच्या प्रारंभीची दोन रिळेच गाळून टाकली.

'तुम्ही जर एखाद्या देशातल्या मानवी हृदयात घंटानाद कराल, तर सगळ्या देशात तो होत राहील'—अशी धारणा ठेवणाऱ्या काप्राने सामान्य माणसाचेच कथानिरूपण केले. भाकरीची भ्रांत पडलेल्या अतिसामान्य माणसाची कणव त्याला येते व हे तो सुधारलेल्या समाजाच्या बहुढंगी, बहुव्याप्त व उपाधिग्रस्त पसाऱ्याच्या संदर्भात लक्षात घेतो हे विशेष. अत्याधुनिक व लब्धप्रतिष्ठित नागरी वातावरणात व्यक्तिजीवनाचा कसा कोंडमारा होतो, हे दाखवीत असतानाच काप्राचा सामान्य माणूस एका तिरिमिरीने उठतो व अंधाऱ्या प्रेक्षागृहातल्या सर्वसामान्य प्रेक्षकांच्या मनांना एकदम झळाळून टाकतो. म्हणूनच त्याचे चित्रपट नायकप्रधान होतात, पण नटप्रधान होत नाहीत. गॅरी कूपर काय, जेम्स स्टचुअर्ट काय किंवा रोनाल्ड कोलमन, क्लार्क गेबल काय—हे फ्रँक काप्राचीच व्यक्तिचित्रे रेखाटीत असतात. गंमत म्हणजे स्त्रीभूमिका करणाऱ्या त्यांच्या नटयाच अधिक रेखीव कामे करतात. (जीन आर्थर, बार्बरा स्टॅनविक, क्लॉडेट कोल्बर्ट याना आठवून पहा बरे!) त्या व्यक्तिचित्रणात प्रेमभावना असो, स्वप्नमयता असो, भाषणबाजी असो की चक्क श्रीमुखात भडकावणे असो—ही एकाच पातळीवर राहतात. ही पातळी काप्राच्या चित्रपटविषयक भूमिकेने निर्माण केलेली असते. विषयप्रधानता स्वीकारल्यामुळे त्याची 'शैली' अशी साकारलीच नाही. ज्याला 'काप्रा-स्पर्श' म्हटले जाते, तेवढाच काय तो अवतरला.

फ्रँक काप्राने चित्रपटाच्या तंत्रात अनेक नवे प्रयोग केले. काही दृश्ये त्याने प्रेक्षकांच्या अपेक्षित प्रतिक्रिया घेण्यासाठी लांबवली. चित्रपटाच्या मोठ्या पडद्यावर माणसांच्या जलद क्रियाही मंदावलेल्या वाटतात, म्हणून काप्राने त्याचे द्रुतगतीने चित्रीकरण करून ती दृश्ये प्रेक्षकांपुढे ठेवली. हेतू हा की क्षणाक्षणांमधली तातडी प्रतीत व्हावी. अति सवेदनाशील अशी ध्वनिक्षेपकयंत्रे त्याने 'लॉस्ट होरायझन'मधल्या हाय लामाची अस्फुट अशी कुजबूज टिपण्यासाठी खुली ठेवली. पार्श्वगायनाऐवजी बिंग क्रॉस्बीचे प्रत्यक्ष गायन चित्रीकरणाच्या वेळीच मुद्रित केले. वास्तवदर्शनासाठी अभिनेत्यांची रंगभूषा त्याने कमीत कमी ठेवली. चित्रीकरणासाठी एकाच वेळी अनेक कॅमेरे त्याने वापरले व समीपदर्शनाची पद्धतीही सुधारली.

उभी हयात, तीन एक डझन चित्रपट व एक आत्मचरित्र पाठीशी घेऊन ताठ असणाऱ्या काप्राने चित्रपटाचा व्याप उत्तम सांभाळला; पण कला-प्रवृत्ती बेतानेच जोपासल्या. या चित्रपटतपस्व्याने अगदी वैभव शिखरावर राहून बोलपटांच्या जमान्यापासून बोल बोल बोलणारे खूप बोलपट काढले, तंत्रविस्तार केला, पैसा कमावला, यश मिळविले, कीर्ती संपादिली— पण चित्रपटाच्या कलारूपाचा आत्मा काही त्याने धुंडाळला नाही. नव्हे, तो त्याचा धर्मच नसेल कदाचित! चित्रपटाचे मनोरंजन, प्रचार, समाजपरिवर्तन व विज्ञान यांच्याशी असलेले संबंध तो यथायोग्यपणे जाणू शकतो. कालांतराने चित्रपट तारे व तारकांचे युग आल्यावर फ्रँकने चित्रनिर्मितीकडे आपणहून पाठ फिरवली; पण तो काही संपला नाही. कारण 'सर्वोत्तम चित्रपट अजून यायचेत' असं तोच म्हणतोय.

भारतातल्या मागच्या पिढीतल्या काहींनी त्याचा एखादा तरी चित्रपट नक्कीच पाहिलेला असेल. कुणी डीड्स् तर कुणी स्मिथ, तर कुणी डॉ. रोनाल्ड कोल्मनच्या चाहत्यांनी लॉस्ट होरायझनसुद्धा. 'आर्सेनिक अँड ओल्ड लेस' या चित्रपटाचे मूळ असणाऱ्या नाटकाचे 'चौऱ्याशीचा फेरा' हे मराठीतून नाटकही आपल्याकडे झाले. 'यू कान्ट टेक इट विथ यू'चाही एखादटुसरा अनुवाद मराठीत आला. खुद्द फ्रँक काप्रा चित्रपटमहोत्सवाच्या निमित्ताने भारतात दोनएकदा येऊन गेले. आपल्यापुरता एवढाच काही 'काप्रा–स्पर्श' नाही. तर काप्राचे मर्म ओळखण्यासाठी त्याची आशय–निष्ठता व अमेरिकेची न्यारी तऱ्हा, तेथल्या माणसांनी जपलेली मूल्ये व त्यांचे समाज व अर्थजीवन, नव्यानेच निर्माण झालेल्या राष्ट्राचा दृष्टिकोण यांच्यावर त्याने टाकलेला प्रकाशझोत याच्याकडे पहावयास हवे. काप्राच्या चित्रपटांनी दिलेले 'डूड लिंग' 'पिक्सी लेटेड' 'शांग्रिला'— हे शब्द केव्हाचे अमेरिकन लोकांच्या शब्दकोषात जाऊन बसले आहेत. आपलीही कवाडे आपण काप्रासाठी खुली ठेवायास हवीत तरच आपल्याला त्याच्याशी असलेले कलानाते जाणता येईल.

—मल्हार ढगे


विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य, लेखनस्वातंत्र्य
या मूलभूत मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना
विचार करायला लावणारी प्रभावी जीवनकथा

। मॅक्झिम गॉर्की ।

। सुमती देवस्थळे ।

मूल्य बहा रुपये

राजहंस प्रकाशन । १०२५ सदाशिव पेठ पुणे ४११ ०३०

यशवंतराव चव्हाण, वसंतराव नाईक, इंदिरा गांधी आदींप्रमाणेच त्या वेळी आम्ही विरोधी पक्षांचे आमदार-खासदार यांनाही निवेदने पाठविली. त्यात जनसंघाचे आमदार रा. का. म्हाळगीही होते. यशवंतराव चव्हाण यांच्याप्रमाणेच म्हाळगी यांनीही तुमच्या प्रश्नात लक्ष घालून मला जे काही करता येणे शक्य आहे ते सर्व करीन अशी पोच पाठविली. यशवंतरावांची पोच पदाधिकाऱ्यांच्या घरी गेली व म्हाळगींची पोच कॉलेजच्या पत्त्यावर आली. हे पोचपत्र प्राध्यापक-संघटनेला न देता एम. आरांनी त्याच्या प्रती काढून ही जनसंघाची चाल आहे असा प्रचार सुरू केला आहे असे प्रा. राऊत म्हणतात !

जातिवादाच्या राजकारणाचा एम. आर. देसाई यांना फायदा झाला नाही. विद्यार्थी व जनता यांची सहानुभूती प्राध्यापकांनाच असल्याचे कोल्हापूरदौऱ्यात दिसून आले.

### धमक्या । धाकदपटशाही

बाळासाहेब खर्डेकर यांच्या निधनानंतर प्राध्यापकांना पगार अनियमित मिळू लागला. वर्षामध्ये तीन महिन्यांचा पगार थकबाकी होऊ लागली. थकबाकी म्हणजे प्राध्यापकांनी कॉलेजला कर्ज दिले असे नमूद केले जाऊ लागले. खर्डेकरांच्या निधनानंतर १९६३ सालापासून कॉलेजच्या व्यवहारात गैरप्रकार होऊ लागले. १९६३ पासून आता-पर्यंत चाळीस ते पन्नास लाख रुपयांचा गोलमाल झाला आहे असे प्राध्यापक एकमुखाने सांगतात. पैसे हडप झाल्याची चर्चा जोरात सुरू झाली तेव्हा एम. आर. देसाई यांचे एके काळी उजवे हात मानलेले सखाराम खराडे यांनी कॉलेजशी असलेले संबंध तोडले. प्राध्यापकांचा १ लाख ४० हजार रुपयांचा प्रॉव्हिडंट फंड भरला नाही. प्राध्यापकांनी या प्रकरणी कोर्टात दावा केला दावा करताना प्राध्यापकांनी तांत्रिक चूक केली. त्यांनी व्यवस्थापनाविरुद्ध दावा केला नाही. एम. आर. देसाई यांच्यावर तो केला कोर्टाने या प्रकरणी व्यवस्थापनाला दोषी ठरविले आहे. एम. आर. देसाईंविरुद्ध प्रॉव्हिडंट फंडाच्या १२ केसेस प्राध्यापकांनी भरल्या तेव्हा त्यांना खुनापर्यंतच्या धमक्या दिल्या गेल्या. आमच्या मुलांच्या अंगावर ॲम्बॅसेडर गाडया घालू अशा धमक्या दिल्या असे प्राध्यापक म्हणतात. या धमक्यांविरुद्ध पोलिसांत प्राध्यापकांनी तक्रारी नोंदविल्या. त्यानंतर पोलिसांनी गोखले कॉलेजच्या वर्गात सी. आय. डी. विद्यार्थी म्हणून बसत आहेत. तेच आम्हाला आतील माहिती देतात असेही अनेक प्राध्यापकांनी सांगितले.

**पगार नाही म्हणून प्रा. व्ही. एम. देसाई यांच्या पत्नीने आर्थिक अडचणीला कंटाळून आत्महत्या केली तर प्रा. एम. आर. पाटील यांच्या पत्नीनें आत्महत्येचा प्रयत्न केला अशीही माहिती सांगण्यात आली.**

संस्थेच्या आर्थिक गैरव्यवहाराबाबत चॅरिटी कमिशनरकडे ५४ आरोप दाखल करण्यात आले. त्यापैकी आतापर्यंत २४ आरोप शाबीत झाले आहेत. बाकीच्या आरोपप्रकरणात चॅरिटी कमि-शनरनी संस्थेकडून दुरुस्त्या करवून घेतल्या आहेत. मात्र शाबित झालेल्या आरोपप्रकरणी ट्रस्टींना का काढून टाकू नये याची कारणे दहा दिवसांत कळवावीत अशी नोटीस बजाविण्यात आली होती. कोर्टातील प्रकरणी ९ वेळा एम. आर. देसाई यांनी कोर्टाचा अव-मान केला म्हणून त्यांना माफी मागावी लागली होती.

*गोखले कॉलेजच्या आर्थिक व्यवहाराचे सरकारने* ३ वेळा, शिवाजी विद्यापीठाने ३ वेळा व अकौंटंट जनरलने एकदा खास ऑडिट केले. या सर्व ऑडिटमध्ये लाखो रुपयांचा गैरव्यवहार झाला असल्याचे म्हटले आहे.

एम. आर. देसाई कोर्टाचा किंवा शिवाजी विद्यापीठाच्या ठरा-वांचा अर्धा भाग सांगून आपण निर्दोष आहोत असे सांगत सुटले आहेत असे काँग्रेस आमदार पी. बी. साळुंकेही म्हणतात. प्रॉव्हिडंट फंड प्रकरणी कोर्टाने व्यवस्थापनाला दोषी धरले आहे ते एम. आर. सांगतच नाहीत. त्याचप्रमाणे विद्यापीठाच्या ठरावाबाबतही ते तेच करीत आहेत. प्राध्यापकांची थकबाकी, प्रॉव्हिडंट फंड व ग्रॅच्युइटी *देऊन विज्ञानशाखा बंद करता येईल असे विद्यापीठाने आपल्या* ठरावात म्हटले आहे; पण एम. आर. त्याचा विपर्यास करीत आहेत. प्राध्यापकांचे पगार आदी आर्थिक व्यवहार (शिवाजी विद्यापीठाच्या ठरावानुसार) पूर्ण न करताच विज्ञानशाखा बंद करण्यात विद्यापीठाने परवानगी दिली आहे असे ते सांगत आहेत.

गोखले कॉलेजप्रकरणात पोलिसांची चौकशीही कॉलेजविरुद्ध गेली आहे. त्याचप्रमाणे ऑडिटरिपोर्टसमध्येही गोळमाळ असल्याचे दिसून आले आहे. चॅरिटी कमिशनरनी ट्रस्टींना काढून का टाकू नये अशी शोकॉज नोटीस दिली आहे तरी सरकार मूग गिळून गप्प का आहे हे आणखी सांगण्याची आवश्यकताच राहात नाही. माजी राज्यपाल *अलीयावर जंग यांनीही या प्रकरणी रिसीव्हर नेमण्याचे ठरविले होते* असे सांगतात. एवढे पुरावे सरकारच्या दप्तरात असताना सरकार आणखी चौकशीचा घोळ कशासाठी घालीत आहे ? □


# पॅपिलॉन
# पॅपिलॉन

लेखक : हेन्री शॅरीयर
अनुवाद : रवींद्र गुर्जर

राजहंस प्रकाशन, पुणे ३०
मूल्य : पंचवीस रुपये

# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

**३।९।७७ ते ९।९।७७**

### केंद्रसरकारचे महाराष्ट्राकडे विशेष लक्ष

महाराष्ट्राच्या भाग्यस्थानी सध्या रवी वावरत असून दि. ७ पासून तेथे शनी आपले प्रस्थान ठेवीत आहे. तेथेच दीर्घकाल वास्तव्य करणाऱ्या शनीचे परिणाम महाराष्ट्राच्या राजकारणावर झाल्याशिवाय राहणार नाहीत. महाराष्ट्रात राष्ट्रपतींची राजवट येणार नाही हे ज्योतिषशास्त्रदृष्ट्या येथे स्पष्ट नमूद करून ठेवावे. मात्र काँग्रेसच्या मूळ कुंडलीप्रमाणे या संस्थेला शनी अनिष्ट झाला आहे. त्यामुळे तिचे कार्य निःष्कंटक आहे असे मात्र नाही. उत्तर भारतात जे घडेल त्याचे पडसाद महाराष्ट्रावर उमटल्या-खेरीज राहणार नाहीत. यशवंतराव चव्हाण व मोरारजीभाई देसाई या दोघांना वैयक्तिक-दृष्ट्या शनी अधिक अनुकूल झाला आहे. श्रीमती इंदिरा गांधी व यशवंतराव चव्हाण यांचे संबंध सुधारण्याऐवजी गैरसमज वाढ-ण्याची शक्यता अधिक असून इंदिराबाईंचा महाराष्ट्रदौरा काँग्रेसमध्ये फाटाफूट घडवून आणायला कारणीभूत होईल असे दिसते.

---

### मेष : बदलाची चाहूल

मेषराशीच्या व्यक्ती अंतरिक्षातील ग्रहांच्या मर्जीत आहेत. दि. ७ सप्टेंबरपासून शनी पाचवा होत आहे. त्यानंतर तुम्ही अनेक प्रकारच्या त्रासातून खरेखुरे मुक्त होणार आहात. शारीरिक त्रास संपणार आहे. उद्योगात तुमच्या योजना प्रत्यक्षात येणार आहेत. पैसा मिळून धंद्याला स्पष्ट स्वरूप आणण्यात तुम्हाला यश येईल. नोक-रीत अपेक्षित बदल घडून येण्याची प्रक्रिया या वेळेपासून सुरू होईल. तुमच्यावर मर्जी असलेले, तुम्हाला सहानुभूती देणारे असे अधिकारी तुम्हाला लाभणार आहेत. शुभ ६–७.

महिलांना : नोकरीत अडचणी उरणार नाहीत.

विद्यार्थ्यांना : शैक्षणिक सोयीसवलती मिळतील.

### वृषभ : उद्योगाला गती

दि. ७ सप्टेंबरला शनी चौथा होत आहे. हा शनी दीर्घकाळ सुखस्थानी राहणार आहे. सुखात वाढ होणार नसली तरी आर्थिक योजनांच्या बाबतीत तुम्ही काही तरी उला-ढाल करू शकाल. ठरविलेल्या योजनांना गती मिळू शकेल. मागच्या अडचणीवर मात करू शकाल.. दुसरा गुरु-मंगळ तुम्हाला पैसा कमी पडू देणार नाही. नोकरीच्या बाबतीत काम अधिक करावे लागणार आहे. मात्र त्या कामाचा उपयोगही होईल. कार्यक्षमतेचा प्रत्यय प्रत्यक्ष फायद्यातून दिसणार आहे. आरोग्य सुधारेल. शुभ दि. ४–९.

महिलांना : कलाक्षेत्रात मन आकर्षित होईल.

विद्यार्थ्यांना : नवे नवे छंद जडतील.

### मिथुन : साडसातीतून सुटका

मित्रहो, तुमची आता साडेसातीतून सुटका झाली आहे हे लिहायला मला आनंद वाटतो. ज्या शनीने तुम्हाला छळले तो शनी दि. ७ पासून तुमचा हितकर्ता होणार आहे. तुम्ही आता जे जे कराल ते ते यश मिळवून देणार आहे. उद्योगधंद्यात नवे पर्व सुरू होईल. अनेकांचे सहकार्य मिळेल. भांडवल व तांत्रिक मदत मिळेल. अडचणी आता दूर होणार आहेत. नोकरीत आजवर तुमची उपेक्षा झाली होती. तुमची निराशा झाली होती; पण आशावादी राहावे. मन प्रसन्न ठेवून कोणतेही काम करा. शुभ दि. ४–६.

महिलांना : आशाआकांक्षा फुलतील.

विद्यार्थ्यांना : प्रगतीला चालना

### कर्क : पैसा मिळेल

गुरु-मंगळाने व्ययस्थानी प्रस्थान ठेवल्या-पासून तुमच्या हाती कितीही पैसा आला तरी तुमची चणचण होतच होती. आता दि. ७ ला शनि दुसरा होत आहे. हा शनि दीर्घकाळचा बदल घडवून आणणार आहे व त्याची चाहूल या वेळी लागणार आहे. तुमचा पैसा कुणाकडे गुंतला असेल तर तो वसूल होईल. बुडणार नाही. नोकरीत काही तरी बदल घडण्याचा संभव आहे. भावी काळाच्या दृष्टीने तो उपकारक असेल. बेकारांना नोकरी मिळू शकेल. आरोग्य सुधारेल. पर-देशप्रवास घडू शकेल. शुभ दि. ५–७.

महिलांना : कोणत्याही कामात मन गुंतवावे.

विद्यार्थ्यांना : हितकारक असे घडू लाग-णार आहे.

### सिंह : आनंदाचे क्षण

तुमचा त्रास संपला आहे. साडेसाती संपली नाही; पण बाराव्या शनीने तुमचे सारे जीवनच विस्कटून टाकले होते त्याला आता आळा बसू शकेल. जे उध्वस्त झाले होते ते पुन्हा तुम्ही उभारू शकाल. आता शनि तुम्हाला अनुकूल झाला आहे. आता अपयश थांबणार असून यशाची आशा निर्माण होऊ लागणार आहे. आर्थिक परिस्थितीत मोठाच बदल घडून येईल. सध्या गुरु-मंगळ अकरावे आहेत. रेस-लॉटरी नशीब उजळून टाकू शकेल. व्यापारउदीम किफायतशीर होईल. मनाची निराशा आता दूर होऊ लागेल. शुभ दि. ३–७.

महिलांना : आरोग्याची गुरुकिल्ली सापडेल.

विद्यार्थ्यांना : समाधानकारक प्रगती होईल.

### कन्या : साडेसाती सुरू

कन्याराशीला शनि या आठवड्यात दि. ७ पासून बारावा येत असून खऱ्या अर्थाने साडेसाती सुरू होत आहे. अर्थात त्यामुळे तुम्ही बिचकून जाण्याचे कारण नाही. परमेश्वरावर दृढ विश्वास व उपासना सुरू केली तर साडेसातीत देखील फायदा होतो. रोज मारुतीला नमस्कार करा. शनिवारचा उपवास करा म्हणजे तो तुमची साडेसाती बरीच हलकी करील. सध्या तरी गुरु-मंगळ खूपच अनुकूल आहेत. त्यामुळे पैसा मिळवून देण्यात ते अजून तुम्हाला मदत करणार आहेत. आरोग्याकडे दुर्लक्ष करू नका. शुभ दि. ४–७.

महिलांना : प्रामुख्याने वित्तवाची काळजी घ्या.

विद्यार्थ्यांना : संगत चांगली ठेवा.

## तूळ : आशादायक

शनि हा तुमचा मित्र आहे. दि. ७ ला तो अकरावा येत आहे. तुमच्या सर्व विवंचना आता संपणार आहेत. प्रामुख्याने पैशाच्या अडचणी आता उरणार नाहीत. खर्च वाढला तरी पैसे मिळण्यात अडचण येणार नाही. रेस-लॉटरी व तशाच स्वरूपाच्या साधनांनी पैसा मिळू शकेल. सोने-चांदी व कापड या व्यापारीव्यसायात अपेक्षेपेक्षा अधिक नफा मिळेल. शेअर्सबाबतचे अंदाज अचूक असतील. नोकरीत बढती-प्रमोशन असे काही तरी घडू शकेल. प्रगतीची स्वप्ने दृष्टिपथात येतील. आरोग्याच्या तक्रारी अधूनमधून उद्भवत राहतील. शुभ दि. ३–६.

महिलांना : मन सुखी व आनंदी राहील.

विद्यार्थ्यांना : आशाआकांक्षा सफल होतील.

## वृश्चिक : नवे पर्व

आजवर तुम्ही ज्या आशाआकांक्षा मनाशी बाळगल्या होत्या त्या सफल होण्याचा काळ आता सुरू झाला आहे. दि. ७ ला शनी दहावा होत आहे. या शनिबदलापासून तुमची सारी व्यवस्थाच बदलू लागणार आहे. त्रास, अडचणी, अपयश, अपेक्षाभंग या साऱ्या गोष्टी आता इतिहासजमा होणार आहेत. आशाआकांक्षासफलतेचे नवे युग आता निर्माण होणार आहे जे अपुरे राहिले होते ते पुरे होणार आहे. नोकरीधंद्यात तुम्ही तेजाने तळपणार आहात. बढती, प्रमोशन असे काही तरी घडणार आहे. स्थित्यंतराची दिशा हळूहळू स्पष्ट होऊ लागणार आहे. शुभ दिनांक ५–६.

महिलांना : नोकरीत अधिकारप्राप्ती होईल.

विद्यार्थ्यांना : हुशारीमुळे लोकांत कौतुक होईल.

## धनु : शुभकारक सुरुवात

आजपर्यंत शनीने तुमच्या साऱ्या आशाआकांक्षांवर पाणी ओतले होते; पण तोच शनी आता तुम्हाला अनुकूल झाला आहे. भाग्यस्थानी त्याचे आगमन होत आहे व हळूहळू निश्चित स्वरूपाचे बदल जाणवू लागतील. आजार व अपयश, निराशा व हतबलता आता तुमच्या वाट्याला जाणार नाही. आता जे घडेल ते ते तुमच्या हिताचे व उपकारक असेल. आर्थिक बाजू भक्कम करण्यासाठी जे प्रयत्न कराल ते यश देऊन जातील. धंद्यातील अडचणी कमी कमी होत जातील. नोकरीधंद्यातील अपेक्षाभंग यापुढे होणार नाही. वरिष्ठांना तुमची गरज भासेल व तुमचा शब्द ते मानण्यास तयार होतील शुभ दिनांक ६–७.

महिलांना : अडचणीचे दिवस संपले आहेत.

विद्यार्थ्यांना : मन आनंदी व उत्साही राहील.

## मकर : आरोग्य सांभाळा

चंद्रासमोर शनी होता तोपर्यंत तुम्ही गाजतच होता; परंतु दि. ७ पासून शनी आठवा होत आहे. शनी मकरराशीचा स्वामी आहे; परंतु तो आठवा होत आहे व तोही सिंहराशीत. त्यामुळे आरोग्याची काळजी घेणे आवश्यक होईल. रस्त्याने जाताना जपून जावे. आर्थिक परिस्थिती थोडीफार सुधारेल. व्यापारधंदा उभारता येईल. त्यासाठी पैसा कमी पडणार नाही. नवे वाहन खरेदी करण्याची इच्छा सफल होईल. स्थावराचा प्रश्न सुटेल. जमीनविषयक प्रश्न सुटेल. नोकरीत वरिष्ठांबरोबर मतभेद वाढवू नका. मिळतेजुळते घेणे आवश्यक आहे. राजकीय क्षेत्रात डावपेच यशस्वी होणार नाहीत. मोठेपणाच्या नादी लागू नका. शुभ दिनांक ४–६.

महिलांना : मनाची स्थिती खळबळत राहील.

विद्यार्थ्यांना : दूरचा प्रवास होईल.

## कुंभ : बळ वाढेल

तुम्हाला आता चांगले दिवस येऊ लागले आहेत. तुम्ही ध्येयवादी व आशावादी आहातच. त्याला आता गुरूची जोड मिळाली आहे. त्यामुळे तुम्ही कोणत्याही क्षेत्रात उचललेले पाऊल मागे येणार नाही. शैक्षणिक क्षेत्र असो की उद्योगाचे क्षेत्र असो, जे ठरवाल ते सफल होईल. शेती, व्यापार, एजन्सी, शेअर्स खरेदी–विक्री यांतील सारा व्यवहार किफायतशीर होणार आहे. शेअर्समध्ये खूपच नफा मिळवू शकाल. व्यवसाय सुधारेल. नोकरीची परिस्थिती समाधानकारक राहील. आजवर जे फायदे मिळाले नाहीत ते मिळतील. रेसमध्ये फायदा होईल. प्रवासाचा बेत सफल होईल. बेकारांना लाभ. शुभ दिनांक ६–७.

महिलांना : नोकरीत लाभदायक घटना.

विद्यार्थ्यांना : उच्च शिक्षणाची संधी मिळेल.

## मीन : विरोध कमी होईल

तुमच्या कल्याणाची सूत्रे आता प्रामुख्याने शनी हातात घेणार आहे. दि. ७ पासून शनी सहावा होत आहे. त्यामुळे बरेच स्थित्यंतर घडू लागणार आहे. गुप्त अथवा उघड शत्रुत्व करणारे लोक आता तुमच्यापुढे नांगी टाकतील. सर्वसामान्यपणे हा आठवडा अनुकूल आहे. पैसा मिळेल. चार पैसे जरी सढळ हाताने खर्च करता आले नाहीत तरी गरज भागेल. व्यवसाय प्रगतीकडे जाईल. व्यापार सुधारेल. प्रकाशनाचा धंदा भरभराटीस येईल. एखादे नवे धारिष्टयही हातून होईल. नोकरीत आशाआकांक्षा सफल होतील. लेखनाची शक्ती जागृत होईल. नव्या कल्पना आकार घेतील. बेकारांना शुभकारक. शुभ दिनांक ४–८.

महिलांना : संसारात अपेक्षेप्रमाणे घडेल.

विद्यार्थ्यांना : अभ्यासात प्रगतीची चिन्हे.


# पांढऱ्या डागांवर मोफत इलाज

पांढरे डाग बरे करण्यात आमच्या उपचाराने मोठी ख्याती मिळविली आहे. उपचार सुरू झाले की सुधारणा दिसून येईल. रोगाच्या तपशिलासह लिहा. प्रचारार्थ औषधाची एक बाटली नमुना म्हणून दिली जाते. पांढऱ्या डागांपासून मुक्त झाल्यावर आपल्यासारख्याच या रोगाने पछाडलेल्या रोग्यांना औषध घेऊन रोगापासून

**BHARAT AYURVEDASHRAM (M) P. O. KATRI SARAI (GAYA)**

# ' टॉलस्टॉय ' पुस्तक योजना

## पाच पुस्तके । प्रत्येकी सात रुपये । नोंदणी शुल्क पंधरा रुपये

### या योजनेत उपलब्ध होणारी पुस्तके

| पुस्तकाचे नाव | लेखक | मूल्य ( अंदाजे ) |
|---|---|---|
| १ : टॉलस्टॉय-एक माणूस | सुमती देवस्थळे | पन्नास रुपये |
| २ : महाडचा मुक्तिसंग्राम | प्रा. रा. म. बिवलकर<br>प्रा. झुंबरलाल कांबळे | वीस रुपये |
| ३ : पश्चिमेचे पुत्र | रवींद्र पिंगे | पंधरा रुपये |
| ४ : दि टच् | अशोक प्रभाकर डांगे | पंधरा रुपये |
| ५ : आर डॉक्युमेंट | अशोक जैन | दहा रुपये |

## वरील सुमारे १०० रुपये दर्शनी किंमतीची ५ पुस्तके फक्त ५० रुपयात

### योजनेसंबंधी थोडे अधिक

* योजनेतील ' महाडचा मुक्तिसंग्राम ' व ' आर डॉक्युमेंट ' ही दोन पुस्तके सभासदांनी संस्थेच्या कार्यालयातून घेऊन जावीत.
* ' पश्चिमेचे पुत्र ' व ' दि टच् ' ही दोन पुस्तके सप्टेंबरच्या शेवटच्या आठवड्यात मिळू शकतील.
* ' टॉलस्टॉय-एक माणूस ' हे पुस्तक डिसेम्बर ७७च्या शेवटच्या आठवड्यात मिळू शकेल.
* नोंदणी शुल्क पंधरा रुपये त्वरित पाठवावे. पाचही पुस्तकांची सवलतीची किंमत + नोंदणी-शुल्क असे मिळून होणारे रुपये पन्नास एकदम पाठवले तरी चालू शकेल
* ज्यांना पुस्तके रजि पोस्टाने घरपोच हवी असतील त्यांना ती जानेवारी ७८ पूर्वी एक, दोन किंवा तीन हप्त्यात सोयीप्रमाणे पाठविली जातील टपाल पाठवणी खर्च + सवलतीची न भरलेली किंमत इतक्या रकमेची व्ही. पी. सभासदाला केली जाईल. ती त्याने सोडवून घ्यायची आहे
* व्यक्तिगत ग्रंथसंग्रह हा योजनेचा मूळ हेतु असल्याने ग्रंथ-विक्रेत्यांना या योजनेत सहभागी होता येणार नाही.
* रक्कम शक्यतो म. ऑ. ने पाठवावी. चेक असल्यास वटणावळ रुपये दोन अधिक.
* चेक, ड्राफ्ट, म. ऑ. ' राजहंस प्रकाशन ' या नावे पाठवावी. सोबत नाव, पत्ता संपूर्ण असावा.

## किंवा

## १०० रुपये ठेव राजहंस प्रकाशनाकडे पाच वर्षे ठेवणारास व्याजाच्या मोबदल्यात वरील पाचही पुस्तके विनामूल्य मिळतील.

( टपाल + पाठवणी-खर्च ठेवीदाराकडे )

' राजहंस प्रकाशन ', १०२५ सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे ३०.